RETERDEGIS NO. 5 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० ५ माहे सप्तंबर सन १८७५ इ० अंक ३६

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

तारिख २२ रोजीं डाक्टर सिंक्लेर साहेबांचे स्मारक कृत्याकरितां सभा भरली होती त्यावेळेस जीं भाषणें झालीं तीं आपल्या गेल्या अंकांत प्रसिद्ध झालीं आहेत त्यांत एक लहानशी चूक आहे असें मला वाटतें या करितां खालीं चार ओळी लिहिल्या आहेत त्यांस आपल्या येत्या अंकांत जागा द्याल अशी आशा आहे.

अध्यक्षांचें भाषण ह्मणून जें छापलें आहे त्यांत "लोकांच्या हिताकारितां ते ( सिंक्लेर साहेब ) वरिष्ठ अमलदाराशी भांडले" असें शद्ब आहेत. अध्यक्षाचे सर्व भाषण मी लक्ष देऊन ऐकिलें, त्यांत वर लिहिलेले शद्ब नव्हते एवढेंच नाहीं तर त्यांच्या कोणत्याही शद्बांचा असा अभिप्राय नव्हता असें मला पक्कें स्मरतें. वरील वाक्याचा अर्थ कांहीं लोकांच्या मनांत असा येण्याचा संभव आहे कीं वरिष्ठ आधिकाऱ्यांचे मनांत लोकांचें हित करण्याचें नव्हतें परंतु सिंक्लेयर साहेब" भांडले" या मुळें तो हेतु सिद्धीस गेला. अशी गोष्ठ मुळींच नाहीं हें सर्वांस माहीत आहे. शाळाखातें स्थापन झाल्यापासून जे जे वरिष्ठ अमलदार येत गेले त्यांनीं बहुतेक सर्व सिंक्लेर साहेबांच्या सूचना मान्य केल्या व जितका जितका पैसा मागितला तितका सर्व दिला. जे जे रेसिडेंट आले त्यांची उदार बुध्धि नसती तर शाळाखातें इतक्या उदयास मुळींच आलें नसतें. हायस्कुलें, मिडलक्लास स्कुलें व लोअरक्लास स्कुलें स्थापण्याकारितां व लायब्रऱ्यांकरितां पुस्तकें व नकाशे खरेदी करण्याकरितां वगैरे जितका पैसा सिंक्लेर साहेबांनीं, मागितला तितका सर्व मेहेरबान सर जार्ज यूल साहेब यांनीं दिला. तसाच आलीकडे कालेजांतील युनिव्हर्सिटी स्कालरशिप व मिडलक्लास स्कुलांतील स्कालरशिप इत्यादि पुष्कळ किरकोळ उपयोगी कामाकरितां जितका पैसा डैरेक्टर साहेबांनीं अवश्य आहे ह्मणून सांगितलें तितका सर्व आमचे हल्लींचें परम दयाळु रेसिडेंट मेहेरबान सांडर्स साहेब यांनीं मंजूर केला. तसेंच या प्रांतांतील कमिशनर व डेप्युटी, कमिशनर यांनीं सर्व प्रकारें मदत केली नसती तर इतक्या खेडेगावांत शाळांची स्थापना झाली नसती.

श्रीरामपंत यांचें ह्मणणे एवढेंच होतें कीं सिंक्लेर साहेब लोकांचे हित करण्याकरितां मनापासून झटले. व एकदां लिहून हेतु सिद्धीस गेला नाहीं तर त्याच कामाकरितां वारंवार लिहित गेले. अर्थांत सिंक्लेर साहेबांकरितां ती सभा होती या करितां शाळाखात्याचे उत्कर्षास जे इतर अमलदार कारणीभूत झाले त्यांची, स्तुति करण्याचा तो प्रसंग नव्हता यामुळें त्याविषयीं कोणी कांहीं बोललें नाहीं कळावें तारीख २ माहे सप्तंबर सन १८७५ इसवी मुकाम अकोलें.

एक सभेस जाणारा.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि. वि. मूर्तिजापूर येथील इंग्लिश मराठी शाळेंत पान सुपारीचा समारंभ तारीख २६ रोजीं झाला. त्याबद्दल दोन ओळी आपणाकडे पाठविल्या आहेत तर त्या प्रसिद्ध करण्याची मेहेरबानी व्हावी.

रा. रा. नारायण प्रभाकर हेडमास्तर यांच्या वियोगाप्रीत्यर्थ सभा जमून त्यांनीं येथील शाळा कोण कोणते रीतीनें सुधारिली व पूर्वीं ह्या शाळेची स्थिति कशी होती या विषयीं सेकंड असिस्टंट मास्तर यांनीं निबंध वाचिला नंतर अध्यक्ष स्थानीं बसलेले मे० मुबारकअली तहशिलदार यानींही हिंदुस्थानीमध्यें त्यांच्या रीती भातीविषयीं व हाता खालील लोकांस बरेच प्रकारें निभावून घेतलें याविषयीं सुंदर भाषण केलें. गावांतील मंडळीही पुष्कळ जमली होती. नंतर हेड मास्तर यांनीं मेहेरबान तहशिलदार यांचें शाळेकडे उत्तम प्रकारचें लक्ष्य असून यांनीं वेळोवेळीं योग्य मदत दिली त्यावर सुंदर भाषण केलें. पुढें येथील नेटिव्ह लायब्ररीस जो आज तीन चार महिन्यापासून त्रिदोष प्राप्त झाला होता त्या त्रिदोषाचे निवाणासाठीं मेहेरबान तहशिलदार यांनीं गावांतील शेट सावकार लोक यांजकडून वर्गणी जमवून यथायोग्य तजवीज केली. व दुसरें सडकेनें झाडें लावण्याचें कामामध्यें व गावांतील सुधारणुकीच्या कामामध्यें हे फार श्रम घेतात. हें यांस फार भूषणास्पद आहे.

पत्रकर्ते महाराज नारायणराव हेड मास्तर यानीं सर्व लोकांचा लोभ संपादन करून हाताखालील लोकांसही फार योग्य रीतीनें वागाविलें, सरकारानीं त्यांस प्रमोशन देऊन बढतीवर पाठविलें हें त्यांच्या श्रमाचें सार्थक होय. याप्रमाणें सभेचा थाट झाल्या नंतर पान सुपारी, अत्तर गुलाब सर्वांस देऊनन सभा विसर्जन झाली.

याप्रमाणें येणारे हेडमास्तर हेही असेच असतील अशी लोकवार्ता आहे लोभ करावा ही विनंती. तारीख २६ माहे आगष्ट सन १८७५ इसवी मुकाम मुर्तीजापूर

सभेस जाणारा एक क्ष.

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनूसुला रेलवे.

NOTICE

## नोटिस.

## मुंबईस धान्य आणण्याचे भाड्याचे दर कमी करण्याविषयीं

जाहिरखबर देण्यांत येतें कीं येते सप्तंबर महिन्याची तारिख १ रोजीं व त्यानंतर जबलपुरा पलीकडील रेलवेच्या स्टेशनावरील व होळकर स्टेट रेलवेच्या स्टेशनावरून व जबलपूर आणि खंडवा व नागपूर आणि बदनेरा यां मधील सर्व स्टेशनांवरून या रेलवेतून फक्त मुंबईस पाठविलेल्या धान्याचे भाड्याचे दर कमी करण्यांत येतील.

सदरहू स्टेशनांपैकीं कोणतेही स्टेशनावर अथवा खालीं सही करणारास अर्ज केल्यास या विषयींची सर्व माहिती मिळेल.

हेनरी कांडर

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई तारीख २७
आगष्ठ १८७५ इ.

## जाहिरात.

डेप्युटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हा अकोला यांजकडून सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं अकोलें येथें तारीख १ अक्टोबर सन १८७५ इसवीपासून तारीख ३१ मार्च सन १८७६ इसवीपावेतों विलायती दारूचे किरकोळ विक्रीचें एक दुकान सुरू करण्याचा हक्क तारीख १५ माहे सप्तंबर सन १८७५ इसवी रोजीं डेप्युटी कमिशनर यांचे कोर्टांत उघड लिलावानें दिवसा बारा वाजतां विकला जाईल. सदरहू दुकान रेलवे स्टेशनपासून पाव मैल दूर असावें. विकत घेणारास अबकारी रूळांतील शर्तींप्रमाणें वागलें पाहिजे. कळावें तारीख ३१ माहे, आगष्ट सन १८७५ इसवी,

R. Bullock.
आफिशियेटिंग डिपुटी
कमिशनर अकोला.

## नोटिसा.

इंद्रभान वल्लद दानाजी लासुरकर मुक्काम मंडाळें तालुके अकोलें यांस हरि वल्लद फकिरा तेली उगवेकर याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्माकडून ४१ रुपये पुर्ज्यावरून येणें, त्यापैकीं १८ रुपये तुह्मी वसूल दिलात बाकीं, २३ रुपये व व्याज नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत आणून द्यावे. नाहीं पेक्षां दिवाणी कोर्टांत फिर्याद करून नोटिशीचे व कोर्टाचे खर्चा सुद्धां सर्व रकम तुह्मापासून भरून घेतली जाईल. कळावे तारीख १ माहे सप्तंबर सम १८७५ इसवी.

( सही ) हरि वल्लद फकीरसा तेली
निशाणी खुद्द

### नोटिस.

राजश्री तानकू व धनसिंग वल्लद उदेभान पाटील सदाफळ रहाणार मौजे हातें तालुके बाळापुर यांस जगन्नाथ बलदेव साहू तेल्हारेकर याजकडून लिहिण्यांत येते ऐसे कीं, तुमचे कडून रुपये चार शें १०० प्रत्येक दस्तैवज रुपये २००चा असून दोन दस्तैवजाचे रुपये सदहू चार शें शिवाय व्याज दस्तैवजांत असल्या प्रमाणें येणें आहे तें आज तारखेपासून पंधरा दिवसांचे आंत पटवून द्यावें. नाहीं पेक्षां तुह्मावर फिर्याद करून ह्या नोटिशीचे खर्चासुद्धां कोर्टखर्चासमेत रुपये घेतले जातील. कळावें. तारीख २८ माहे आगष्ट सन १८७५ इसवी

( सही ) जगन्नाथ बलदेव दस्तुर
दाजी जयराम गुमास्ते

### नोटिस.

देवाजी वल्लद गोंदाजी पाटील मौजे बोरमळी प्रगणें बारशी टाकळी यांस नोटिस देणार सिदाजी वल्लद भगवानजी पाटील मौजे शेलगाव प्रगणे बारशी टाकळी तालुके अकोले याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचे रुपये ११० खात्यावरून तुह्माकडे घेणें आहित. याचा करार गुजरून गेला आणि एक दोन वेळा मागितले परंतु रुपये देत नाहीं. करितां या नोटिशीनें कळविलें जातें कीं, सदहू रुपये १५ दिवसांत द्यावे. न दिल्यास खर्चासहित फिर्याद करून रुपये घेतले

जातील कळावे. तारीख ३१ आगस्ट सन १८७५ इसवी

[सही] सिदाजी वल्लद भगवानजी पाटील मौजे शेलगाव निशाणी मोहोर.

नोटिस.

मेसर्स बहिमनजी उकडजी आणि कंपनी दुकान अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुह्मी आह्मास राजुरें प्रगणें वाशिम पथील भट्टीचा मक्ता ६०० सहा शें रुपये यांस ठरवून दिला व आमची कबुलायत तारीख १ एप्रिल सन १८७५ इसवीस घेतली व भट्टीबद्दल लायसेन्स तारीखे १८ माहे जूलै सनमजकुर रोजीं दिलें. त्यामुळें आमची भट्टी तारीख १ एप्रिल पासून तारीख १८ जुलै सनमजकूर पर्यंत बंद राहिली. तेच वेळेस मी नोटिस देत होतों परंतु मला हवेचा उपद्रव होऊन मी मांदा राहिलो याजकरितां हल्लीं या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, साडेतीन महिन्याचे माहेवारीबद्दल रुपये १७५ तुह्मास आम्ही देणार नाहीं. कळावें तारिख ३ माहे सेप्टेंबर सन १८७५ इसवी.

ता. क. लायसेन्स मागितलें असतां मागाहून देऊं ह्मणोन मग मी मलकापुरास गेलों व परत आल्यावर तुह्मी सदर तारखेस लायसेन्स दिलें. हा कसूर माझी नाहीं कळावे.

(सही) किसन वल्लद जानसा कलाल रहाणार राजुरें- दस्तुर खुद.

नोटिस.

रामजी वल्लद भवानी तेली रहाणार आलेगाव यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुजकडेस आमची बाकी रुपये २९ व शिवाय व्याज असें घेणें आहे तें आठ दिवसांत दाखल करावें. न केल्यास फिर्याद करण्यांत येईल. तारीख २ माहे सेप्टेंबर सन १८७५ इसवी.

( सही ) सुंदरसा रामासा आलेगाव दस्तुर खुद

## जाहिराती.

### अकोला ग्रेट इंग्लिश सेंट लेज स्वीप,

किंवा देऊळ बांधण्याकरितां सोडत.

अकोला एथें ता. ११ सप्तंबर रोजीं व्हावयाची.

प्रत्येक टिकिटाची किंमत ५ रुपये.

जितका पैसा जमा होईल त्यांतील निमे क्याथलिक लोकांचे देवळाकरितां दिला जाईल व बाकी राहिलेल्या पैशांतून तीन चतुर्थांशाचें एक व एकचतुर्थांशाचें एक अशीं दोन बक्षिसें दिलीं जातील.

घोड्याच्या नावांच्या चिठ्या एका पिशवींत घालून दुसऱ्या पिशवींत टिकिटांचे नंबर घातले जातील आणि एका पिशवींतून एक व दुसऱ्या पिशवींतून एक अशा दोन चिठ्या एकदम काढल्या जातील. जिंकणाऱ्या घोड्यांच्या नावांच्या चिठ्या बरोबर जे नंबर निघतील त्यांस बक्षिसें मिळतील.

टिकिटें खालीं सही करणाराकडे मिळतील. ता० ४ सप्तंबर सन १८७५ इ.

जे. एफ. पोप
आनररी सेक्रेटरी
अकोला पश्चिम वऱ्हाड.

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

### ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE.

### नोटिस.

**बोरघाटांत पडलेले खडेप वगैरे.**

या लेखाच्या द्वारानें नोटिस देण्यांत येते ऐशी जे आज तारिखेपासून बोरघाटांतून आगगाड्या जाऊं लागल्या आहेत, आणि सर्व प्रकारचा व्यापारी माल पुनः आगगाडींतून थेट नेला आणला जाईल.

परंतु तूर्त आणि पुढें, नोटिस येईपर्यंत उतारू लोकांची जी गाडी सकाळीं ६ वाजून ५० मिनिटानीं मुंबईहून निघून पुण्यास दुपारून ३ वाजतां जाते ती आणि जी पुण्याहून सकाळीं ९ वाजतां निघून मुंबईस दुपारून ५ वाजतां येते ती अशा दोनही गाड्या खंडाळा आणि कर्जत यांच्या दरम्यान नेल्या जाणार नाहींत.

**हेनरी कांडर,**
जनरल ट्र्याफिक म्यानेजर.

मुंबई ता २७ माहे आगष्ट सन १८७५ इसवी.

## वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध ६ शके १७९७

## बाहेरील लोक आणून मोठाल्या जागा भराव्या काय !

हा प्रश्न मोठा विच्यारणीय आहे व हा बहुत प्रसंगीं पुढें येऊन उभा रहातो सबब या विषयीं थोडा विच्यार करणें वावगें नाहीं असें आह्मांस वाटतें.

प्रथमत: 'बाहेरील' हा शब्दच घेऊन विच्यार केला तर तो स्थलमर्यादात्मक दिसतो. लोकांत ह्मण आहे कीं "आधीं घरचे मग बाहेरचे" तसेंच घरांत द्रव्य असलें तर बाहेर ऋण मागण्यास कोणी जात नाहीं. परमेश्वराची योजनाही प्रत्येक मुलास त्याच्या त्याच्या मातुश्रीचे स्तनांत त्याच्या जीवनाकरितां दुग्ध निर्माण करण्याची आहे. तशीच इतर वहिवाट पाहिली तरी गावाला पाटील गावचा असतो, जातीला गुरू जातवाला असतो, दत्तक घेतला तर कुळांतला घेतात व देशाचा अधिपति तत्तद्देशाधिकारीच असतो असे सर्वत्र नियम आढळतात. यावरून बाहेरचा ह्मणजे परकीय, तेव्हां त्यास स्वकीयाचा हक्क नाहीं हें प्रथमदर्शनीं दिसून येतें व याकरितांच कुलाभिमान, जात्यभिमान, देशाभिमान मनुष्य मात्रास अवश्य आहे असें नीतिशास्त्र सांगतें.

आतां दुसऱ्या पक्षाचा विच्यार केला तर कांहीं गोष्टींत कांहीं भिन्न प्रकारही आढळतात. ह्मणजे एकादें मूल जन्मलें ह्मणजे त्याचे मातुश्रीचे स्तनांत कांहीं रोग विकारानें दुग्धच निर्माण होत नाहीं. व कांहीं देशचे श्रीमान लोक आपल्या मुलास मातुश्रीचें दुग्ध पाजितच नाहींत; हल्क्याप्रतीच्या स्त्रियांचे किंवा गाढवीचें पाजतात. कोठें कोठें ग्रामाधिकारी परक्या ठिकाणचे असतात, कोणी कोणी अन्य गोत्रज दत्तक घेतात, कांहीं लोक सुरेख ही स्वस्त्री असतां तिचा त्याग करून बाहेरख्याली होतात. व राजाचें तर ढळढळीत उदारहण ह्मणजे आह्मा हिंदु लोकांच्या देशावर इंग्लंड देशांतले इंग्रज राजे आलेले आहेत. हे वरील नियमास बाधक प्रकार आहेत; तथापि हे सर्व विध्युक्त आहेत असें नाहीं, मातुश्रीचे स्तनांत दुग्धच नसणें हें परमेश्वराच्या अवकृपेचें कारण आहे तेथें मनुष्याचा इलाज नाहीं पण दुग्ध परमेश्वरानें मातेच्या ठायीं निर्माण केलेलें असतां तें नासवून टाकून गाढवीचें पाजावें हा अडदांडपणा होय किंवा ईश्वरी नियमाबाहेरचा शहाणपणाचा एक नमुना ह्मटल्यास चालेल. स्वकुलांत दत्तक घेण्यास न मिळेल तर परकी चालेल पण मिळण्यास शक्य असतां न घेणें ही तबेतीची गोष्ट आहे व मग दासीपुत्र ही चालेल. तसेंच परस्त्रीगमन सर्वथैव निषेधिलेलें असतां त्याचा आदर हें दुर्वृत्तीचें चिन्ह होय. व स्वदेशाला परदेशीय अधिपाती होणें हें स्वदेशाच्या दुर्बलपणाचें व दुर्भाग्याचें लक्षण होय सबब या सर्वास विधि असें ह्मटलें जाणार नाहीं. दुर्मियेत सुधारणा नित्य नव्या होत आहेत ती गोष्ट वेगळी आहे पण एरवीचे दृष्टीनें व मागील ओघानें पाहिलें असतां आमच्या देशाचा राज्यकारभार आह्मास करतां येणार नाहीं किंवा आह्मी मागें कधीं केला नाहीं असें बिलकूल नाहीं. बहुत कालमर्याद हिंदु राजाचेंच हिंदुस्थानावर अधिपत्य होतें व त्यांच्या सुंदर वर्णनाचे हजारो ग्रंथ झालेले आहेत. ह्मणून आह्मांवर जें हल्लीं परकीय राजाचें अधिपत्य आहे तें आलीकडील पूर्वजाच्या मूर्खपणामुळें, इंग्लिशांचा शहाणपणा, धूर्तपणा व जबरदस्तपणा यामुळें आणि ईश्वराच्या इच्छेमुळें प्राप्त झालें आहे ती गोष्ट स्वतंत्र आहे. तथापि आह्मांस शहाणे तरबेज करण्यारितांच ही ईश्वराची योजना असेल असें आह्मी समजतों. व उदार मनाचे आणि हिंदुजन हितेच्छु अशा कित्येक युरोपियन गृहस्थांनीं मोठाल्या प्रसिद्ध सभांतूनही आह्मांस स्पष्ट सांगितलें आहे कीं हिंदु लोकांस शिकविण्याकरितां परमेश्वरानें आह्मांस धाडलें आहे त्याप्रमाणें ते आपला राज्यकारभार पाहण्या योग्य तयार झाले ह्मणजे आह्मी त्यांचा देश त्यांचे स्वाधीन करून देऊन स्वदेशीं परत जाऊं. ही गोष्ट मनांत आणली ह्मणजे बाहिरल्याचा या देशांत हक्क नाहीं हें सिद्ध होतें व त्याच न्यायानें सर्व गोष्टींत बाहेरच्याचा निषेध व्यक्त होतो. अस्तु.

आतां आपण या विषयाला आरंभीं नें सदर घातलें आहे त्याकडे वळूं. सरकारी आफिसांतून कांहीं मोठ्याशा जागा रिकाम्या झाल्या तर त्या भरण्याकरितां लोक बाहेरून आणण्याची खटपट पुष्कळ ठिकाणीं चालू असते व प्रस्तुत इकडेही तसा प्रकार चालू झाला आहे. हें वाचकांस ठाऊक झालेंच असेल.

**कित्येक अधिकाऱ्यांस असें वाटतें कीं वऱ्हाडांत एकाद्या मोठ्या जागेवर** मनुष्य नेमावयाचा तो वऱ्हाडांतला नेमूं नये. मुंबई इलाख्यांतील नवा एकादा हुशार आणावा. पण असें करणें वाईट आहे. एकतर हल्लीं वऱ्हाडांतले कामदाराकडे लक्ष्य पुरवून पाहिलें तर शेकडा पाऊणशें किंवा अधिक लोक वऱ्हाडा बाहेरचेच इकडे आहेत. तेव्हां त्यांतून एकादि निवड करणें हें बाहेरचा एकादा अननुभावीक अधिक गृहस्थ इकडे आणण्यापेक्षां बरें. दुसरें असें कीं, आज ५।१० वर्षें जे मोठ मोठाल्या कामावर लोक आहेत. त्यांची हुशारी, विद्या व इतर गुण अवगुण यांची सहवासानें जशी माहिती अधिकाऱ्यांस झालेली असते तशी बाहेरून येणाऱ्या नवक्या कामगाराविषयींची नसते ह्मणून प्रसंग विशेषीं बाहेरची निवड खात्रीस न उतरण्याचाही संभव आहे. तिसरी गोष्ट अशी आहे कीं वऱ्हाडांत अधिकाऱ्याकडे एकच प्रकारचें काम नसतें. डिपुटी कमिशनरास मुलकी मुख्य काम आहे. त्याचप्रमाणें दिवाणीही काम त्याकडे आहे, शिवाय अठरा कारखाने आहेत. मुंबईकडे दिवाणी व मुलकी हीं खातीं अगदी स्वतंत्र असतात ह्मणून दोहोंचाही वाकब असा मनुष्य मिळविण्याकडे अधिक लक्ष्य पुरवावें लागतें.

वऱ्हाड प्रांतांत नोकऱ्या करण्याचा प्रथम हक्क ह्मटला ह्मणजे वऱ्हाडी लोकांचा आहे. असें असतां त्याची संख्या सरकारी कचेऱ्यांतून थोडीच आढळते. आतां ही गोष्ट खरी आहे कीं वऱ्हाडांत विद्येची प्रसृति नवीन झाली व पूर्वीं इकडे इंग्लिश सरकारचा अम्मल नव्हता ह्मणून इंग्लिश राज्यकारभारास माहितगार व साहेब लोकांची टूक जाणणारे असे पुष्कळ लोक पूर्वीं नव्हते ह्मणून मुंबई इलाख्यांतून बहुत खात्यांत नवीन भरतीचे लोक त्यावेळीं आणिले. परंतु आतां तसा प्रसंग नाहीं आतां इंग्लिश व मराठी जाणणारे, हुशार व सर्व कामांत प्रवीण असे लोक इकडे पुष्कळ आहेत आणि जुनेपणानें ते हक्कदार झाले आहेत सबब त्यांची सवड काढणें युरोपियन अधिकाऱ्यांस अवश्यक व योग्य आहे असें आह्मास वाटतें. वऱ्हाडांत सहा जिल्हे आहेत व त्यांतून मोठ मोठ्या हुद्यावर कित्येक नेटिव गृहस्थ इंग्लिश व मराठी जाणणारे तरबेज असे

आहेत. विद्यालयांतून हुशार व नीतिमान असे कित्येक गृहस्थ मुलकी खात्याकडे घेतलेले आहेत व अजूनही त्या खात्यांत कित्येक लोक मुलकीकडे क्लार्क, तहशिलदार वगैरेच्या जाग्यास सर्व प्रकारें योग्य होतील असे आहेत. सबब थोर अधिकाऱ्यांनीं एकाद्याप्रसंगीं एकाद्या कडून विलग घडलेल्या गोष्टीवरून त्रासरूप होऊन एकदम सर्व लोकांविषयीं आपलें मन दूषित करावें हें त्यांच्या सज्ञानतेस, विशाल दृष्टीस, व दयालुतेस न शोभण्यासारखें आहे. ह्मणून त्यांस आह्मी शिफारस करितों कीं देशांतील लोकांस शांत ठेवावें, त्यांचें दुःख दूर करावें आणि सुख वाढवावें अशा हेतूनें महाराणी साहेबांनीं त्यास आमच्या इकडे प्रतिनिधि नेमिलें आहे तर त्यांनीं हा मुख्य हेतु लक्षांत ठेवून लोक समुदाय असंतुष्ट राहील असें सहसा कधीं कांहीं करू नये. यांत त्यांस भूषण व कीर्ति आहे व त्यांत हजारो लोकांचें कल्याण आहे.

## वऱ्हाड.

हैदराबादचे फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट मेजर टवुइडी साहेब रजा घेऊन विलायतेस जाणार त्यांचे जागेवर क्या० जी एच- ट्रेव्हर यांस नेमिलें व त्यांचे जागेवर मि० फिटझरल्ड सिविल सर्व्हिस यांस नेमिलें.

---

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं आमचे मित्र मि० शेख हिसामुदीन साहेब सिकंदराबादचे थर्ड क्लास असिस्टंट पोलिटिकल एजंट यांचा एक वर्ग वाढला ह्मणजे ते आफिशियेटिंग सेकंड क्लास असिस्टंट पोलिटिकल एजंट झाले. कर्नल जोन्स साहेब तेथील पोलिटिकल एजंट यांनीं नोकरीचा राजीनामा दिल्यानें यांस ही बढती मिळाली.

---

शाळा खात्यांतील मास्तर लोकांच्या बळवंतराव पाटील यांची जागा भरण्याच्या संबंधानें वर्गावर्गी झाल्या होत्या त्याप्रमाणें ते सर्व लोक पहिले तारखेस आप आपले नवे जागेवर जाऊन रुजू झाले.

---

अडगावचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यानीं आपले शिरस्तेदार, नाजर व कित्येक कारकून यांच्या बदल्या कराव्या अशा विषयीं रिपोर्ट केला आहे व त्याप्रमाणें कांहीं जणांच्या बदल्या होतील असें कळतें. असें झाल्यास आमचे हुशार रामराव व्यंकटेश कोठें जातील पहावें.

---

वाशिमचे डिपुटी शिरस्तेदार मि० बदरुदीन हे आठ दिवसांची रजा घेऊन मलकापुरास आपले घरीं गेले आहेत. त्यांचे चुलते नुकतेच मरण पावले त्यांचे उत्तर कार्यप्रसंगास ते तिकडे गेले आहेत.

---

मंगरूळ तालुक्यास मि० शाबास खान यांस कायमचे तहशिलदार नेमिलें व त्यांचे हाताखालीं वाशिम पैकीं मि० शितळसिंग फारेस्ट दरोगे यांस नायब तहशिलदार नेमिलें असें समजतें.

जुडिशियल कमिशनर साहेबांची स्वारी सेशनाकरितां बुलढाण्यास आज जाणार.

---

अकोल्यास येणारे नवीन तहशिलदार रा. रा. भास्कर महेश्वर मोरशीहून निघाले ते आज उद्या येथें येतील.

---

या आठवड्यांतल्या हिंदुस्थान सरकारच्या ग्याझेटावरून समजतें कीं, मि० ई. जे. किट्स सिविल सर्व्हिस यांस वऱ्हाडांत आफिशियेटिंग थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर नेमिलें. हे अकोल्यास येणार असेंही ऐकण्यांत आलें आहे. गेल्या आठवड्याच्या प्रमोदसिंधूंत लिहिलें होतें कीं बंगाल्याकडून दोन सिविल सर्विस वऱ्हाडाकडे येणार आहेत त्यापैकींच हे एक असावे. दुसऱ्याची नेमणूक याच आठवड्यांत कां झाली नाहीं तें समजत नाहीं. गेल्या आठवड्यांवत मुंबई सरकारानें एक सिविल सर्विस मि० फिटझरल्ड साहेब हैदराबादेस असिस्टंट रेसिडेंटीच्या कामाकडे दिले व आणखी दुसरे येणार असले तर सिविल सर्विसवाल्यांची आवड तूर्त इकडे जास्ती उत्पन्न झाली आहे असें दिसतें. आमचे रेसिडेंट साहेब सिव्हिल सर्व्हिस आहेत. त्यांचे एक असिस्टंट सिव्हिल सर्व्हिस आहेत. प्रस्तुतचे आमचे आफिशियेटिंग डायरेक्टर सिव्हिल सर्व्हिस आहेत व मि. किट्स साहेबाची एक नवीन नेमणूक झाली आहे यावरून तसें अनुमान निघतें.

---

गेल्या आठवड्यांत पर्जन्याविषयीं आह्मी काळजी दर्शविली होती पण या आठवड्यांत बहुतेकदिवस वेळा चांगला पर्जन्य पडून लोकांस मोठा संतोष झाला. नदीला पूरही दोन वेळां आले होते काल ही पावसाचा गंड मोडला नाहीं. सायंकाळचा पूर फार मोठा होता.

---

कर्नल नेंभार्ड साहेब कमिशनर याची स्वारी पेपरकरेन्सी आफिसाचे तपासणी करितां ९ वे तारखेस येथे येणार आहे. दर सहा महिन्यांनीं ही तपासणी होत असते.

---

मि. दस्तुर बहिमनजी जामासजी साहेब असिस्टंट कमिशनर हे रजिस्टर खात्याचीं दप्तरें पहाण्याकरितां काल तालुक्यांत गेले आहेत. खामगावाकडे प्रथम जाऊन नंतर बाळापुरास जातील. तालुक्यांतील खजिनाही दर तीन महिन्यांनीं तपासीत जावा असा नियम झाला आहे व तेंही काम ते करून येतील.

---

यवतमाळचे जुडिशियल शिरस्तेदार रा. आत्माराम अनंत हे जुडिशियल कमिशनर साहेबांस भेटण्याकरितां येथें आले आहेत.

---

मेजर जेमिसन साहेब पोलिस सुपरइंटेंडेंट रजेवर गेले होते ते पहिले तारखेस परत आले.

---

अकलकोटाबर सुकदेव पुरणमल्ल मारवाडी याचे घरांत तिसावे तारखेस रात्रीं दोन चोरटे शिरून त्यांनीं माडीची भिंत ही फोडून द्रव्याच्या खोलीपर्यंत लगट केली होती. इतक्यांत घरच्या माणसांनीं आरोळी केली त्यामुळें ते पळून गेले. चोरांचा पत्ता अजून लागला नाहीं. त्यांची घोंगडी जोडे, शिडी वगैरे सामान मिळालें आहे. तपास चालू आहे.

---

**यवतमाळ**— या जिल्ह्यांत जो नवीन तालुका केला त्याचें नाव पांढरकवडा न ठेवितां सरकारानें केळापुर असें ठेविलें आहे. व तेथें मि० शेषांचलं मुदलियार यांस सहा महिन्यांचे प्रोबेशनावर तहशिलदार नेमिलें आहे.

या जिल्ह्यांत च्यार तालुके मिळून १२ देशपांडे लोकांस मुनसरीमच्या जागा पहिले तारखे पासून मिळाल्या.

नवीन तालुका केळापुर येथें वणीचे ५० रु. पगाराचे नायब तहशिलदार रा. तुकाराम कृष्ण यांस नेमिलें. व त्यांचे जागेवर यवतमाळचे तितक्याच पगाराचे नायब तहशिलदार रा. पुरुषोत्तम पांडुरंग यांस नेमिलें. व यवतमाळास रा. त्रिंबक गणेश परांजपे डिपुटी कमिशनर आफिसांतील २० रुपयांचे कारकून यांस ३५ रु० वर नायब तहशिलदार नेमिलें. हे तरुण गृहस्थ हुशार असून बुलढाण्याचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. वामन गणेश यांचे बंधू आहेत.

या जिल्ह्यांत महामारीचा उपद्रव बराच चालू आहे. सुमार नागपंचमीस या रोगाची सुरवात झाली तेव्हांपासून हाकालपर्यंत १८०० मनुष्यें आजारी झालीं व त्यांतून ६०० मरण पावलीं असें कळतें.

या जिल्ह्यांत पाऊस वेळोवेळ फार चांगला व पिकाचे उपयोगी असा पडत आहे.

इकडे नायब तहशिलदारीवर अकोल्याचे पोलिसपैकीं शेख हैदर येणार अशी वार्ता होती. परंतु लगा साधला नाहीं असें वाटतें.

---

रा. रा. गोविंदराज अय्या येथील तहशिलदार येथून जातांनां ग्रामस्थांनीं व तालुक्यांतील जमीदार व रयत लोकांनीं त्यांकरितां सभा केली होती तींत त्यांस सरकारमार्फत पाठविण्याकरितां एक मानपत्र तयार केलेलें वाचून दाखविलें तें असें:—

**मानपत्र.**

आह्मी अकोलें शहरांतील व तालुक्यांतील रयत व जमीदार लोक रा. रा. गोविंदराज अय्या तहशिलदार तालुके अकोला यांची बदली झाल्यांमुळें ते उदईक येथून जाणार याजकरितां त्यांस मानपत्र देत आहो तें येणेंप्रमाणें.

१ आपण आमचे तालुक्यास सुमार ७ वर्षें तहशिलदार होता तितक्या काळांत आपण लेकराप्रमाणें आमचें संरक्षण केलें. केवळ सरकारी हुद्याच्याच जोरानें आपण आह्मासी वागलां नाहीं. तसे वागणारे कामदार रयतेचें नुकसान अगर गैरसोय होवो आपला अंमल बजाविला ह्मणजे झालें असे बहुत करितात त्याप्रमाणें आपण केलें नाहीं आह्मावर आपण फार ममता केली व तसें करून सरकारी कामांत यत्किंचितही कसूर होऊं दिली नाहीं. त्या आसल्या मायाळूपणाच्या वागणुकीकरितां आपले आह्मांस बहुत कालमर्याद स्मरण राहील.

२ आपण गावगन्ना बहुत ठिकाणीं चावड्या नव्हत्या तेथें नवीन चावड्या करविल्या, नादुरुस्त चावड्यांची दुरुस्ती केली. धर्मशाळा केल्या कित्येक ठिकाणीं आरामासाठीं झाडें लाविली, बाजारासाठीं चबुत्रे केले इत्यादि कामामुळें गावगन्ना मोठी सोय झाली आहे ह्मणून त्या त्या गोष्ट जावत्कालपर्यंत दृष्टीपुढें राहातील तावत्काल आयली स्मृति आमचे हृदयांतून जाणार नाहीं.

३ आपणास इंग्लिश भाषा चांगले प्रकारें येत आहे. २० वर्षांपूर्वी आपण रायटर होता ८।९ वर्षें तहशिलदार आहा. मध्यें थोडे दिवस कमिशनर साहेबांचे क्लार्क आफ धि कोर्ट होता; आणि आलीकडे ह्मणजे एक महिन्यापूर्वीं आपण जाइंट एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर होता व एक महिन्यांत ६४२ मुकदम्यांचे आपण फैसल केले असे वर्तमानपत्रावरून आह्मांस समजलें आहे व त्याबदल कमिशनर साहेबांनीं आपली फार तारीफ केली आहे व आभार मानिले आहेत असेंही आह्मास ठाऊक झालें आहे. तसेच आपणास इंग्लिश येत असल्यामुळें या सदर स्टेशनच्या गावाला अधिकारी लोकांस आपला मोठा उपयोग होत होता असें आमचे पाहण्यांत आहे इत्यादि सर्व कारणांवरून आपलें स्थलांतर येथून होणार नाहीं, निदान बढतीशिवाय तरी होणार नाहीं अशी आह्मांस मोठी उमेद होती परंतु तसें कां घडून आलें नाहीं याचें कारण सरकारास व परमेश्वरास ठाऊक- अस्तु. आपले येथून जाण्यानें आह्मी फार दुःखी आहो.

४ आपण आह्मा अडाणी लोकांस चांगले रीति रिवाज शिकविले. कोणास रामराम कसा करावा हें सुद्धां आह्मा पैकीं बहुत जणाला ठाऊक नव्हतें. गावगन्ना सरदार लोक आले तर ते वेड्या सारखे त्यांचे तोंडाकडे पहात उभे राहात, त्यांनां आपण नीट समजून सांगून सलाम करण्याची व अदबीनें वागण्याची उत्तम रीत लावून दिली याबद्दल आपलें स्मरण गावोंगाव बहुत दिवस राहिल.

५ आमच्या मुलांस शाळांत पाठविण्याविषयीं व त्यांस सुशिक्षण देण्या विषयीं आपण आह्मास वारंवार बोध करीत होता व शाळांतून जाऊन मुलांच्या परीक्षा घेऊन त्यांस उत्तेजन देत होता व मास्तर लोकांस मदत करीत होता याबद्दलचीही आपली आठवण लवकर बुजणार नाहीं.

६ अकोले शहरांत आपण बहुत वर्षे म्युनिसिपल कमिटीचे मेंबर, म्यानेजिंग कमिटीचे मेंबर व बऱ्याच कालमर्याद सेक्रटरी होता; व त्यासंबंधानें आपण कोणास त्रास न देतां लोक सुखाकडे लक्ष्य देऊन आपण उत्तम काम केलें ही आपली याद्गिरी आह्मांस बहुत दिवस राहील.

आतां आमची इतकीच इच्छा आहे कीं, सरकारानें आपले हुशारीवर व मेहनतीवर नजर देऊन मुनसफीच्या ज्या मोठ्या जागा होणार आहेत त्यांपैकीं एक आपणास द्यावी व उत्तरोत्तर आपली बढती आणि कीर्ति असावी व आपण चिरायु असून कुटुंबांतील सर्व प्रकारचीं सुखें ईश्वरकृपेनें आपणास अनुकूळ असावीं.

## वर्तमानसार

प्रिन्स आफ वेल्स यांच्या करितां मुंबईस दीपोत्साह होणार त्याकरितां २ लक्ष ल्हान ल्हान दिवे विलायतेहून मागविले आहेत.

मुंबई हायकोर्टाचे आनरबल जस्टिस पिन्ही साहेब तीन महिन्यांची रजा घेऊन विलायतेस जाणार.

आनरबल बी. एच एलिस साहेब यानीं नोकरीचा राजिनामा दिला.

या सालच्या जानेवारी पासून जून पावेतों सहा महिन्यांत हिंदुस्थानांतील सरकार दिमतीच्या रेलवे कंपन्यांस गुदस्त सालच्या याच सहा महिन्याच्या उत्पन्नापेक्षां ७० लक्ष रुपये कमी उत्पन्न झालें. यांत फक्त ईस्ट इंडिया रेलवेचे ६६ लक्ष रुपये कमी आहेत. गुदस्त सालीं जी अधिक रकम वसूल झाली ती दुष्काळ निमित्ताची होय.

मि० करी साहेब इंदुरचे लोकलफंड इंजिनियर यांस १५०० रुपये पगार करून बडोद्यास दरबार इंजिनियर करणार.

बडोदें. नारायणभाई यानीं ८०००० रु. दंड देऊन आपली सुटका करून घेतली. हरीबा दादानीं दीड लक्ष रुपये दंड दिला.

नागपुर व रायचूर जिल्ह्यांत महामारा चा उपद्रव विशेष आहे.

बडोद्याचे रिविन्यु कमिशनर मि० पेस्तमजी जांहागीर हे राजिनामा देणार.

इंदुरचे दिवाण सर रघुनाथराव पुन्हा मद्रासे कडे डिपुटी कलेक्टरचे कामावर परत जाणार असें वर्तमान आहे.

आग्रा येथील यमुनेच्या नवीन पुलाची तपासणी झाली. आता तो लवकरच चालू करितील.

विलायतेस लार्ड मेयो यांचा पुतळा स्थापन केला.

गोव्याचे पोर्तुगीस सरकारानीं रेलवे करण्याचा विच्यार मनांत आणिला आहे. ही रेलवे बंदर मुरुगावापासून सुरू होऊन धारवाडावरून बल्लारीपर्यंत जाणार व एक शाखा बेळगावासही आणणार असें वर्तमान आहे. गोवा सरकार आपले राज्यांतील भागाची २ रुपये शेकडा प्रमाणें हमी भरणार व ९९ वर्षे पर्यंत हक्क ठेवणार. काम सुरू झाल्यापासून ४ वर्षांत पुरें होईल.

बडोद्याचे वसंतराव भाऊ याजवर ५० हजार रुपये दंड ठरविला तो मिळेना ह्मणून ते अजून कैदेंतच आहेत.

लिटलगो पास झालेले विद्यार्थ्यां शिवाय कोणास ग्रांट मेडिकल कालेजांत घ्यावयाचें नाहीं असा पुढील साला पासून ठराव होणार आहे.

भावनगरास अजून महामारीचा उपद्रव पुष्कळ आहे नित्य १५।२० मनुष्यें मरतात-

रा. सा. काशिनाथ महादेव थत्ते यांस नाशकास मामलेदार नेमिलें.

श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांस मद्रासेस नेहमीं ठेवण्याचा ठराव झाला असें दिसतें. ते घोड्यावरून फिरावयास निघतील तेव्हां त्यावरोबर पोलिस सारजंट फिरावयास जात जावा ह्मणून त्याला एक घोडा खरेदी करून दिला आहे.

श्री० मल्हारराव गायकवाड यांस दरमहा साडे बारा हजार रुपये प्रमाणें मार्च महिन्या पर्यंतची नेमणूक मिळाली.

### अविचाराची नोटिस.

( रा. ब. नारायण भिकाजी जोगळेकर. )

गेल्या बुधवारच्या ज्ञानचक्षूंत पुण्याच्या टौनहाल कमिटीच्या सेक्रेटरीस, "नारायण भिकाजी जोगळेकर" या सहीची नोटिस पाहून आह्मांस आश्चर्य वाटतें. पुण्याच्या टौनहालच्या इमारतीकारितां मशारनिल्हे जोगळेकर यांनीं शंभर रुपये बक्षीस दिले. पुढें गांवांत दयानंद स्वामीचीं व्याख्यानें होऊं लागलीं तीं जोगळेकरांस न आवडून तीं ज्यांस आवडतात त्या मंडळी कडे १०० रुपये दिल्याचा पश्चात्ताप झाला. त्यामुळें ते रुपये परत घेऊन वेदशाळा स्थापन करण्याकडे द्यावे अशी बुद्धि झाली. हे रुपये परत मागण्याकीरतां त्यांनीं रा. रा. माधवराव मोरेश्वर कुंटे टौनहाल कमिटीचे सेक्रेटरी यांस चिठ्ठी पाठविली; परंतु त्यांनीं रकम दिली नाहीं व लेखी उत्तरही पाठविलें नाहीं. याजमुळें जोगळेकर यांस राग येऊन त्यांनीं ज्ञानचक्षूंत ते रुपये वेदशाळा फंडाचे खजीनदार नातु यांजकडे पाठवून द्यावे अशी नोटिस दिली. आतां याचा काय निकाल होईल तो पाहावा. खटला दिवाणी कोर्टांत दिवाणे होण्यापर्यंत जातो किंवा कसें तें पाहावें. सदर जोगळेकर हे दक्षिणभाग रेविन्यु कमिशनर यांचे असिस्टंट आहेत तेव्हां ते शिकलेले व समजुतदार असावे; परंतु त्यांचें हें अपूर्व कृत्य व धर्मसंबंधी विचार व ऐहिक सार्वजनिक देशहित यांजबद्दल त्यांच्या मनाचा घोटाळा पाहून लोकांस सहजच त्यांच्या संबंधानें आश्चर्य वाटेल. यांजसारख्या चौघांत वागणाऱ्या गृहस्थास आपले धर्मसंबंधी खासगी विचार एकीकडे ठेवून सार्वजनिक स्वदेशहितसंबंधाच्या गोष्टींत एकविचारानें झटण्याचें समजत नाहीं, तेव्हां आगदीं साधारण मनुष्या इतपत देखील यांस समज नाहीं असें ह्मटलें पाहिजे. विलायत वगैरे सुधारलेल्या देशांत अनेक धर्ममतें व पंथ आहेत; परंतु हे खासगी ज्याच्या त्याच्या पारलौकिक हिताचे असतात तेव्हां ते एकीकडे ठेवून त्यांजविषयीं घोटाळा ऐहिक देशहिताच्या कामांत आणित नाहींत ह्मणून ते एवढ्या योग्यतेस पावले. हें आमचे लोक पाहात असतां नेहमीं धर्मसंबंधानें वैमनस्यें वाढवून आपलें नुकसान करून घेतात! पुणेंकर मंडळी आलीकडे अशा वेड्या वांकड्या व क्षुल्लक कारणासाठीं वैमनस्य वाढवून आपली अप्रतिष्ठा करून घेऊं लागली हें पाहून आह्मांस फार वाईट वाटतें. वक्तृवसमारंभाचे वेळेसारखे व या नोटिशीसारखे अपमानास कारण असे आणखी फार्स पुण्यांत होणार नाहींत अशी आह्मीं आशा करतों. रा. ब. जोगळेकर, यांच्या आलीकडील देशहिताच्या कामांतील उत्सुकतेवरून त्यांस कोणी तरी अप्रबुद्ध व असमंजस मनुष्यांनीं भुरळ घालून या घोटाळ्यांत घातलें असावें असें आह्मांस वाटतें. ते पुनः याचा चांगला विचार करतील अशी आह्मी आशा करतों.

इं. प्र.

## दुःखाचा उपयोग.

दुःख हें वाईट आहे असा सर्वांचा समज आहे आणि आपलें व इतरांचें होईल तितकें दुःख कमी करण्याविषयीं सर्व लोक उद्युक्त असतात, परंतु नीट विचार करून पहातां असें लक्षांत येईल कीं दुःख हें सर्वांशीं वाईट ह्मणजे आपलें अनहित करणारें व सुख सर्वांशीं आपलें हित करणारेंच आहे असें नाहीं. पुष्कळदा दुःखापासून निःसंशय आपलें कल्याण होतें. आपल्या आत्म्याची उन्नति होण्यास सुख आवश्यक आहे तितकेंच दुःखही आहे. यास्तव सुखा इतकेंच दुःख इष्ट आहे. कोणतीही गोष्ट खरोखर आपल्या हिताची आहे किंवा नाहीं याची परीक्षा पहावयाची तर तीपासून तात्कालिक बरें किंवा समाधान वाटतें हें पाहून उपयोग नाहीं. तर आमचें एकंदर जीवित किंवा आचरण तिजपासून चांगलें होतें किंवा वाईट होतें हें पाहिलें पाहिजे. आनंद किंवा सुख हें आपणा सर्वांस सहजच प्रिय वाटतें. तें आपणास आवडतें होण्यास दुसऱ्या कोणाची शिफारस, किंवा दुसरा कांहीं हेतु लागत नाहीं. आबालवृद्ध सर्व त्याच्या मागें लागले असतात. परंतु दुःखाचा प्रकार असा नाहीं. दुःखासाठींच दुःख कोणासही आवडत नाहीं. तें दर्शनीच अप्रिय व त्याज्य असें आहे, परंतु जे कोणी वरवर केवळ स्वरूपानेंच तृप्त न होतां शांतपणें श्रम घेऊन दुःखाविषयीं खोल विचार करितात त्यांस मात्र त्याचा गूढ अर्थ समजतो. मनुष्याला भवितव्य ह्मणून कांहीं आहे. आपणास कांहीं भवितव्य आहे असा भाव असल्यानें मनुष्यें व राष्ट्रें मोठेंपणाप्रत पावतात. आतां या भवितव्याची सिद्धि होण्यास ज्यापासून सहाय्य होतें तें हित. आणि ज्यापासून त्या सिद्धीस प्रत्यवाय होतो तें अनहित असें समजावें. आह्मी असें समजतो कीं हल्लीं आहेत याहून श्रेष्ठ व आध्यात्मिक संबंध किंवा स्थिति भोगण्यास योग्य व्हावें हें मनुष्याचें भवितव्य आहे.

आतां शारीरिक व मानसिक सुखांपासून असे संबंध किंवा अशा स्थिति प्राप्त होण्याचा संबंध कधीं असेल किंवा कधी नसेलही; या कार्याच्या सिद्धीस शारीरिक व मानसिक सुख जसें अवश्यक आहे तसेंच दुःखही आहे असें वारंवार अनुभवास येतें. यावरून जी उन्नतस्थिति पावण्यासाठीं परमेश्वरानें आह्मास निर्माण केलें आहे ती प्राप्त करून घेण्यास सुख जसें अवश्यक आहे तसेंच दुःखही आहे असें होतें. कोणी कदाचित् अशी शंका घेतील कीं, दुःखामुळें कधीं कधीं नीच अवस्था प्राप्त होति; यास उत्तर हेंच कीं, सुखाचाही परिणाम पुष्कळदा असाच होतो. त्यांत अंतर ह्मणून एवढेंच कीं, दुःखापासून होणारी नीचावस्था उघड व निवारणीय असते, परंतु सुखामुळें होणारी नीचावस्था लक्षांत येत नाहीं अशी असून आंतून अधिक नाश करिते. सुखामध्यें इंद्रियसुख एक मोठें सुख आहे खरें; परंतु या सुखाची कोणीही विच्यारवान किंवा धर्मशील मनुष्य फारशी योग्यता समजत नाहीं. बाकी सुखाविषयीं पाहिलें तर, सुखाच्या इतकाच दुःखाचा उपयोग दिसतो. दुःख अनंत नाहीं परंतु सुख अनंत आहे परमात्म्याच्या ठायीं जें पूर्ण सुख आहे त्याकडे मनुष्य निरंतर जात आहे. मनुष्याची जी स्थिति आपण हल्लीं पहातों तिच्या संबंधानें हें आम्हीं लिहित आहों. या स्थितीमध्यें दुःखांपासून सुटका नाहीं त्यापेक्षां तें आपण विनम्रभावानें ग्रहण करावें आणि त्याचा गूढार्थ समजून घेऊन शिक्षण पावावें हेंच आमचें उत्तम कर्तव्य आहे. सुखाच्या पाठीस लागणें यांत कांहीं शहाणपण नाहीं कारण जो कोणी मनुष्य ईश्वर आपणाला ठेवील त्या स्थितींत समाधान न मानतां आपण आपल्याच पराक्रमानें आपली अवस्था बदलूं पहातो तो त्या यत्नांत फसतो मात्र. परंतु जें दुःख परमात्मा आपण होऊन धाडतो तें खरोखर आमच्या कल्याणासाठीं होय.

सु. प.

## नोटिसा.

राजु भोई मेहतर वस्तीं वाडेगाव यांस शिवाजी जयराम दुकान कसबे मजकूर याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मा कडे पुर्ज्यावरून रुपये १२५ शिवाय व्याज घेणें आहे ते मागितले असता देत नाहीं त्यावरून नोटिस दिली आहे तर नोटिस पोचल्यापासून ८ दिवसांत रुपये आमचे दुकानीं आणून द्यावे न दिल्यास स्माल काज कोर्टांत फिर्याद करून नोटिशीचे खर्चा सुद्धां रुपये घेण्यांत येतील, तारीख २ सप्तंबर सन १८७५ इसवी.

( सही ) शिवाजी जयराम दुकान
वाडेगाव तर्फे बहिवाटदार
रामजी पुनाजी गुमास्ते

नोटिस

दत्तु वल्लद परभ्या चांभार वस्ती कसबे वाडेगाव तालुके बाळापूर यास शिवाजी जयराम दुकान वाडेगाव याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी सुंदरलाल धरमचंद याचें देणें सुमार १२५ टक्के आहे आणि सुंदरलालची सर्व देवघेव आम्ही विकत घेतली आहे त्यांत तुह्माकडील येणें ही त्यानें आह्मा कडे लावून दिलें आहे तें तुह्मास मागितले असतां देत नाहीं सबब ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर नोटिस पोचल्या पासून ८ दिवसांत खर्चासुद्धां सर्व रुपये आमचे दुकानीं आणून द्यावे नाहीं पेक्षां तुह्मावर अकोल्याचे स्माल काज कोर्टांत फिर्याद केली जाईल व फिर्यादीचे खर्चासह सर्व रुपये भरून घेण्यांत येतील कळावे तारीख २ माहे सप्तंबर सन १८७५ इसवी.

( सही ) शिवाजी जयराम दुकान
वाडेगाव तर्फे वहिवाटदार
रामजी पुनाजी गुमास्ते
दस्तुर खुद्द

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

REGISTERED NO. 5 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० १२ माहे सप्तबंर सन १८७५ इ० अंक ३७

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लो
कांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज
पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE

## नोटिस.

## मुंबईस धान्य आणण्याचे भाड्याचे दर कमी करण्याविषयीं

जाहिरखबर देण्यांत येतें कीं येते सप्त
बर महिन्याची तारिख १ रोजीं व त्यानंत
र जबलपुरा पलीकडील रेलवेच्या स्टेशना
वरील व होळकर स्टेट रेलवेच्या स्टेशना
वरून व जबलपूर आणि खंडवा व नागपू
र आणि बदनेरा यां मधील सर्व स्टेशनां
वरून या रेलवेंतून फक्त मुंबईस पाठविले
ल्या धान्याचे भाड्याचे दर कमी करण्यां
त येतील.

सदरहू स्टेशनांपैकीं कोणतेही स्टेशना
वर अथवा खालीं सही करणारास अर्ज
केल्यास या विषयींची सर्व माहिती
मिळेल.

हेनरी कांडर
जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई तारीख २७
आगस्ट १८७५ इ.

## नोटिसा.

अब्राहिम शापुयल इस्त्रायल नंबर टेक
र मुक्काम शिगाव रेलवे स्टेशन यांस मली-
का बापाचें नाव सिलेमान मुक्काम अकोला
इजकडून नोटिस देण्यांत येते कीं माझे
वडिलानीं तुह्माशीं माझें लग्न करून दिलें
त्याप्रमाणें मी तुह्माबरोबर असतां नवऱ्याचे
धर्मास अयोग्य अशा बहुत गोष्टी तुह्मी म
जकडून करविल्या. हमेशा दुसरे पुरुषाक-
डेही तुह्मी मला पाठवून आपणास फाय-
दा करून घेत होता, कित्येक भल्या मनु-
ष्यांवर नहाक तुफान घेऊन त्यांना वमला
सरकार दरबारांत नेत होता, दोन च्यार
वेळां तुह्मी मला आईही ह्मटलें आहे व घ
रांतून हाकूनही दिलें आहे. अशा बहुत
गोष्टींवरून या उपर मी तुह्माशीं लग्नाचा
हक्कसंबध ठेवूं इच्छित नाहीं. जो नवरा
आपले बायकोस दुसऱ्याकडे पापकर्मासा
ठीं पाठवितो तो नवरा काय कामाचा? व
तशा जवळ रहाण्यांत फार अनीति व ई-
श्वराची अवकृपा खचित होणार याजकरि
तां या नोटिशीनें मी तुमचा लग्नाचा हक्क
संबध आजपासून तोडल्याची तुह्माला जा
हिरखबर देते. संसार संबंधी सुख परमेश्व-
रानें माझे कपाळीं लिहिलें नाहीं असें मी
समजतें व आतां पोटासाठीं दाळ पीठ
विकण्याचें दुकान मी अकोल्यास घातलें
आहे त्यावर निर्वाह करून राहीन. तुमचा
माझा अर्थाअर्थी कांहीं संबध राहिला ना
हीं असें तुह्मी पक्कें समजावें व माझी आ-
शा सोडावी. इतक्या उपर माझ्या मार्दीं
राहाल व सरकार दरबार कराल तर मी
जबाबास सिद्ध आहे. व असा वादविवाद
चालण्यांत तुमचे मात्र विनाकारण नुकसा
न होणार आहे. माझे दैवाची तर परीक्षा
होऊन चुकली आहे तेव्हां मला कोण-
तीच डर राहिली नाहीं. कळावें तारीख
३ माहे सप्तंबर सन १८७५ इसवी.

( सही ) मलीका बापाचें नाव
सिलेमान दस्तुर खुद्द.

नोटिस.

अमीरखां रोहिला वस्ती पेठ देऊळगाव
राजा तालुके सिंदखेड यांस खालीं सही
करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें
कीं तुह्मी हापिजुदीन ऊर्फ पापामिया
वस्ती सिंदखेड यां जवळून आमचे घर ग
हाण ठेवल्याचा खोटा दस्तैवज करून
घेतल्याबद्दल तुमची जबान तहशिलदार
साहेब तालुके चिखली यांचे कचेरींत ता
रिख २८ माहे आगष्ट सन मजकूर रोजीं
मी ऐकिली. तर पापामिया याचा हक्क
आमच्या मकानावर कांहींच नाहीं ही
गोष्ट तुह्मास माहीत असून खोटा दस्तै
वज करून माझें नुकसान करण्याचे इरा
द्यानें त्याचा उपयोग कराल तर मी तुह्मा
दोघांवर फौजदारींत फिर्याद करीन. तुम
ची योग्यता इतकी नाहीं कीं, दोन तीन
शें रुपये देऊन खरा दस्तैवज करून घ्या
ल कारण तुह्मी आपले घरचेच डागिने
दोन दोन चार चार रुपयावर गहाण ठे
ऊन उदरनिर्वाह करिता त्याअर्थीं तो द
स्तैवज केलेला खोटा आहे. याजबद्दल
तुह्माकडून काय जबाब आहे तो नोटिशी
नें ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसां
चे आंत द्यावा. कळावें. तारीख १
माहे आगष्ट सन १८७५ इसवी.

(सही) अमूमिया वल्लद कासमअली
वस्ती देऊळगाव राजा
दस्तुर खुद्द.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या
मतास मिळूनच असतील असें समजूं नये

### मे. डाक्टर सिंक्लेयर साहेब यांच्या स्मारक कृत्याविषयीं सूचना.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. आपल्या तारीख २९ माहे
आगस्ट सन १८७५ चे अंकांत कैलास
वासी मे० डाक्टर सिंक्लेयर साहेब यांच्या
स्मारककृत्याबद्दल झालेल्या सभेची हकीक
त ऐकून मला फार आनंद झाला. सर्वा-
नुमतें २ हजार रुपये फंड जमवून त्याचें
व्याज वर्षास ५० रुपये उत्पन्न करावें
व तें मुंबईंतील म्याट्रिक्युलेशनचे परीक्षेंत
संस्कृतामध्यें व हिंदुस्थानीमध्यें पास हो-
णाऱ्या पहिल्या मुलास पाळी पाळीनें
बक्षीस द्यावें असा ठराव झाला. आतां
याविषयीं मला थोडें सुचाविणें आहे तें
आपण कृपा करून प्रसिद्ध करावें.

साहेब बहादुरांच्या कृपेचा अनुभव सर्व
लहान मोठ्या मास्तरांस अंशतः आहेच;
याकरितां मुंबईंत पास झालेल्या विद्यार्थ्यांस
ते रुपये दिल्यानें सर्व वऱ्हाडभर तें मनो-
हर व अतिप्रिय नांव गाजणार नाहीं, व
सर्व मास्तरांचे कानीं येणार नाहीं. दुसरें,
म्याट्रिक्युलेशनची परीक्षा पास होणारास
वीस रुपयांची स्कालरशिप वगैरे मिळण्याच्या
तजविजी आहेतच, याकरितां भरीवर भर
टाकण्यापेक्षां दुसरा कांहीं जर पैशाचा उ
पयोग होईल तर चांगलें होईल.

दरसाल पन्नास रुपये ही रकम फार
थोडी आहे यामुळें हाय स्कुलांत त्यांची
स्कालरशिप वगैरे करितां येत नाहीं हें उ
घड आहे; परंतु मला वाटतें कीं कोणत्याही
युक्तीनें ते रुपये एन्ट्रन्स परिक्षेसमयीं ये-
णाऱ्या मुलांस मिळावे अशी योजना झाली
पाहिजे. तेणेंकरून सर्व वऱ्हाडभर त्या
बक्षिसाचा गवगवा राहून मोठा चमत्कार
होणार आहे. दुसरें ते रुपये थोडथोडे
कां होईनात परंतु पुष्कळ मुलांस मिळावे
ते बुकाच्या वगैरे रूपानें न मिळतां रोख
व मिळावे ह्मणजे जो तो मुलगा खुळखुळ
रुपये वाजवीत सिंक्लेयर साहेबांचे रुपये
सिंक्लेयर साहेबांचे रुपये असें ज्यास त्यास
सांगत जाईल तेणेंकरून सर्व वऱ्हाडभर
त्या गोड नांवाचा ध्वनि उत्पन्न होऊन
आबाल वृध्दांस आनंद होईल.

एका विद्यार्थ्यास पन्नास रुपये मिळ-
ण्यापेक्षां २५ मुलांस दोन दोन रुपये मि-
ळतील तर तो आनंद विशेष आहे. मिड
ल क्लास स्कुलांतून परिक्षेत जाणारीं कित्ये
क मुलें इतकीं गरीब असतात कीं, त्यांस
दोन रुपये मिळाल्यानें दोन शें रुपये मि
ळाल्याचा आनंद होणार आहे. आपली
रकम लहान आहे याकरिता तिची किंमत
अशा रीतीनें जास्त केली पाहिजे.

आतां उड्या वगैरे मारणाऱ्या मुलांस
बक्षिसें देण्याकरितां या रुपयांचा उपयोग
करावा, तर तें कृत्य सिंक्लेयर साहेबांच्या
आवडीचें केल्यासारखें होणार नाहीं; या
करितां मला वाटतें हें शुष्क बक्षीस शुष्क
गोष्टीकडे योजून साहेब बहादुरांच्या स्वभा
वासारखेंच त्या देण्यांत लकब आणावी.
ती अशी कीं, जो राम शद्बाच्या आठही
विभक्ती एकादमास बिनचूक ह्मणेल त्यास
दोन रुपये बक्षीस. याप्रमाणें ५ बक्षिसें
योजावीं. तसेंच पांच मनुष्यांच्या सामान्य
नांवाची व्युत्पत्ति सांगेल त्यास दोन रुपयां
चें बक्षीस ; अशीं पांच बक्षिसें असावीं.
याप्रमाणेंच हिंदुस्थानीकडे पांच व दुसऱ्या
ही कित्येक गोष्टींकडे अशाच मानानें यो-
जून म्यानेजिंग कमिटीनें त्याची व्यवस्था
दरसाल करावी.

एका हिंदू मुलास एके सालीं पन्नास
रुपये मिळाल्यावर पुन्हा हिंदूची पाळी
यावयास दोन वर्षे वाट पहात बसले पा-
हिजे. तोंपर्यंत साहेब बहादुराच्या नावा
चा विसरही पडून जाणार आहे. याक-
रितां वर सुचविलें आहे अशा प्रकारची
कांहीं योजना या रुपयांची होईल तर
मला वाटतें फंडही मोठा जमेल. कारण
त्याबद्दल आनंदाचा हिस्सा मुलांच्या द्वारें
मास्तरांस मिळणार आहे, याकरिता सर्व
मास्तर त्यांत आपली वर्गणी घालतील.
नाहीं तर कित्येक हेकड मास्तर ह्मणतील
कीं, फंड जमवून मुंबईस जाणाऱ्या मुलास
बक्षिस देणार, आमच्या शाळेंतील मुलास
तर कांहीं आशा नाहीं. जाऊं द्या अशा
करितां कोण वर्गणी देतो. असे प्रकार
उत्पन्न होतील. माझ्या सूचनेप्रमाणें कांहीं
तजवीज झाल्यास फंड उत्तरोत्तर वाढून
बक्षिसें जास्त होतील व सर्वांस त्याबद्दल
आशा राहून खरोखर स्मारककृत्य होणार
आहे. असो पत्रविस्तार फार झाला. क
ळावें तारीख १ सेप्तेंबर १८७५ इसवी,

एक सूचक.

मुक्काम मुळावा जिल्हा वाशीम
ता. १९।८।७५ इ-

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि खालीं लिहिलेल्या चार ओ-
ळी आपणाकडे पाठविल्या आहेत त्यास
आपल्या पत्रांत जागा द्यावी,

येथें तारीख १५ आगस्ट सन १८७५
इसवी रोजीं सरकारी मराठी शाळेंत मोठी
सभा भरली होती, त्यावेळीं गावांतील
विद्वान, शेट सावकार व इतर गृहस्थ जम
ले होते. या पूर्वीं या ठिकाणीं असा समु-

काय कधींही जमला नव्हता. सभेचे उद्देश दोन होते.

१ गावांत एक ग्रंथालय स्थापणें.

२ मुलींकडून विद्याभ्यास करविल्यापासून फार फायदा आहे एवढ्याकारितां आह्मी आपल्या मुलीं शाळेंत पाठवूं आणि त्या मुलींची संख्या अजमासें २५ पंचवीस पर्यंत जमेल तर अशा प्रकारची शाळा आपले गावीं असावी अशाविषयीं सरकाराकडे अर्ज करणें.

सभेंत अध्यक्षस्थानीं रा. रा. बाळकृष्ण भाऊ सेवाळकर हे होते. व सभेचें सर्व काम रा. रा. गणेश वामन पटवर्धन हेड मास्तर याणीं चालविलें.

सुमारें पांचशें लोक सभेस जमले होते. पटवर्धन याणीं भाषण केलें. त्यांत इंग्लिश लोकांची व हिंदुस्थानांतील लोकांची पूर्वींची व सांप्रतची स्थिति यांमध्यें तुळणा केली व अशी इंग्लिशांची स्थिति उत्तम दशेस कशानें आली. व नेटिव्ह लोकांस इतकी निकृष्ट दशा कशानें आली याचीं कारणें चांगल्या प्रकारें सांगितलीं त्यावरून सर्वांनीं ग्रंथालय आपले गावीं असावें अशाविषयीं आपली संमति दिली व त्याबद्दल जो खर्च लागेल तो वर्गणी करून देण्याचें ठरावेलें व पाटील पांड्याकडून एक याद तयार करून लोकांकडून वर्गणीचे आकडे त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें त्यांस घालण्यास सांगितलें. मग कोण कोणतीं पुस्तकें व वर्तमानपत्रें आणवावयाचीं व लायब्ररीकरितां काय काय करावयाचें त्याच्या विच्यारा करितां एक म्यानेजिंग कमेटी नेमिली व तिच्याकडे सर्व गोष्टी सोंपविल्या.

या गावांत आजपर्यंत फार घाण होती तिचा बंदोबस्त सरकारानें चालविला आहे. सडका वगैरे सुधारणा तमाम चालल्या आहेत. गावास गोडे पाण्याची मोठी हरकत आहे. एवढ्याकारितां शाळे जवळ एक गोडे पाण्याची विहीर आहे, ती पुन्हा उपसावी असा विचार चालला आहे.

महामारी — मुळावें व उमरखेड व सभोंवतालचीं खेडीं पाडीं वगैरेकडे या बाईचा फार सपाटा उठला आहे. रात्रं दिवस या बाईची काळजी लागून आहे. इकडे सत्कर्माविषयीं पुष्कळ प्रकारें विचार चाललेले आहेत. गांवोगांव जेवणें पोथ्या, भजन, पूजन व पारायणीं चाललीं आहेत. या योगेंकरून ईश्वर तिचें लौकर निवारण करो आणि आह्मा गरीब प्राण्यांस जीवदान देवो अशी मागणी मागतों. तारीख १९ माहे आगष्ट सन १८७५ इसवी.

एक क्ष.

## वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध १२ शके १७९७

### वऱ्हाडांतील पाण्याच्या व रस्त्याच्या सोयी आणि अंपें तापें एथें होणारा तलाव.

वऱ्हाडांत काहीं भागाला पाण्याच्या सोयी फार उत्तम आहेत व कांहीं ठिकाणीं उष्णकाळांत पाण्याचें फार दुर्भिक्ष्य असतें. फार लांबची गोष्ट कशाला? या लगत्यासच अडगाव, जळगाव वगैरे ठिकाणी पाणी विपुल असून घरोघर एक एक दोन दोन विहिरी गोड्या पाण्याच्या आहेत व कांहीं काहीं गावाला एकही विहीर नाहीं आणि कोठें कोठें कांहीं विहिरी खाऱ्या पाण्याच्या मात्र आहेत. पयोष्णी नदीला दोन्ही बाजूनें खडक नसल्याकारणानें गावाची वसाहत नदीचे काठापासून दूर झालेली आहे व त्यामुळें उन्हाळ्या दिवसांत आणि एरवी तरी त्या गावांनां पाण्याचा फार ताप होतो. तो दूर होण्याकरितां सरकार थोडथोड्या तजविजी योजित आहे हें पाहून आह्मांस संतोष वाटतो.

या वऱ्हाड प्रांतामध्यें इंग्लिश सरकारचा अंमल होऊन आज सुमार २२ वर्षें झालीं. इतक्या कालाच्या मानानें पाहिलें असतां इकडे सर्व खात्यांत पुष्कळ सुधारणा झाली आहे असें दिसून येतें व ती दिवसानुदिवस जास्त व्हावी असा सरकारचा इरादा आहे. गेल्या एक दोन सालांत हिंदुस्थान सरकारानें आपला असा हेतु दर्शविल्याचें आमचे ऐकण्यांत आलें आहे कीं, वऱ्हाडांत कोणीं अम्मलदार व्यापाराच्या वृद्धीसाठीं खात्रीपूर्वक माहितीनें मोठाले रस्ते करण्याची सूचना कारितील, तसेंच पाण्याची आपत्ती असल्या ठिकाणीं तळीं, विहिरी, पाट, बंधारे वगैरे करण्याविषयीं सूचना कारितील तर त्या आम्ही अगत्यपूर्वक मान्य करूं व तीं कामें करण्याविषयीं पैशाचें सांगशन करूं.

हिंदुस्थान सरकारच्या या परवानगीवरून वऱ्हाडांतील सर्व अधिकाऱ्यांनीं आपआपले जिल्ह्यांत किती रस्ते बांधणें अवश्य आहे त्याविषयीं विच्यार करून सरकारास लिहून कळविलें आहे. त्याचप्रमाणें पाण्याबद्दलच्या व्यवस्थेविषयींही सर्व अधिकारी झटत आहेत असें आमच्या समजण्यांत आलें आहे. आतां त्यांतील वेगवेगळ्या गोष्टीविषयीं जशी आह्मास विशेष माहिती मिळेल तशी आम्ही आपले वाचकांस कळवूं. आह्मांस वाटतें कीं वऱ्हाडांत पाण्याचें दुर्भिक्ष्य ह्मटलें ह्मणजे या जिल्ह्यांतील अकोट तालुक्यांत व पयोष्णी नदीच्या दोन्ही बाजूस पाच सहा मैलांचे टप्प्यांत जे गाव वसलेले आहेत त्यांत विशेष आहे व तें दूर करण्याचे कामीं या जिल्ह्यांतील अधिकारी फार लक्ष्य पुरवित आहेत. त्यामुळें आजपर्यंत बऱ्याच कामाचीं सांगशनें झालीं व कामाच्या सुरवाती झाल्या. मौजे पुंड, मौजे घुसर येथें तलाव बांधण्याचें काम चाललेलें पुरेंही झालें. व मौजे रेल आणि मौजे वरूड येथील नद्यांस बंधारे बांधण्याचीं कामें चालू आहेत. व सरकारांत सांगशनाकरिता आणखीही कित्येक कामें पाठविण्याचा क्रम सुरू आहे असें ऐकतों.

मौजे अंपें तापें तालुके अकोलें एथें एक तलाव बांधण्याचे हेतूनें नुकतीच मोजणी झाली ती आह्मी पाहिली. तत्संबंधी नकाशे ईस्टमेट वगैरे आमचे पहाण्यांत आलें नाहीं व तें तयार झालें किंवा नाहीं तेंही समजलें नाहीं. त्याविषयीं ठोकळ माहिती अशी आहे कीं तलाव करण्याकारितां त्या गावीं बांध कामाचा जो बधारा घालणार आहेत त्याची लांबी ५०० फूट व उंची १२ फूट धरून सुमार १५००० रुपयांचे खर्चानें तें काम होईल असें करणार आहेत व तेणेंकरून या तलावाचें पाणी तीन मैल मागें तुंबेलें जाऊन मध्येंतरीं कोठें कोठें तलावाची रुंदी १०० फुटांहूनही जास्त होईल. असेंही ऐकलें कीं या तलावापासून पूर्व किनाऱ्यावर एक लहानसा पाट काढणार, त्याची लांबी २ मैल करून त्यावर सुमार ३०० एकर जमीन बागाईत करणार.

अशा कामांतील माहितगार असे आमचे एक मित्र अंपें तापें येथें गेले होते त्या वेळीं त्यांनीं तें स्थळ पाहिलें व त्यांच्या मनांत आलेले विच्यार त्यांनीं आह्मांस कळविले ते असे:—

अशी उत्तम जागा अशा अवश्य ठिकाणीं असतांही जितका मोठा बंधारा असावा असें आह्मांस वाटतें तितका घालण्याविषयीं सरकारचा उद्योग चालू नाहीं याचें कारण काय असेल तें असो, ही जागा पाहिली ह्मणजे ईश्वरानें तलाव करण्याच्याच हेतूनें ही उत्पन्न केली असावी असें वाटेंत. या जागेचा आकार कांहींसा लांबट दगडी खलासारखा असून मध्यंतरीं ओढा आहे. ह्मणजे ओढ्याच्या दोन्ही बाजूस उंच उंच टेकड्या असून त्या टेकड्या परस्परांशीं अर्ध चंद्राकार वळणानें कांहीं वेळ जाऊन जेथें बंधारा घालण्याकरितां जागा पाहिली आहे तेथें येऊन अगदी मिळाल्या सारख्या झाल्या आहेत. व या टेकड्यांवर सुमार पाऊण पाऊण कोसांचे अंतरानें अपोथी बुदरूक, अपोथी खुर्द, अंपेतापें, अथतवाडा, अनकवडी, आणि रामाबाद अशीं सहा गावें वसलेलीं आहेत. तेव्हां या जागीं मोठा तलाव झाला असतां सदरील साही गावांस पाणी पुरेल इतकेंच नाहीं. तर आतां जितकी जमीन भिजली जाणार तिच्या दसपट जमीन भिजेल. व हा देखावा फार रमणीय होऊन साऱ्या वऱ्हाडांत हें एक उत्तम व मनोहर असें स्थल होईल.

हे आमच्या मित्राचे विच्यार आह्मी इंजिनियर खात्याच्या अधिकाऱ्यांपुढें ठेवितों. व त्यांस अशी शिफारस करितों कीं सदरील कल्पना खरी व होण्यास शक्य अशी असेल तर त्यांनीं तिच्याकडे आपली मेहेरबानीची नजर पुरवून लोकांचें सुख व देशाची संपत्ती अवश्य वाढवावी. हा आमचा लेख आमच्या या प्रांताचे मुख्य सरकार मेहेरबान रेसिडेंट साहेब यांच्या ही कृपावलोकनांत येऊन ते इंजिनियर खात्याच्या अधिकाऱ्यांस त्यांचीं याविषयीं चीं मतें कळविण्यास शिफारस करतील व हें काम सदरील कल्पनेप्रमाणें तयार करवितील तर फार चांगलें होईल.

### पंडित दयानंद सरस्वती व गाढवाची स्वारी!

पुण्यास अलीकडे कित्येक दिवस पंडित दयानंद सरस्वती या नावाचे एक स्वामी आले आहेत. ते वेदाचे अर्थ सांगतात व वेदावरून व्याख्यानें देतात. वेदांत मूर्तिपूजेचा निषेध सांगितला आहे असें ते ह्मणतात. त्या व दुसऱ्या त्यांच्या कित्येक चांगल्या मतांवरून अलीकडील बहुत लोक त्यांचा आदर करितात व त्यांचीं व्याख्यानें ऐकतात. नाशकास, मुंबईस अमदाबादेस वगैरे कित्येक ठिकाणीं त्यांचीं व्याख्यानें झालीं व हल्लीं तीं पुण्यास चालू आहेत. पुणें शहर ह्मटलें ह्मणजे तें जुन्या व नव्या दोन्ही चालीच्या लोकांचें आगरच होय. तेव्हां मूर्तिपूजाभिमानी धर्मश्रध्धालु लोकांत दयानंद सरस्वती यांच्या व्याख्यानांचा गवगवा झाला. व दुफळी झाली. मग असें होऊं लागलें कीं, दयानंदानीं एके ठिकाणीं एकादे विषयाचें प्रतिपादन केलें कीं, ग्रामस्थ शास्त्रीलोकांनीं दुसरे ठिकाणीं त्याविषयाचें खंडण करावें असा प्रकार चालला. वेदाधारें सुधारल्या मताचें प्रतिपादन होऊन त्यांतून नुसतें वेद घोकणें उपयोगी नाहीं असें मत निघालें पाहून जुन्या लोकांनीं नुसते वेद घोकण्याची शाळा स्थापन करण्याविषयीं खटपट केली. नवीन प्रतीचे लोक टाउनहाल बांधण्याची खटपट करूं लागले. तेव्हां त्यांत दयानंदासारखीं व्याख्यानें होणार ह्मणून रा. ब. नारायण भिकाजी जोगळेकरासारखे गृहस्थ टाउनहालास दिलेला पैसा परत घेऊन वेद शाळेस देण्याकरितां नोटिसा देऊं लागले व एवढ्यावरच जरी हा प्रकार येऊन रहाता तरी बरें झालें असतें, पण जुन्या लोकांचा याहूनही नीचपणा एके गोष्टींत दिसून आला तो असा:—

पंडित दयानंद सरस्वती यांचीं व्याख्यानें ज्या लोकांस मानवलीं ते त्यांची मिरवणूक करूं लागले व त्याप्रमाणें गेले रविवारीं रात्रौ दयानंद लष्करांतून मिरवत मिरवत बुधवारांत येत असतां तद्विरुद्ध मताच्या कांहीं लोकांनीं मंडयींत एक गाढव पकडला, त्याजवर शालजोडी घातली, फुलांच्या माळा घातल्या, पुढें वाजंत्री लावलें, व मोठे थाटानें त्याचीही मिरवणूक काढून बुधवारांत दयानंदाच्या मिरवणुकीशी आणून तिचा सामना केला. पुढें मार हाणही बहुत झाली. व गाढवा बरोबरच्या लोकांचा समुदाय फार मोठा होता ह्मणून दयानंदास व त्याचे अनुयायास सुरक्षितपणें घरीं जाण्यास मोठी पंचाईत पडली. शेवटीं पोलिस येऊन त्यानीं गाढवास पकडून कोंडवाड्यांत नेलें व दयानंद आणि त्यांची मंडळी यांस घरीं पोचाविलें. पुढें कोंडवाड्यांत तो गाढव मरण पावला असें कळतें.

पुण्यासारख्या शहरांत भररस्त्यावर असे हजारो लोक बिथरून धर्म संबंधांत दंगा व्हावा व लोकांचीं मनें अशीं अस्व

स्थ व्हावीं ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. पंडित दयानंद चांगलीं व्याख्यानें देतात व धर्माचे आधार जे वेद त्यांवरून चांगले उपदेश करितात तर त्याचा परिणाम चांगला होऊन जुन्या लोकांच्याही समजुती दुरुस्त होतील असें आह्मांस वाटत होतें. पण तसें न होतां अविच्यारानें दुराग्रह प्रबळ झाला व लोकांचा एकोपा मोडून ते एकमेकास शत्रू झाले ही गोष्ट फारच वाईट झाली, अशी आह्मी अपेक्षिली नव्हती. जुने लोकांतही पुणें शहरीं चांगले श्रीमान, प्रतिष्ठित, विद्वान, व समंजस असे लोक बहुत आहेत त्याचप्रमाणें नव्यांतही बहुत आहेत असें असतां त्यांतून कोणीच विवेक केला नाहीं व गोष्ट धसाला लाविली हा त्यांच्या शहाणपणास मोठा बट्टा होय असें आह्मांस वाटतें.

अलीकडे दोन तीन आठवडे जुन्या लोकांचीं मनें त्रियरलीं आहेत असें त्यांच्या वर्तणुकीवरून दिसत होतें त्याचसमयीं नव्या लोकांनीं पंडित दयानंद यांची बोळवणी करावयाची होती. निदान व्याख्यानें तरी कांहीं काल बंद ठेवावयाचीं होतीं ह्मणजे आगीवर तेल पडलें नसतें. व पंडितास नव्यांनीं मिरविलें ह्मणून जुन्यांनीं गाढवास मिरवून पंडितास गाढवाचें सादृश्य आपल्यामतें ठरविण्याचा मूर्ख प्रयत्न केला तो टळला असता. ज्यांनीं गाढवास मिरविलें त्यांचें तर तें अति निंद्य कर्म होय यांत संशय नाहीं पण असें होण्यापर्यंत दुसऱ्या बाजूच्या लोकांनीं मजल कां येऊं दिली? याबद्दल आह्मी त्यांस टपका देतों, व आशा करितों कीं पुढें तरी अशी बंडाळी शिकलेल्या लोकांनीं होऊं देऊं नये. खरी विद्या ज्यांच्या ठायीं उपतिष्ठली आहे त्याचें हें ज्ञान नव्हे कीं, त्यांस प्रसंग व कर्तव्याकर्तव्य कळूं नये. असो झाली गोष्ट बेत नाहीं पण आतां तरी मूर्तिपूजेविषयींचीं भांडणें, शास्त्रें, पुराणें खोटीं ह्मणण्याचीं भांडणें उगीच वितंड वादानें निकरास नेऊन आज गाढवाच्या योग्यतेस पंडितास नेवविलें तसें पुढें त्याहून कोणा नीचाच्या योग्यतेस दुसऱ्या कोणास नेववूं नये व अथोपर त्यांनीं फार जपावें अशाकरितां आह्मी मनोभावें सुशिक्षित लोकांची प्रार्थना करितों.

## वऱ्हाड.

मुंबई ग्याझेटनावाच्या इंग्रजी वर्तमानपत्रांत अशी कंडी प्रसिद्ध झाली होती कीं आमचे निजाम सरकार महाराणीसाहेबांचे चिरंजीव प्रिन्स आफ् वेल्स यांचीं भेट घेऊं इच्छित नाहींत व ही बातमी लंडनाहून त्यांच्या बातमीदारानें तारेतून पाठविली अशा सदराखालीं प्रसिद्ध केली होती व तीवर टीकाही हमेशाच्या सांप्रदायाप्रमाणें ग्याझेटानें पुष्कळ करून निजमास व त्याच्या सलागार लोकांस दोष दिला होता. पण पुढें काय झालें कोण जाणें, त्यांचे त्यांनांच वाईट वाटून त्यानीं लिहिलें कीं, सदरहू वर्तमान खोटें आहे.

असें एकादें वर्तमान हिंदुस्थानांतील प्रजेविषयीं किंवा संस्थानिकाविषयीं लिहिण्यास ग्याझेटकर्ता हातखंडा होय. मग त्यास त्याच्या देहाचेंही भान रहात नाहीं इतका तो बरळत सुटतो. पण जबरदस्त आहे त्यास काय उपाय? अस्तु. या बातमीचें खरें मूळ इतकेंच आहे कीं गवरनर जनरल साहेबांनीं निजाम सरकारास विच्यारिलें होतें कीं प्रिन्सच्या भेटीस कलकत्ता मुक्कामीं कित्येक राजे रजवाडे येणार आहेत, तर आपण याल काय? त्यांनीं कळविलें बहुधा येणें होणार नाहीं. दिवाण साहेबांनीं व सर्व मंत्री लोकांनीं निजाम सरकारचें वय अति अल्प असल्यामुळें व एवढा मोठा प्रवास त्यांच्यानें सुखानें करवणार नाहीं इत्यादि कारणामुळें तसें कळविलें तरी पण यावरून निजाम सरकार भेट घेऊं इच्छित नाहींत असा ग्याझेटच्या मताप्रमाणें त्या जबाबांतील कोणत्याही शद्वाचा अर्थ निघत नाहीं. कदाचित प्रिन्स हैदराबादेस गेले तर मोठ्या उत्साह बुद्धीनें व आदर सत्कारानें निजाम सरकार त्यांस भेटणार आहेत. व हैदराबादेस असा थाट झाला नाहीं तरी ते कलकत्यास ही आपले दिवाण व कांहीं सरदार लोक या समारंभाकरितां पाठविणार आहेत.

इंग्लिश सरकारच्या रीति रिवाजाविषयींची तऱ्हा उत्तम व अपूर्व आहे. मराठी राज्यांत एकादा तहशिलदारही केवळ राजाप्रमाणें मुखत्यार असतो पण यांच्या राज्यांत गवरनरास देखील तो हक्क नाहीं. नुकतीच अशी गोष्ट घडून आली कीं सर रिचर्ड टेंपल साहिब बंगालचे लेफ्टिनेंट गवर्नर १९ दिवस आसाम प्रांतांत फिरत होते तर अकौंटट जनरल यांनीं त्यांचें पगाराचें पत्रक पास करते वेळीं तितके दिवसांचा त्यांचा पगार कापला! कारण तशी लेखी आर्डर त्यांचे दप्तरी नव्हती.

कर्नल फ्रेजर हैदराबादचे रेसिडेंट साहेबांचे मिलिटरी सेक्रेटरी हे विलायतेस जाणार ह्मणून दिवाण सर सालरजंग साहेब यांनीं त्यांस व त्यांबरोबर इतर युरोपियन लोकांस एक मोठी टेलिजंग मेजवानी दिली.

रा. रा. माधवराव हरि सहस्त्रबुध्धे, उमरावतीचे क्लार्क आफ धि कोर्ट हैदराबादेहून सोलापुरास परत येऊन राहिले होते ते पुन्हा गेल्या आठव्ड्यांत हैदराबादेस परत गेले. नाजर प्रकरणाचे सर्व कागद पत्र आतां इकडून हैदराबादेस रवाना झाले आहेत तेव्हां त्यांच्या प्रकरणाचा काय निकाल होतो तो पाहावा. त्यांच्या तीन महिन्यांच्या रजेतून आतां सुमार सवा महिना शिलक राहिला आहे.

नारायण महिपत माजी नाजर याचे चिरंजीव सदाशिव नारायण हे हैदराबादेस आहेत त्यांचें अपिलाचाही अजून कांहीं निकाल झाला नाहीं. इकडे त्यांच्या सर्व जिनगीचा लिलाव तकूब केला तो अपिलाचा परिणाम समजण्याकारितां नव्हे. नाजराचे एका मुलीनें आपले दागिने बापाचे जिनगी बरोबर विकले जात आहेत ते परत मिळावे असा अर्ज केला होता व त्यावरून तिच्या दागिन्यांची विक्री तकूब करण्याविषयीं हुकूम आला, परंतु संदिग्ध पणावरून सर्वच विक्री तकूब केली असें समजतें.

कर्नल नेंभार्ड साहेब कमिशनर संकेताप्रमाणें ९वे तारखेत संध्याकाळीं उमरावतीहून येथें आले होते व १०वे तारखेस त्यांनीं पेपरकरेन्सीकडील तपासणी केली व दोनप्रहरचे गाडींतून लागलेच परत गेले.

मि० दस्तुर बहिमनजी साहेब डिस्ट्रिक्ट रजिस्टर तालुक्यांत पाहणीकारितां गेले होते ते ९वे तारखेस परत आले, पुन्हा जाणार आहेत.

पर्जन्य मागल्या व या आठवड्यांत अतिशय कंटाळा येण्याजोगा पडला. लोक त्रासून गेले, घरें व भिंती पडत होत्या आणि पिकाचें नुकसान होईल कीं काय असा धाक वाटत होता पण, शुक्रवारापासून चांगली उघाडी झाली आहे यावरून संतोष वाटतो.

अकोल्यास भाद्रपदमासीं गणपतीचा उत्साह चांगला ह्मणण्याजोगा रा. रा. देवराव विनायक वकील यांचे येथें प्रतिवर्षीं होत असतो तो या सालींही झालाच, पण शाळाखात्याकडील हेड क्लार्क रा. रा. वामनराव बाळाजी ओझरकर यांचे येथेंही गुदस्तापासून उत्साह सुरू झाला आहे तो या वर्षीं फार चांगला झाला. गणपतीची मूर्ति व इतर कांहीं चित्रें खानदेशांतून चोपडे एथून आलेले एक गृहस्थानीं सुबक केलीं आहेत व क्युरेटर आफिसांतील रा. भाऊराव यादव कारकून यांनीं एक मखर तयार केलें आहे. त्याचें जाळी कामाची व त्यांतील चित्रांची वगैरे कातरणी अत्युत्कृष्ठ आहे असें कौशल्य थोड्याच ठिकाणीं पाहण्यांत येईल. साधारण पदवीच्या गृहस्थांतही असे झाकलेले गुण परमेश्वर ठेवितो व ते प्रसंगवशात उघाडीस आणून त्याचें मोल करितो हें मोठें समाधानकारक होय.

अकोला पोलिसांतील हेड कानस्टेबल रा. रामचंद्र पांडुरंग याचा गेले शनिवारीं रात्रीं एके रांडेशी कांहीं तंटा झाला त्यांत तिनें त्याचे कपडे वगैरे त्याचे अंगावर फेकून दिले त्याबरोबर तरवारही फेकून दिली. ती त्याचे पायावर लागून थोडी जखम झाली आहे असें समजतें. रामचंद्र फिर्यादीस गेला नाहीं पण पोलिसानें या तंट्याचा तपास करून रांडेवर मुकद्दमा सुरू केला. रामचंद्र आस्पिटलांत आजारी असल्यामुळें खटला तकूब आहे.

मि० इमामबेग हुसेनीबेग येथील हवाखान्यावरील हिंदुस्थानी शाळेचे ३० रुपयांचे हेडमास्तर यांस मंगरूळास तहशिलदार कचेरींत १५ रुपयांचे कारकुनीची जागा मिळाली व ते तिकडे जाणार असें समजतें. मुसलमानांमध्यें मराठी भाषा चांगली समजणारे, हुशार व बुद्धिमान असे जे कित्येक गृहस्थ त्यांतील हे एक आहेत ह्मणून पुढच्या बढतीच्या आशेकरितां आज मोठा तोटा करून घेऊन हे मुलकी खात्यांत शिरत आहेत त्याप्रमाणें त्यांचे हेतु सफल व्हावेत व त्यानीं नीतीनें वागून उदयास यावें असें आह्मी इच्छितों.

वणी- येथें हवेचा उपद्रव चालला असतां येथील हुशार व दक्ष तहशिलदार रा. रा. अंबादास संतो हेही त्या झपाट्यांत सापडले होते. यांस तारीख २३ आगष्ट रोजीं रात्रीं हा उपद्रव सुरू होऊन एकदम प्रकृती बेताल होऊन गेली. परंतु येथील नेटिव डाक्टर खुदाबकस यानीं अतिशय मेहेनत घेऊन तहशिलदार यांस मृत्यूचे दाभाडांतून मोठ्या शर्तीनें ओढून घेतलें. पुढें दोन च्यार दिवस लघवी वगैरे बंद झाली होती परंतु ईश्वर कृपेनें त्याबद्दल उपाय होऊन हल्लीं प्रकृति चांगली दुरुस्त झाली आहे. आतां ते हवा पालटण्याकरितां एक दोन दिवसांनीं यवतमाळास जाणार आहेत. तहशिलदार यांस हा उपद्रव होतांच गावांतील रोग कमी होत चालला व हल्लीं येथें आगर भोंवतालचे खेड्या पाड्यांतही ह्मणण्यासारखा नाहीं. वणी येथें एकंदर सुमार १७१ मनुष्यें आजारी झालीं- व त्यां पैकीं सुमार च्याळीस मरण पावलीं- तारीख २६ आगष्ट रोजीं येथें कांहीं बलिप्रदान झालें, त्या दि[illegible] सर्व हपिसें व स्कुलें वगैरे बंद होतीं. गावांत कोणी फिरूं नये व तळूं नये दळूं नये वगैरे प्रकारचीं दवंडी पिटवली होती. हल्लीं पर्जन्य विपुल पडत आहे व सर्व यथास्थित आहे परंतु तळ्यास पाण्याचा एक थेंब ही आला नाहीं ही अडचण दिसूं लागली आहे.

मागाहून आलेली नोटिस.

महादु वल्लद बळाजी कुंभार बस्ती मौजे धनज तालुके मूर्तिजापुर यास खालीं सही करणाऱ्या पंचांकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमची लग्नाची बायको नामे यमुना इच्याशी तुमचें लग्न लागल्यास सुमार १२ वर्षें झालीं. लग्न लागल्या दिवसापासून तुह्मी तिला नेलें नाहीं. हल्लीं ती पोर वयांत आली, तिनेंही तुह्मास गुदस्त सालीं नोटिस दिली त्याचा जबाब दिला नाहीं. तुह्मी तिजला नेलेंही नाहीं. मानाजी कुंभार टेलोरी याचे घरीं लग्न झालें तेव्हां जातीनें सांगितल्यावरून तुह्मी आठ दिवसांनीं नेतों ह्मणून कबूल केलें; परंतु अद्यापवर तिला नेऊन नांदवित नाहीं. आमच्याकडे तिनें अर्ज केल्यावरून हल्लीं आम्ही पंच या काज्जचा निकाल करण्यास अकोलें मुक्कामीं जमलों आहों तर तुह्मी तारीख २० सेप्तेंबर सन १८७५ इसवीचे आंत या गावीं यावें आणि बायकोस घेऊन जावें. या मुदतींत तुह्मी न आलां तर तुमची हकीकत कांहीं एक न ऐकतां व तुमची वाट न पहातां ती जातिभ्रष्ट होईल अगर एकादें वाईट काम करील तर तें दोषास व दुर्लौकिकास कारण होईल ह्मणून आम्ही तिला महुतर लावण्याची परवानगी देऊं हें तुह्मास कळावें. तारीख ११ सेप्तेंबर १८७५ इसवी.

[ सह्या ]

१ शिवा वल्लद नारायण मेहेतर बाळापुर निशाणी खुद्द.

१ गंगाजी वल्लद धर्माजी कुंभार उगवेकर निशाणी खुद्द.

१ पामाजी वल्लद रामाजी कुंभार मालेगावकर निशाणी खुद्द.

१ नागूजी वल्लद बद्राजी मेहेतर अकोलेकर निशाणी हिराजीची

१ धनाजी वल्लद दिनाजी कुंभार बोरगावकर निशाणी खुद्द हातची

## वर्तमानसार

सार्वजनिक सुधारणेच्या कामाकरितां इंदूर सरकारानें एक लक्ष रुपये खर्च करण्यास काढले आहेत.

हिंदुस्थान सरकारानें असें प्रसिद्ध केलें आहे कीं प्रिन्स आफ वेल्स यांच्या भेटीस जे राजे लोक येतील त्यांनीं आपले बरोबर लवाजमा बेतापुरताच अणावा. व त्यांस फार खर्च येऊं नये ह्मणून आम दरबार भरविण्याचा बेतही सरकारानें रहित केला आहे. तसेंच भेटीकरितां जे राजे रजवाडे येतील त्यांनीं प्रिन्स यांस नजराणे देण्याची जरूरी नाहीं. गवरनर जनरल ज्या दरजानें राजे रजवाड्यास भेटतात किंवा राजे रजवाडे त्यांस भेटतात त्याच दरजानें प्रिन्स व हिंदुस्थानचे राजे रजवाडे भेटतील. नजराण्याची मनाई केली आहे यावरून कोणी राजे प्रिन्स यांस आपले राज्यांत होणाऱ्या व अपूर्व अशा कांहीं चिजा आपले संतोषानें देऊं इच्छितील तर त्यांचा असंतोष करावा अशी हिंदुस्थान सरकारची इच्छा नाहीं. याजकरितां तशा वस्तू देऊं इच्छिणारे लोकांनीं पोलिटिकल एजंट किंवा त्यांच्या दिमतीस जे युरोपियन अधिकारी असतील त्यांच्या मार्फतीनें आपण प्रिन्स यांस अमुक जिन्नस अमुक प्रकारचा व अमुक किंमतीचा देऊं इच्छितों असें अगाऊ कळवावें. ह्मणजे तो जिन्नस स्वीकारला जाईल. तदितर स्वीकारला जाणार नाहीं असें हिंदुस्थान सरकारानें सर्वांस कळविलें आहे.

बडोद्यास हायकोर्टांतील जडजाचे एके जागेवर रा. रा. जनार्दन सखाराम गाडगीळ इंदुप्रकाशाचे मालक यांस नेमलें असें समजतें. हायकोर्टांत एकंदर तीन जडज होणार आहेत—मि० अंबालाल साकरलाल देसाई एम. ए; एल. एल. बी. यांस महाराजांचे शिक्षक नेमणार असेंही समजतें.

मुंबईस महाराणी साहेबांचे चिरंजीव येणार त्यानिमित्त खर्च होणार तो.

| | रुपये. |
|---|---|
| शोभेकडे | ३०००० |
| दीपोत्साह | ३०००० |
| विद्यार्थ्यांस मेजवानी | १२००० |
| खलासी लोकांनां मेजवानी | १०००० |
| दारूकाम | २००० |
| जत्रेसारखी मौज | १००० |
| | ८१००० |

लिमडीच्या ठाकूर साहेबाचे चिरंजीव येत्या म्याट्रिक्युलेशनच्या परिक्षेकरितां मुंबईस येणार आहेत.

दक्षिण प्रांतांतील शेतकरी लोकांचे दंग्याचे बाबदींत चौकशी करण्याकरितां हिंदुस्थान सरकारानें कमिशन नेमिलें त्यांतील मेंबर.

१ मि० रिचीसाहेब प्रेसिडेंट.
२ मि० कोलवीन साहेब मेंबर बंगाल सिवहिल सरविहस.
३ मि० लायन साहेब मेंबर अमदाबाद जडज.
४ मि० शंभु प्रसाद लक्ष्मी लाल मेंबर मोरवीचे म्यानेजर.

ही मंडळी पुण्यास जमून ६ वे तारखेस त्यांनी आपलें काम सुरू केलें.

मि० मांटिथ साहेब हिंदुस्थानांतील पोस्ट आफिसांवरील डायरेक्टर जनरल रजेवर आहेत ते डिसेंबरचे १० वे तारखेस परत येतील.

कलकत्यास प्रिन्स आफ वेल्सचे आदरातिथ्या करितां वर्गणीची रकम १३५६१रु. झाली.

बडोदें— नाना खानविलकर साडेतीन लक्ष रुपये दंड देत नाहीं सबब अजून कैदेंतच आहेत.

मुंबईचे एक व पुण्याचे एक अशा दोन पारशी गृहस्थांस सी. एस आयच्या पदव्या प्रिन्स आफ वेल्स आले ह्मणजे मिळणार असें वर्तमान आहे.

ऋग्वेदाचा शेवटला भाग छापण्यास मदत करण्याकरितां लार्ड सालिस्वरी यांनीं प्रोफेसर मोक्ष मुलर यांस २०,००० रुपये दिले.

मुसलमान ज्ञातींत नवऱ्यास आपले बायकोचा संबंध तोडावयाचा असल्यास त्याणें " तल्लक "हा शब्द उच्चारावा, ह्मणजे त्या दिवसापासून तीन महिन्यापर्यंत बायकोस त्या नवऱ्यापासून अन्नवस्त्र मिळण्याचा अधिकार राहतो व पुढें त्याचा व तिचा संबंध तुटतो याप्रमाणें चाल आहे. कलकत्ता एथील पोलिस कोर्टांत एका मुसलमान ज्ञातीचे बायकोनें आपला नवरा आपणास अन्नवस्त्र देत नाहीं अशी फिर्याद केली. माजिस्ट्रेटानें तिचे नवऱ्यास कोर्टांत बोलाऊन आणून चौकशी केली, व तो तिजला अन्नवस्त्र देण्याबद्दलचा ठराव करणार इतक्यांत त्या मुसलमानानें तीनवेळां " तल्लक" असें ह्मटलें! ने.

एक बंगाली गृहस्थ विलायतेस शेतीचें काम शिकण्याकारितां गेला आहे, त्यानें स्काटलंडांतील शेतीविषयीं माहिती करून घेतली व आतां इंग्लंडांतील शेतीविषयीं माहिती करून घेत आहे व त्यासंबधानें यंत्रांची वगैरे माहिती करून घेत आहे, परत स्वदेशीं आल्यावर साखर करण्याचा वगैरे कारखाना काढण्याचा त्यांचा इरादा आहे असें समजतें. इं. प्र.

### वेद, वेदांगे पुराणे, व कला

चार वेद, १८ पुराणें व ६४ कळा यांच्या संख्या मात्र बहुतेक लोकांस माहित आहेत. पहंतु त्यांची नावें जाणणारे साधारण लोकांपैकीं क्वचितच आढळतील. याकरितां त्यांचें ज्ञान सर्वत्रांस व्हावें ह्मणून त्यांचीं नावें चालू महिन्याचे विविधज्ञान विस्ताराचे अंकांत दिलीं आहेत तीं आह्मी खालीं उतरून घेतलीं आहेत तीं येणें प्रमाणें.

४ वेद—ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, व अथर्वणवेद.

६ अंगे—छंद, सूत्र, ज्योतिष, निरुक्त, शिक्षा व व्याकरण.

१८ पुराणें—१ ब्राह्म. २ पाद्म. ३ वैष्णव. ४ शैव. ५लैंग, ६ गारुड. ७ नारदीय. ८ भागवत. ९ आग्नेय. १० स्कांद. ११ भविष्य. ३२ ब्रह्मवैवर्त. १३ मार्कंडेय. १४ वामन. १५ वाराह. १६ मात्स्य- १७ कौर्म. १८ ब्रह्मांड .

१ न्यायशास्त्र.

१ पूर्वमीमांसा व उत्तरमामांसा.

१ धर्मशास्त्र (गृह्यसूत्रें व मन्वादिस्मृति.

६४ कला—१ अभिधानकोश. २ अक्षरमुष्टिकाकथन. ३ आकारज्ञान ४ आकर्षकक्रीडा. ५ आलेख्य. ६ उत्साहन. ७ उदकघात. ८उदकवाद्य. ९ ऐंद्रजाल. १० काव्यसमस्यापूरण. ११ कर्णपत्रभंग १२ केशमार्जनकौशल. १३ क्रियाविकल्प १४ कौंचमारणयोग १५ गंधयुक्ती. १६ गीत. १७ चित्रयोग. १८ चित्रशाकापूपभक्तविकारक्रिया. १९ छंदोज्ञान. २० छलितयोग. २१ तंदुलकसुमवलिप्रकार. २२ तर्ककर्म. २३ तक्षण. २४ दशनवसनांगराग. २५ दुर्वचकयोग २६ देशभाषाज्ञान २७ द्यूतविशेष. २८ धातुवाद. २९नाटकाख्यायिकादर्शन. ३० नाट्य. ३१ नृत्य ३२ नेपथ्ययोग. ३३ पट्टिकावेत्रबाणविकल्प. ३४ पानकसरागासवयोजन. ३५ पुष्पवाटिकानिमित्तज्ञान. ३६ पुष्पास्तरण ३७ पुस्तकवाचन प्रतिमाला. ३९ प्रहेलिकाकूटवाणीज्ञान. ४० बालक्रीडन. ४१ भूषणयोग. ४२ मणिभूमिकाकर्म.४३ मणिरागज्ञान. ४४ मानसीकाव्यक्रिया. ४५ माल्यग्रथनविकल्प. ४६ मेषकुक्कुटलावकयुद्धविधि. ४७ म्लेंच्छितकविकल्प.४८ यंत्रेमातृकाधारणमातृकासंवाच्य. ४९ रौप्यरत्नपरीक्षा. ५० वस्त्रगोपन. ५१ वाद्य. ५२ वास्तु. ५३ विशेषकच्छेद्य. ५४ वीणाडमरुकवाद्य. ५५ वृक्षायुर्वेदयोग. ५६ वैजयिकविद्याज्ञान. ५७ वैतालिकविद्याज्ञान ५८ वैनायिकविद्याज्ञान. ५९ शयनरचन. ६० कुकसारिकाप्रलापन. ६१ शेखरापीडयाजन. ६२ सूचीवानकर्म ६३ सूत्रक्रीडा. ६४ हस्तलाघव.

### गावकी प्रकरणी अष्टाधिकार आढेपारढे तळवट वानोळीं काडीपेंढी, आणि मुशाहिरा.

१ अष्टाधिकार— जलाधिकार— काळेपणा पाटीलकी; स्थळाधिकार— देशमुखी; ग्रामाधिकार— महाजनकी; कुललेखन— कुळकरणी; ब्रह्मासन— वर्त्तकी; दंडविनियोग— धर्माधिकार; पौरोहित्य— उपाध्येक भटपण आणि ज्योतिर्षी— ज्योतिष.

२ अढे पारढे— पाटील, देशमुख इत्यादिकांस शेतकरी लोकांपासून दरखंडी अथवा मणा मागें जसा ठराव केला असेल त्या प्रमाणें त्याच्या उत्पन्नावर जें धान्य मिळतें तें किंवा त्या बाबद इनाम जमीन असते ती. यासच पासोडी शेला पागोटें इ० ह्मणतात. इनाम जमिनीविषयीं विशेष माहिती पुढील अंकांत देऊं.

३ तळवट— खळ्यामध्यें रास मोजून घेतल्यावर अथवा पेवांतील धान्य काढून घेतल्यानंतर जें धाम्य तळीं रहातें तें झाडून गोळा करून घेण्याचा महार, वेसकर इत्यादिकांचा हक्क असतो तें.

४ वानोळा— शेतांत धान्य पिकलें ह्मणजे पाटील देशमुख, देशपांडे इत्यादिकांस ओला टहाळा, लिंबूर, हुरडा, ओंब्या इ० नव्या आणि ओल्या धान्याचा नमुना देतात तो.

५ काडी पेंढी— बलुतदार, कारू, नारू, इ० लोकांस खळ्यांतून अथवा शेतांतून धान्याच्या पेंढ्या त्याची नोकरी पाहून देतात त्यास ह्मणतात.

मुशाहिरा— कुळकरणी इत्यादिकांस नगदी पैसे अथवा धान्य दर बिघ्यास अथवा पाइर्णास ठरविलें असेल तितकें देतात तो.

### पुनर्विवाह

सन १८६९ सालापासून आजपर्यंत मुंबई इलाख्यांत १५ पुनर्विवाह झाले ते कोण कोणाचे व कधीं झाले याची माहिती:—

१. पांडुरंग विनायक करमरकर व प्रभाकर भट्ट परांजपे यांची कन्या वेणूबाई, तारिख १५ जून सन १८६९, कोंकणस्थ ब्राह्मण.
२. मोरोबा कान्होबा व भवानीशंकर राघवानंद यांची कन्या भुलीबाई, ता. २६ मार्च सन १८७०, परभू.
३. माधवदास रघुनाथदास व गिरधरदास मनमोहनदास यांची कन्या बाई धनकुवरबाई, ता. २ मे सन १८७१, कपोलवाणी.
४. गंगाधर बाळष्ण गद्रे व रावजी धोंडदेव जोशी यांची कन्या दुर्गाबाई, ता. ४ जून सन १८७१, कोंकणस्थ ब्राह्मण.
५. ललुभाई मथुरादास व रतनजी गोपाळजी यांची कन्या बाई जिवकुवर, तारिख २५ आगष्ट सन १८७२, गुजराथी वाणी.
६. प्रागजी लालजी व बाई शामकुवर, ता. २६ सप्तेंबर सन १८७२, कपोल वाणी.
७. हरकिसनदास माधवदास ( मुलीचें नांव कळलें नाहीं ), ता. २७ जानेवारी सन १८७३, गुजराथी वाणी.
८. गजानन पांडुरंग देवळीकर व त्रिंबक सीताराम तामशे यांची कन्या कोंडूबाई, तारिख १८ जून सन १८७३, देशस्थ वैष्णव ब्राह्मण.
९. केवळदास अमरजी व ईश्वर त्रिभुवन यांची कन्या बाई दिवाळी, तारिख ९ आगस्ट सन १८७४, गुजराथी वाणी.
१०. राजाराम शिवराम व बाई कुवरबाई, आगष्ट सन १८७४, औदीच्य ब्राह्मण.
११. पंड्या राघवजी भावजी व बाई उमियाबाई, आगस्ट सन १८७४, औदीच्य ब्राह्मण.
१२. ललु खुशाल व बाई जडावबाई, तारिख २४ सेप्तेंबर सन १८७४, गुजराथी श्रावकवाणी.
१३. विष्णु परशुराम शास्त्री पंडित, व वामनराव आगाशे यांची कन्या कृष्णाबाई, तारिख ११ डिसेंबर सन १८७४, कोंकणस्थ ब्राह्मण.
१४. लक्ष्मण विठ्ठल ग्हडारी व विनायक बापूजी भांडारकर यांची कन्या गंगाबाई, तारिख ३० डिसेंबर सन १८७४, सारस्वत गौडब्राह्मण.
१५. कृष्णाजी धोंडो पंगे व सखाराम गोविंद बावळे यांची कन्या गीताबाई. तारिख १३ मार्च सन १८७५, यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण.

इं. प्र.

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

REGISTERED NO. 5 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० १९ माहे सप्तंबर सन १८७५ इ० अंक ३८

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## वसूल.

| | रु. |
|---|---|
| क्या. हडलस्टन साहेब | ३४०६ |
| मि. नौलिस साहेब | २५०१०४ |
| रा. मारुती हणमंत पाटील | ३०४ |
| ,, तुकुसा पांडूसा | १३ |
| ,, नारायणसा चिमणसा | १३ |
| ,, गोविंदराम लालचंद | १३ |
| ,, केशव लक्ष्मण जोरवेकर | २ |
| भंडारा नेटिव लायब्ररी | ४० |
| रा. रामराव सदाशिव देशमुख | १००८ |
| ,, गोपाळ रामराव मास्तर | ३०४ |
| ,, कृष्णराव मल्हार, बारशीटाकळी | ५ |
| ,, चंद्रभान देशमुख, झोडगें | ५ |
| ,, त्रिंबकराव देशमुख, आगर | १० |
| ,, भगवान पाटील, सिंदखेड | ५ |
| ,, राजाराम सखाराम, बारशीटाकळी | १० |
| ,, हरीशिंग आपा देशमुख | १० |
| ,, खुशालराव देशमुख, कुरणखेड | ५ |
| ,, गणपती पाटील, राजंद | ५ |
| ,, चिमणाजी पाटील पाटखेड | ५ |
| ,, बुटाजी देशमुख, हैसांग | ५ |
| रा. दामोदर देवजी जतकर | १०१३ |
| ,, मुळचंद केशवराम नायब | ६०८ |
| ,, गणाजी रामजी पाटील | ६०८ |

## जाहिर खबर.

### कर्जाऊ रकम मिळण्याची सोय.

अकोल्यास आम्ही देण्याघेण्याचाअल्प स्वल्प व्यापार आरंभिला आहे. त्याविषयीं मागें वऱ्हाडसमाचारांतून कळविलेंच आहे. हल्लीं लोकांच्या सोयीकरितां त्यांत आणखी थोडा फेरबदल करितों तो असा:—

१ गहाण जिनसांवर दरमहा दर शेकडा एक रुपया व दीडरुपया असे दोन दर व्याजाचे ठेविले होते ते रहित करून हल्लीं दोन्ही प्रकारच्या गहाणास व्याजाचा दर एकच रुपया ठेविला आहे.

२ गहाणाशिवाय रोख्यावरून कर्जाऊ रकम नेणारास दरमहा दर शेकडा २ दोन रुपये व्याजाचा दर ठेविला होता तो हल्लीं १०८ दीडरुपया केला आहे.

३ इतर ठिकाणीं सावकार लोक रकम देतांना मनुती अगर दस्तुरी ह्मणून शेकडा आठ च्यार, किंवा कोठें दहाही रुपये कापून घेत असतात तशी वहिवाट आह्माकडे नाहीं व या पुढेंही तसा एक पैसाही घेतला जाणार नाहीं.

४ हप्तेबंदीनें रोख्याची फेड होणें असेल तर व्याज कट मितीचे आकारलें जाईल.

सर्वांस कळावें तारीख १५ सप्तंबर सन १८७५ इसवी.

नारायण मोरेश्वर

पत्ता— वऱ्हाडसमाचार छापखाना.

## जाहिरखबर

### घड्याळांची दुरुस्ती.

मी खालीं सही करणार सर्व लोकांस कळवितों कीं, अकोलें येथें शहरांत भाजी बाजाराचे चौकांत घड्याळें दुरुस्त करण्याचें मी दुकान घातलें आहे. पाकेटवाच्य ( खिशांतील घड्याळ ) क्लाक (वाजतें घड्याळ ) टाइमपीस ( न वाजणारें घड्याळ, वाजाच्या पेट्या इत्यादि माफक दर घेऊन मी चांगलीं दुरुस्त करून देत असतों. ज्यांची खुशी असेल त्यांणीं कामें पाठवावीं.

तारीख १४ सेप्तेंबर १८७५ इसवी.

(सही) गिरिजाशंकर मुंबईकर

वाच्यमेकर.

## WANTED.

An Editor for the Urdu part of the Urdu Akhabar Akolah experienced in the duties of the Editorship, and also conversant with English salary from 30 to 40 Rs. per month. Applications with testimonials to be sent to the undersigned on the following adress.

By order of proprietor's
Dhondoo Balkrishna
Deva.
Editor & Manager
Marathi side-
Urdu Akhbar
Akola.

## जाहिरात.

आमच्या पत्राच्या उडदू भागाकरितां एक एडिटर आवश्यक आहे. त्याला उडदू चांगलें येतें असून इंग्लिश भाषेची वरीच माहिती असावी. व एडिटरीच्या कामांत अनुभविक असावा. पगार ३० पासून ४० मिळेल. ज्याला अर्ज करणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आमचे नांवे आपले सर्टिफिकिटासुद्धां अर्ज धाडावें. कळावें ता. १४ सप्तंबर सन १८७५ इसवी.

मालकाकरितां
धोंडो बाळकृष्ण देव
एडिटर आणि म्याने. म. भाग
उडदू अखबार अकोला.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

### वेदशास्त्र संपन्न राजमान्य राजश्री गर्दभाचार्य ह्यांचा छबीना व त्यांचे अनुयायी ह्यांनीं केलेला गोंधळ व लाथांचा सुकाळ.

रा. रा. ज्ञानप्रकाश कर्ते यांस:—

काय हो. ह्या तुमच्या दुनियेचें व विशेषेंकरून तुमच्या ह्या पुणें शहराचें वय जसें जसें वाढत चाललें आहे तसें तसें सर्वच वाढत चाललें आहे काय हो ! पूर्वीं शेंकडो वर्षांच्या आधीं जेव्हां ह्या पृथ्वीवर ह्याच पुणें शहरांत मनुष्य देहांत आह्मीं होतों त्या वेळेस ब्राह्मण धर्माचे ग्रंथ फारच थोडे होते. पण आतां "व्यंकटेशस्तोत्र, सत्यनारायणाची कथा, वटसावित्रीची कहाणी, मंगळागौरीची कहाणी' आदिकरून हजारों ग्रंथ नवे झाले आहेत व ते सर्व ईश्वर प्रणीत आहेत. फार तर काय, पण जे ग्रंथ पूर्वीं आमच्या वेळेस होते त्यांचींही शरीरें फुगून वाढलीं आहेत. जो ग्रंथ पूर्वीं पंचवीस हजार होता तो आतां पन्नास हजार झाला आहे, व आणखी वाढतच चालला आहे. ह्याप्रमाणें ग्रंथास शेपटें फुटून ते दररोज लांबलचक होताहेत. पण सांगण्यास आनंद वाटतो कीं, ही वाढ ह्मणजे केवळ ग्रंथांसच आहे असें नाहीं, केवळ ग्रंथांसच शेपटें फुटलीं आहेत असें नाहीं, तर ही शोभा कित्येक ब्राह्मणांसही आली आहे वत्यांस वाटूं लागलें आहे कीं, शेपुट व कान जितकें लांब तितकें चांगलें. ठीकच ! दोन वेंटें लांब कानाच्या प्राण्यास जर अमुक अक्कल तर वीस बोटें लांब कानाच्यास त्याच्या दसपट असलीच पाहिजे. दोन पायाच्या प्राण्यास जर अमुक अक्कल तर चार पायांच्यास त्याच्या दुप्पट असलीच पाहिजे. दीड वीत पोटाच्या प्राण्यास जी अक्कल तिच्या दुप्पट दीड हात पोटाच्या प्राण्यास असलीच पाहिजे व ज्यास शेपुट नाहीं त्याजपेक्षां ज्यास शेपुट आहे अशा प्राण्यास अनंतपट अधिक अक्कल असलीच पाहिजे. ह्या गोष्टी गणित विद्येनें स्पष्ट सिद्ध होतात. तेव्हां शेपुट, लांब कान आदिकरून अवयवांनीं शोभित जो प्राणी तो फार अक्कलवान व त्यास भजावें असें तुमच्या पुणेंकर ब्राह्मणांपैकीं कित्येकांस वाटूं लागलें आहे. तें केवळ मनांतच वाटूं लागलें आहे असें नाहीं तर थोडे दिवसांपूर्वीं त्यांनीं सर्व गुण संपन्न असे एक गर्दभाचार्य राजाधिराज कुंभारराज महाराज ह्यांजपासून आणून त्यांस आपले गुरू केले, व दोन तीन दिवसपर्यंत त्याची रस्त्यांतून मिरवणूक केली. शेवटीं आमचे फौजदार साहेब पडले युरोपियन, त्यांची समजूत अशी कीं, अक्कल डोक्यांत असते. अकलेची जागा ह्मटली ह्मणजे शेपुट व लांब कान हें त्यांस माहीत नाहीं ह्यामुळें ब्राह्मण गुरू जे गर्दभाचार्य ह्यांस साहेबांनीं पकडलें व कोंडवाड्यांत घातलें. ह्या मिरवणुकीची व तत्संबंधी गोष्टींची हकीकत आपल्या वाचणारांस कळावी ह्मणून खालीं लिहितों.

ज्ञा० प्र० कर्ते महाराज अलीकडे पंडित दयानंद सरस्वती हे पुण्यांत आल्यापासून लोकांस सांगू लागले कीं, ईश्वरप्रणित काय ते वेद व त्यांमध्यें मूर्तिपूजा मुळींच सांगितली नाहीं. ही गोष्ट ऐकून तेहेतीस कोटि देववाल्यांस व शेपटें फुटलेल्या ग्रंथांस ईश्वरकृत मानणारांस राग आला. ते ह्मणूं लागले "काय बेटा स्वामी, ईन मीन दोन बोटें कान ह्याचे आणि शेपटाला तर ठिकाण नाहीं मुळींच. त्याची किती अक्कल व विद्वत्ता असणार ? ह्याचें काय ऐकावयाचें आहे ? जी मंडळी ह्या स्वामींचा उपदेश ऐकते तीही पण तशीच. त्यांचेही पण कान आखुडच." असें शेपुट महात्म्य पढणार ह्मणूं लागले. व त्यांस वाटलें कीं, हे आखुड कानाचे लोक दुसऱ्याचेही कान आखुड करतील हें ठीक नाहीं. तेव्हां आतां लंबकर्ण महाराजांस शरण जाऊन प्रत्यक्ष त्यांस आणून त्यांचा गौरव करावा व त्यांची प्रार्थना करून त्यांस ह्मणावें "गर्दभाचार्य महाराज बृहस्पतीच्या अवतारा, आमच्या शहरांतील लोकांवर कृपा करा आणि त्यांस विद्या व अक्कल द्या" ह्याशिवाय आतां दुसरा मार्ग राहिला नाहीं. असें वाटून एकादा राक्षस प्रबल झाला ह्मणजे सर्व देव मिळून जसे विष्णूस अगर शंकरास वैकुंठीं अगर कैलासीं शरण जातात तद्वत आमचे गर्दभानुयायी ब्राह्मण वेदशास्त्र संपन्न गर्दभाचार्यांस मंडईत शरण गेले व ह्मणाले कीं "महाराज हा दयानंद मोठा प्रबल झाला आहे. वे. शा. संपन्न रामशास्त्र्यादिकांनीं ही हात टेकले. ह्यामुळें आतां ह्या संकट समयीं काय करावें हें आह्मांस सुचत नाहीं- ह्या सन्याशानें मंगळागौरीच्या कहाणीसारखे मोठमोठे ग्रंथ पालथे घातले व त्याच्या नादानें कित्येक लोक मूर्ख होत चालले आहेत. गणपतीच्या उंदराची, विष्णूच्या गरुडाची, सांबाच्या नंदीची लोक थट्टा करूं लागले आहेत; तेव्हां गर्दभराजा, आतां आपणावांचून कोणी त्राता राहिला नाहीं. आपणास आह्मीं शरण आलों आहों तेव्हां कृपा करून आमच्या ब्राह्मण धर्माचें आपण संरक्षण करा" ह्याप्रमाणें लंबकर्ण महाराजांची प्रार्थना करून कित्येक

ब्राह्मणांनीं त्यांची पूजा केली. ज्यांस ह्यापिसांत जावयाचें असल्यामुळें फावलें नाहीं व धारिष्ट नसल्यामुळें येववलें नाहीं त्यांनीं आपल्या हाताखालचे नौकर व पट्टेवाले पाठविले व त्या गर्दभास फुलांच्या माळा घालून त्याची अर्चा केली. तेव्हां गर्दभराज संतुष्ट होऊन ह्मणाले कीं, "हे माझ्या चेल्यानों, तुह्मी कांहीं काळजी करूं नका, माझें शेपुट तुमच्या मस्तकीं आहे. तुमच्या पूजेनें मी तृप्त झालों आहे. काय वर मागणें असेल तो मागा." तेव्हां गर्दभदास ह्मणाले" गुरूमहाराज, आपण जाणताच आहां कीं ह्या दुष्ट दयानंदास हत्ती. घोडे, बरोबर घेऊन त्याचे शिष्य थाटानें मिरवत शहरांतून येणार. हा त्याचा जय आह्मास साहवत नाहीं. असें जर होईल तर शेपटाचा व लांब कानाचा आज पराजय झाला असें ह्मटलें पाहिजे" तेव्हां लंबकर्ण ह्मणाले" माझे शिष्यानों, मी कांहीं तें होऊं देणार नाहीं हें तुह्मीं पक्कें समजा. आतां इतकेंच करा कीं, सर्व पुणें शहरभर माझा छबिना काढा व माझे जे सत्‌शिष्य ते तुह्मीं माझे पाठीमागून फिरा, ह्मणजे त्या दयानंदानुयायी लोकांस समजेल कीं, गर्दभाचार्यानुयायी लोक ह्या शहरांत थोडे आहेत असें नाहीं. ह्याप्रमाणें फिरतां दयानंदाच्या हत्तीची अगर लोकांची गांठ पडली ह्मणजे आपण गोंधळ करून देऊं. आपला गोंधळ सुरू झाला ह्मणजे अर्थांतच लाथांचा सुकाळ होईल. मग लाथांपुढें कोण टिकणार आहे." ह्याप्रमाणें गर्दभगुरूनीं आश्वासन दिल्यावर कोणीं सत्‌शिष्यानें मंडईतच वाजंत्री करून त्यांस पैसे दिले. कोणीं तासे आणले, कोणी म्युनिसिपालिटीकडून पास आणला आणि वे०शा० गर्दभाचार्यांची स्वारी वाजत गाजत निघाली. त्यांस पालखींत बसावयाचें पण तो देह आंत माईल अशी पालखीच मिळेना. असो, ह्याप्रमाणें स्वारी तीन दिवस शहरांतून भटकत फिरली. शेवटीं गेल्या आदितवारीं संध्याकाळीं बुधवारांतील भिडे ह्यांचे वाड्यांतून पंडित दयानंद हे थाटानें आपल्या घरीं जाणार असें गर्दभाचार्यांस समजतांच ते आपला शिष्य समाज बरोबर घेऊन बुधवारांत प्राप्त झाले. आणि आतां पुढें जय प्राप्ती करणार तों इतक्यांत गर्दभाचार्यांचे गळ्यांत दोरी घालून पोलिसांनीं त्यांस कैद केलें व फारसखान्याजवळील शेतखान्याच्या खोलींत त्यांस सुखानें वास करण्यास जागा दिली. असें होतांच गर्दभशास्त्री यांचे सत्‌शिष्य रागावले व किंकाळूं लागले व गुरू महाराजांचें वरद शेपुट त्यांच्या मस्तकीं असल्यामुळें लाथा झाडूं लागले. ह्यामुळें बुधवारांत घटकाभर लाथांचा सुकाळ झाला. तेणेंकरून कित्येक आर्य लोकांच्या अंगावर चिखल उडाला, कित्येकांस दगड लागले. पण गर्दभाचार्यांचा ज्यांच्यावर अनुग्रह त्यांच्याशीं आर्य लोकांनीं काय करावें. त्यांनीं कांहीं केलें नाहीं. तेव्हां तुमचे ट्रेन साहेब फौजदार आले व त्यांनीं गर्दभाचार्यांच्या शिष्य समाजास "छडी लागे छम छम" असें करून हाकून दिलें, व पंडित दयानंद ह्यांस आदबीनें घरीं पोहोंचवून दिलें. ही गेल्या आदितवारची हकीकत झाली.

आतां ह्या संबधानें मला आणखी पुष्कळ गोष्टी लिहावयाच्या आहेत, परंतु त्या पुढें लिहीन. प्रस्तुत नमोनमः.

एक पिशाच.

---

## वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य ९ शके १७९७

---

## कर्नल बेकर साहेब यांची प्रतिष्ठित कैद.

विलायतेंत प्रिन्स आफ वेल्स यांचे मित्र व राणी साहेबांच्या घोडेस्वार पलटणींवरील मुख्य कर्नल बेकर साहेब यांनीं आगगाडींत एका तरुण अविवाहित स्त्रीवर बलात्कार केला व त्यामुळें ती गाडी चालत असतां बाहेर निघून लोंबकळत राहिली. पुढें त्या गोष्टीचें सरकार दरबार होऊन बेकर साहेब यांस १ वर्षाची कैद व ५००० रुपये दंड झाला आणि ते कैदेंत गेले. कैद सरल्यावर त्या थोर गृहस्थाची जागा पुन्हा त्यास मिळावी अशाविषयीं फौजांवरील मुख्याधिकारी यांणीं खटपट चालविली होती. परंतु राणी साहेबांनीं कोणाचें न ऐकतां त्यास एकदम बडतर्फ केलें.

भाडभिडेखालीं तो मुकद्दमा रद्द होऊन बेकर साहेब भजीबाद सुटले नाहींत व राणी साहेबांनीं त्यांच्या दुष्ट वर्तनावर कडी नजर पुरवून त्या पशूतुल्य मनुष्यास पुन्हा आपल्या नोकरींत न ठेवण्याचा ठराव केला व त्या बाईस आपले दुःखोद्गार कळविले हें फार चांगलें केलें. वे या योगें त्यांनीं आपला निर्दोष न्याय प्रसिध्ध केला याबद्दल सर्व लोक त्यांची वाखाणणी करितील.

राणी साहेबांचे चिरंजीव प्रिन्स आफ वेल्स यांस आपले मित्रावर हा मुकद्दमा होणार असें समजतांच त्यांनीं तो वाद आपसांत मिटावा ह्मणून फार खटखट केली व त्या स्त्रीचे बंधूस कोणाकडून लेखीही कळविलें कीं, आमच्यावर कृपा करून तुह्मी बेकर साहेबांस क्षमा करावी. परंतु त्या धीर व पराक्रमी पुरुषानें न्याय कानकोंडा होऊ नये ह्मणून त्यांचें मागणें झिटकारिलें व अखेरपर्यंत मजल पोचविली याबद्दल आम्ही त्या गांजलेल्या निर्दोष अबलेची व तिच्या भावाची स्तुती करितों; पण प्रिन्स आफ वेल्स यांस यांच्या या तरफदारीच्या कृत्याबद्दल काय ह्मणावें तें आम्ही आपले वाचकांवर सोपवितों. हे कांहीं कालानंतर आमचे राजे होणार आहेत. याजकरितां परमेश्वर कृपा करो आणि त्यांच्या मनांतील अशा कुकल्पना काढून टाको. अस्तु.

आतां बेकर साहेबाची तुरुंगांतली हकीकत सांगावयाची तशीच राहिली ती सांगतों. न्यायाधिशानीं ठराव केला किंवा तुरुंगावरील अधिकाऱ्यांनीं स्वेच्छेनें वहिवाट ठेविली, अथवा इंग्लंड देशांत प्रतिष्ठित मनुष्यास कैदेंत ठेवण्याची पध्धत अशीच आहे कीं काय कोण जाणें. बेकर साहेबाचे सोहळे तुरुंगांतही घरच्याप्रमाणेंच आहेत. ह्मणजे त्यांस नित्य बियर नावाची दारू प्यावयास मिळतें, पोर्टवाईननावाची दारू प्यावयास मिळते; मित्रास भेटावयास परवानगी मिळते, पत्रें लिहावयास, वर्तमानपत्रें वाचावयास व हवा खाण्याकरितां फिरावयासही परवानगी मिळते. आतां आह्मांस एवढीच शंका आहे कीं रात्रींविरात्रीं एकादे दिवशीं यांचे मनांत आलें तर त्यांस घरीं जाऊ देतात किंवा नाहीं कोण जाणें! कदाचित तेवढाच प्रतिबंध असेल तर संततीस थोड्याशा अवधीचें नुकसान होईल बाकी सर्व प्रकार त्यांस स्वतंत्रतेसारखाच आहे. कदाचित विलायतेंत प्रतिष्ठित मनुष्याची कैद सहल नजरेची असेल तरी ही सहल नजर कोणत्या मर्यादेची ? व हा कैदी दिवाणी देण्याघेण्याच्या मुकद्दम्यांतला आहे कीं काय? नाहीं. नीतिविरुद्ध अबला स्त्रीवर बलात्काराचा घोर अपराध केलेला हा फौजदारी कैदी होय आणि त्यास अशी सुलभ कैद देणें ह्मणजे दुसरे तशा प्रतीचे मनुष्यास मुळींच दहशत न बसण्याजोगें किंवा थोडें न्यायाच्या वेगळें होय असें आह्मांस वाटतें. व आमचे देशांत तर अशा प्रकारच्या विलायतेंतल्या तुरुंगातल्या स्थितीकरितां लोक फारच हसतील यांत संशय नाहीं.

---

## शेतकरी लोकांच्या दंग्याच्या चौकशीसाठीं कमिशन

दक्षिण प्रांतांत थोडे दिवसांमागें शेतकरी लोक सावकारांवर बिथरले होते व त्यांनीं त्यांचीं घरें दारें लुटून व मारहाण करून रोख्या पुर्ज्यांचीं दप्तरें नेलीं व जाळलीं वगैरे मोठी धुमाळी झाली होती ती आमच्या वाचकांस ठाऊक आहेच. तेव्हां मुंबई सरकारानें त्याची हकीकत समजून घेण्यासाठीं मि. रिची साहेब यांस त्या कामावर नेमून पाठविलें होतें परंतु ही गोष्ट फार मोठ्या समुदायाची ह्मणून हिंदुस्थान सरकारानें एका मनुष्यावर हें काम न सोपतां च्यार ठिकाणच्या च्यार कामदारांचें कमिशन या कामासाठीं नेमिलें. व तें पुण्यास येऊन कामाची सुरवात झाली आहे. हीहि गोष्ट आमचे वाचकांस समजली आहे. आतां त्याच्या कामाच्या संबधानें दोन विच्यार आह्मी सरकारापुढें ठेवितों.

या कमिशनाचें काम उघड्या कोर्टीनें चालावयाचें नाहीं ह्मणजे तेथें काय काय चालतें हें पहाण्यासाठीं वर्तमानपत्रांचे रिपोर्टर वगैरे जातील तर त्यांस मनाई आहे असें प्रसिद्ध झालें आहे ही गोष्ट गैरवाजवी आहे. बडोद्याच्या चौकशीसारख्या राजकीय गोष्टीचें कमिशन उघडें कोर्ट ठेवून केलें आणि गरीब शेतकरी लोकांच्या दुःखाची दाद घेण्याच्या कमिशनचें काम प्रसिद्ध रीतीनें न करितां दारें लावून न करावें हा कोणत्या प्रकारचा न्याय! असो.

कमिशनर लोक आपलीं कामें दारें लावून करोत किंवा दारें उघडीं ठेवून करोत पण त्यांनीं साऱ्या राष्ट्रांतील गरीब बिच्याऱ्या प्रजासमूहाच्या भाग्याचें किंवा नष्टचर्येचें हें काम ईश्वरानें निकाल सांगण्याकरितां आपणावर सोपविलें आहे हें मनांत आणून पोक्त विच्यारानें व प्रांजल मनानें तो बुद्धि देईल तसें हें काम करावें अशी त्यांस आमची शिफारस आहे.

शेतकरी लोक स्वभावतःफार गरीब आहेत. सशक्त मुकीं जनावरें ज्याप्रमाणें खपतात त्याप्रमाणें हे कुणबी लोक रात्रंदिवस गाव व घर दार सोडून बैलाबरोबर खपतात आणि आह्मा प्रतिष्ठित वर्गाच्या लोकांकरितां अन्न निमार्ण करितात व त्यांच्या त्या निढळाच्या घामाच्या श्रमावर आह्मी सुग्रास भोजन, ऐशआराम व लप्त्या कपड्याचे डौल करून मिरवतों. आणि त्या बिच्याऱ्यांकडे पाहिलें तर त्यांचीं वस्त्रें वीतभर लंगोटी व एक फाटकी घोंगडी. अन्न पाहिलें तर जोंधळ्याची जाडी भाकरी व वर तिखटाचा गोळा आणि कांदा. घर पाहिलें तर चंद्रमौळी, शेतांतल्या गवताचें छपर व त्यांस पलाटीचें किंवा चिपाडांचें कूड इत्यादि प्रकारची त्यांची संपत्ती पाहून आह्मांस फार दुःख वाटतें. बिच्याऱ्यास विद्येचा संस्कार नाहीं, बुद्धीला प्रकाश नाहीं, व सुधारणेला मार्ग नाहीं तरी असल्या स्थितींत समाधान वृत्तीनें वागून आनंद मानणारी या कुणबी लोकांसारखी दुसरी जाति नाहीं. अशी ती असतां व सदरील प्रकारची तिची संपत्ती असतां ती देखील आमचे बुभुक्षित बनिये व गुजर व मारवाडी यांचे डोळ्यांत खुपली व तिजवर दरोडे घालण्याचे आज कित्येक वर्षें त्यांनीं प्रयत्न केले व बिच्याऱ्या शेतकरी लोकांस आपले कर्जबाजारी करून त्यांचें सर्वस्व लुटण्याचा प्रयत्न अप्रतिबंध चालविला हेंच त्यांवर कुणबी लोकांनीं उठण्यास मुख्य तें कारण झालें आहे असें आमचे वाचक समजल्यावाचून रहाणार नाहींत.

"जबर शेतसारा" हाही एक शत्रू शेतकरी कुणबी लोकांस बुडवून रसातळास पोचविण्यास समर्थ झाला आहे. व तो 'जबर शेतसारा' हा आमच्या कृपाळु इंग्लिश सरकारची त्यांस देणगी आहे ह्मणून ती त्यांनीं शिरसावंद्य केली आहे. सरकारापुढें कितीही गाऱ्हाणीं नेलीं तरी तें डोळेझाक करतें, व आपण त्यावर उठावें तर आपल्या प्रज्याधर्मास बट्टा आहे. आणि सरकार जबरदस्तही आहे ह्मणून त्यांनीं सरकारचा सारा वारण्याकरितां मारवाड्याचें कर्ज घेण्याची वहिवाट पाडिली व ते अतिशय नाडूं लागले तेव्हां कर्जविमुक्त होण्याची ही एक तऱ्हा त्यांनीं आपल्या अकलेप्रमाणें काढली. ही चांगली आहे असें आम्ही ह्मणत नाहीं पण निरुपायाच्या स्थितींत इच्याहून पलीकडे त्यांस कांहीं सुचलें नाहीं हें मनांत आणिलें असतां त्यांच्या अपराधाचें स्वरूप कोणत्या प्रकारचें मनांत येतें हें विच्यारपूर्वक

पाहिलें पाहिजे. सबब कमिशनर लोकांस आमची पुन्हा शिफारस आहे कीं त्यांनीं या प्रकरणाचा चांगला इन्साफ करावा. या त्यांच्या निकालावर आमच्या देशाची सुबत्ता किंवा दुर्भिक्ष अवलंबून रहाणार आहे सबब दयालु परमेश्वर त्या कमिशनर लोकांस हा न्याय निवडण्याचे कामीं सद्बुध्दि देवो असें आम्ही त्यास मागणें मागतों.

## वऱ्हाड.

रेंडल साहेब बुलढाण्याचे माजी लोकल फंड इंजिनियर यांस मुंबईचे सेशनांत तीन वर्षें सक्त मजुरी कैदेची शिक्षा झाली.

मुंबईस प्रिन्स आफ वेल्स यांस भेटण्यास हैदराबादेहून निजाम सरकारची खासी स्वारीही जाणार असें अलिकडच्या खबरे वरून समजतें.

असिस्टंट व एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांच्या हायर व लोअर स्थांडर्ड परीक्षा पुढील महिन्याचे १९ वे तारखेस येथें जुडिशियल कमिशनर कचेरींत होणार.

डा. भावट साहेब स्यानिटरी कमिशनर यांस दीड महिन्याची रजा मिळाली. व डा. लेंग साहेब तोंपर्यंत त्यांचें काम पहातील.

सर्टिफिकेट परिक्षेविषयीं विद्याखात्याचे डायरेक्टर साहेबांचे सहीची आज एक नोटिस छापली आहे तिकडे लोक लक्ष देतील.

रा. रा. आत्माराम अनंत यवतमाळचे जुडिशियल शिरस्तेदार यांवर एका जप्तीचे प्रकरणांत व अन्य कांहीं कारणांवरून क्या० मेकंजी साहेब तेथील डिपुटी कमिशनर यांची इतराजी झाली होती. व त्यांस त्याकरितां त्यांचे ८० रुपयांचे जागेवरून काढून ४० रुपयावर इंग्रजी आफिसांत ठेवावें. व त्या कामावरील हुशार गृहस्थ रा. गोपाळ श्रीकृष्ण खापरडेकर यांस ८० रुपयांवर जुडिशियल शिरस्तेदार नेमावे असा जुडिशियल कमिशनर साहेबांस त्यांनीं रिपोर्ट केला होता. व त्याप्रमाणें त्या जागेचे त्यांकडून काम घेण्याची वहिवाट तर त्यांनीं कित्येक महिने ठेविली होती; पण दोन आठवड्यापूर्वीं आत्माराम पंत येथें आले त्यावेळीं त्यांवरील प्रकरण जुडिशियल कमिशनर साहेबांनीं बरोबर समजून घेतलें व कागदपत्र पाहिले त्यावरून त्यांची खात्री झाली कीं, आत्माराम पंतावर आणिलेला टपका अगदी निरर्थक आहे व त्या जप्तीच्या कामांत ते अगदी निर्दोषी आहेत सबब जुडिशियल कमिशनर साहेबांनीं मेकंजी साहेबांस तसें कळवून आत्माराम पंत यांची त्याच जागेवर त्याच पगारावर इलिचपुरास बदली केली. व तेथील जुडिशियल शिरस्तेदार रा. रा. रामराव हणमंत यांस यवतमाळास नेमिलें असें समजतें.

या कामीं जुडिशियल कमिशनर साहेबांनीं पोक्तपणानें चांगला न्याय केला हें पाहून आह्मांस संतोष होतो. कधीं कधीं कोणी साहेब लोक एकाद्या विषयीं दुरभिमानामें भलभलत्या कांगाळ्या करितात व वरिष्ठाधिकारी त्यांच्या शिफारसी बहाल करितात तसें या कामीं झालें नाहीं. व त्यामुळें गरीब एका नेटिव कामगाराचा चुराडा होणार होता तो झाला नाहीं हें फार चांगलें झालें.

आमचे गोपाळ श्रीकृष्ण यांची ८० रुपयांचे जागेवर शिफारस झाली होती ती हुकली याबद्दल आह्मांस वाईट वाटतें. पण ते हुशार आहेत आणि डिपुटी कमिशनर त्यांचे अभिमानी आहेत तर लवकरच दुसऱ्या एकाद्या प्रसंगीं त्यांस वाढवितील अशी आह्मास उमेद आहे.

येथील हायस्कूल व ट्रेनिंगकालेज यांतील विद्यार्थ्यांच्या सोयीकरितां बोर्डिंग [ भोजन शाळा ] सुरू आहे त्यास मदत व्हावी ह्मणून रेसिडेंट साहेबांनीं महिना ३० रुपये देण्याचें सांगशन केलें असें समजतें. उमरावतीस अजून बोर्डिंग कां होत नाहीं तें समजत नाहीं.

मि० किट्स बंगाल सिव्हिल सर्व्हिस वऱ्हाडांत थर्ड असिस्टंट कमिशनर नेमल्याप्रमाणें १० दिवसांपूर्वीं ते उमरावतीस कमिशनर साहेबांकडे येऊन दाखल झाले. व त्यांनां उमरावतीसच आपलें कोर्ट सुरू करण्याची परवानगी मिळाली. उमरावतीकर आमचे वंधु लिहितात कीं मि० केसी साहेब या नावाचे आणखी एक बंगाली सिविल सर्व्हिस इकडे पाठविण्याकरितां योजिले होते पण ते नाकबूल झाले तेव्हां आतां दुसरे कोणी गृहस्थ नेमले जातात कीं काय पहावें.

मि० बैरामजी जामासजी नांदेडचे अव्वल तालुकदार अकोल्यास आपले बंधूचे भेटीस आले होते ते परत जाण्याकरितां मुंबईकडे गेले. त्यांची बदली रायचुरास झाली असेंही समजण्यांत आलेंआहे.

रा. रा. वामन महादेव कोलटकर नागपुरचे विद्याखात्याचे डायरेक्टरचे हेड क्लार्क व क्युरेटर येथें आले होते यांनीं एक वर्षाची हक्क राखून रजा घेतली आहे असें समजतें. यांचे मनांत पुणें मुंबईकडे जाऊन कायद्यांचा अभ्यास करावा व मुनसफ किंवा वकील व्हावें असें आहे.

जुडिशियल कमिशनर साहेब बुलढाण्यास सेशनाकारितां गेले होते तो मुकद्दमा मागें तारीख १ अगष्टचे आमचे अंकांत लिहिलेल्या ३ सिक गुन्हेगार लोकांवर शाबीद होऊन त्यांस जन्मपर्यंत काळे पाण्यावर पाठविण्याची शिक्षा झाली.

उमरावतीचे म्युनिसिप्यालिटींत मि० अंडरसन साहेब व रा. रा. यशवंत गोविंद सातारकर प्र० सिं० कर्ते यांच्या नवीन नेमणुका करण्याविषयीं शिफारस झाली आहे असें कळतें.

अकोल्याच्या बाजाराची सुधारणा करण्यासाठीं सुमार २४००० रुपयांची रकम सरकारास उसनवार मागावी असा म्युनिसिप्यालिटीचा विच्यार आहे.

अकोल्यास शहरांतला भाजी बाजार पातुर रस्त्यावर बसत होता तो तेथून काढून त्याच चौकांत पाश्चिमेच्या बाजूस म्युनिसिपल कमिटीनें बसाविला. त्या कामांत कमिटीच्या शिपायाशी एका मुसलमान भाजीवाल्यानें दांडगाई केली त्याजवर तहशिलदाराकडे मुकद्दमा होऊन त्यास ८ रुपये दंड किंवा १९ दिवसांची कैद अशी शिक्षा झाली.

एक अंधळा भिकारी आततताईपणानें भिक्षा मागत असतां सुमार १० शेर वजनाचा दगड वारंवार छातीवर मारून घेत असे त्याजवर तहशिलदाराकडे मुकद्दमा होऊन २ रुपये दंड किंवा ८ दिवसांची कैद अशी त्यास शिक्षा झाली.

नशिराबादचे माजी मामलेदार, मद्रासेकडे सुबराव नावानें मिरवणारे, जगप्रसिध्ध श्रीधर विठ्ठल दाते कांहीं कामाकरितां दोन दिवस अकोल्यास येऊन स्टेशनावर उतरले होते. त्यांस पाहण्याकरितां बहुत लोक यात्रेप्रमाणें जात असत. दाते हुशार व बुध्धिमान तर खरेच पण त्यांच्या वाचाळपणाची व फाजिलपणाचीही कमाल दिसून आली. हे आतां पुण्यास मेहूणपुऱ्यांत सुखवस्तु राहात असतात.

अडगाव कोर्टाचे शिरस्तेदार रा. रा. रामराव व्यंकटेश दोन आठवड्यापूर्वीं शनिवारची रजा विच्यारून मंडळीस भेटण्याकरितां येथें आले होते व रविवारीं संध्याकाळीं परत गेले पण पावसापाण्यामुळें व नदीच्या पुरामुळें सोमवार तिसरे प्रहर पर्यंत ते कामावर दाखल झाले नाहींत असें पाहून रा. रा. पुरुषोत्तम नारायण त्यांचे अधिकारी यांनीं डिपुटी कमिशनर साहेबांस अशा अर्थाचा रिपोर्ट केला कीं आमचे शिरस्तेदार अजून कामावर आले नाहींत सबब त्यांचा नोकरीवरील हक्क दूर झाला असें आह्मी समजतों व हुजूरचा हुकूम आल्याशिवाय आह्मी त्यांस कामावर रुजू करणार नाहीं. व त्याप्रमाणेंच शिरस्तेदार हजर झाले असतां त्यांनीं वर्तन केलें पण आमचे विच्यारी डिपुटी कमिशनर क्या० बुलक साहेब यांना पुरुषोत्तमरावाच्या लिहिण्यांत कांहीं अर्थ दिसला नाहीं व त्यांनीं रामराव यांस रुजू करावें असें त्यांस लिहिलें.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं या वर्षीं वऱ्हाडांतून १९ विद्यार्थी म्याट्रिक्युलेशन परिक्षेस जाणार आहेत. एवढी संख्या आजपर्यंत कधींही गेलेली नाहीं ह्मणून ज्याप्रमाणें अधिक विद्यार्थी जातात त्याप्रमाणें अधिकजण पासही होवोत असें आह्मी इच्छितों. या १९त उमरावतीचे ८ व अकोल्याचे ७ आहेत.

उमरावतीचे छापखाने वाले मि० कालिन्स साहेब यांनीं सर्पदंशावर लिकर पोट्याश हें औषध लिकर अमोनिया पेक्षां अधिक प्रशस्त आहे व तें आपण एकास दिलें असतां त्यास उत्तम गुण आला असें एक पत्र टाइम्समध्यें छापिलें आहे. त्याचा अधिक खुलासा आह्मी पुढें लिहू.

## नोटिस.

नंबर. ११७७

मेहेरबान रेसिडेंट साहेब बहादुर यांनीं तारीख ९ माहे सेप्टेंबर सन १८७९ इ० रोजचे रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिध्ध केलेली जाहिरात नंबर ७४ तारीख २४ माहे आगस्ट सन १८७९ इसवीचे अन्वयें सरकारी आफिसांतून उमेदवारी व नोकरी मिळण्यास सवड व्हावी याजकरितां पहिले प्रतीचे व दुसरे प्रतीचे दाखले देण्यासाठीं परीक्षा होईल. जे उमेदवार पहिले प्रतीचे दाखले मिळविण्यास इच्छित असतील त्यांची परीक्षा हायस्कुलाचे मुलांबरोबर नववे यत्तेंत घेतली जाईल. व जे दुसऱ्या प्रतीचे दाखले मिळविण्यास इच्छित असतील त्यांची परीक्षा हायस्कुलांतील प्रवेशपरिक्षेंत येणारे उमेदवारांबरोबर सहावे यत्तेंत [इंग्लिशविषय खेरीज करून] घेतली जाईल हायस्कुलांतील वर्गाची परीक्षा तारीख १२ माहे अक्टोबर सन १८७९ इसवी रोजीं होईल आणि प्रवेशपरिक्षा तारीख १९ माहे नवंबर सन १८७९ इसवी रोजीं सुरू होईल. सदर परीक्षा येकेचवेळीं उमरावती आणि अकोला येथें होतील.

पहिले प्रतीचा दाखला मिळवूं इच्छिणाऱ्या उमेदवारांनीं आपले अर्ज तारीख ९ माहे अक्टोबर सन १८७९ इसवीचे आंत डायरेक्टर साहेब यांचे कचेरींत दाखल केले पाहिजेत, आणि दुसरे प्रतीचा दाखला मिळविणाऱ्या उमेदवारांनीं ता० १ माहे नोवेंबर सन १८७९ इसवीचे आंत आपले अर्ज दाखल केले पाहिजेत.

जे उमेदवार वऱ्हाडी असतील अथवा वऱ्हाडांत ९ वर्षें पर्यंत राहिलेले असतील त्यानीं आपले अर्जाबरोबर दोन सभ्य गृहस्थांचे दाखले डायरेक्टर आफ पब्लिक इनस्ट्रक्शन यांजकडे पाठवावे. यांपैकी एक दाखला ज्या शाळेंत तो उमेदवार शिकला असेल त्या हेड मास्तराचा असावा व त्यांत उमेदवार खरे वऱ्हाडी किंवा ९ वर्षें वऱ्हाडांत राहिलेले आहेत असें असावें.

हायस्कुलचे वर्गाचे व प्रवेश परिक्षेचे निकाल समजल्यावर जे उमेदवार परिक्षेंत उतरतील त्यांस लायकीचे दाखले दिले जातील आणि परिक्षेंत उतरलेले उमेदवारांचीं नांवें वगैरे एज्युकेशनल रेकार्डांत आणि हैदराबाद रेसिडेन्सी आर्डरमध्यें छापून प्रसिद्ध केलीं जातील.

अकोला ता. १७
सप्तंबर सन १८७९ इ.

F. A. H. Elliot
आफि. डायरेक्टर आफ. प. इ.
हैदराबाद अ- डिस्ट्रिक्ट

## वर्तमानसार

मि० जमशेटजी नौरोजी उनवाला यांस दरमहा ६०० रुपये पगार करून श्री० सयाजी महाराज गायकवाड यांस शिक्षक नेमणार असें चांगल्या आधारा वरून रास्त गोफतार कर्यांस समजलें आहे. परंतु श्रीमंत सयाजी महाराज बडोद्याचे गायकवाड यांस शिकविण्याकरितां युरोपियन शिक्षक ठेवावा असा मीड साहेबांचा विच्यार आहे असें टा० क० ह्मणतात.

बडोद्याच्या हायकोर्टांत मि० करशेटजी यांस जडज नेमिलें. त्यांस १२०० रुपये पगार देणार असें समजतें.

मद्रासेस शेतकीसंबंधी विद्या शिकविण्याचें कालेज स्थापन करण्याचा निश्चय झाला. त्यावर मि० राबर्टसन साहेब यांस प्रिन्सिपाल नेमणार. या कालेजांत शिकावयास जाऊं इच्छिणाऱ्या लोकांची प्रथम प्रवेशपरीक्षा होईल व जे लोक पास होतील त्यांस चार वर्षे शिकाविलें जाईल. सर्व जातीचे लोकांस, शिकावयाची मोकळीक आहे.

अशी एक वदंता पसरली होती कीं, बडोद्याचे माजी स्पेशियल कमिशनर सर लुइस पेली साहेब विलायतेस रजेवर आहेत ते सर बार्टल फ्रियर यांच्या एका मुलीशीं लग्न करणार व मुंबईचे गवरनरचे जागेवर नेमणूक होऊन येणार पण ही खरी दिसत नाहीं.

प्रिन्स आफ वेल्स गुजराथेंत अमदाबादेस जातील असा पहिला घाट होता पण आतां न जाण्याचा विच्यार निघाला आहे.

मि० सूटर साहेब मुंबईचे पोलिस कमिशनर विलायतेचे रजेवरून गेल्या आठवड्यांतल्या मंगळवारीं परत आले.

मि० दामोदर पुरुषोत्तम मुंबईच्या ग्रान्ट मेडिकल कालेजांतील विद्यार्थी वैद्यक परिक्षेकरितां विलायतेस जाणार हें ऐकून आह्मास संतोष होतो.

कानपुरास भागीरथी नदीवर रेलवेचा पूल बांधिला त्याची तपासणी झाली त्यावेळीं तोफखाना, हत्ती, घोडे, उंट वगैरे त्यावरून एकदम चालवून पाहिले व तो असावा तसा मजबूत झाला आहे असा ठराव केला.

सिविलियन लोक व लष्करी लोक यांच्या मानमरातबीच्या संबंधानें सरकार नवीन कांहीं ठराव करणार आहे असें समजतें.

शेतकरी लोकांच्या दंग्याच्या चवकशीसाठीं कमिशन बसलें आहे त्याचें काम चालत असतां वर्तमानपत्रांचे रिपोर्टरास तें लिहून घेण्याची मनाई केली आहे.

मुंबईचे पोलिस कमिशनर मि. सूटर साहेब हे साऱ्या मुंबई इलाख्याचे पोलिसाचे इन्स्पेक्टर जनरल होणार असें वर्तमान आहे. हें त्यांस बडोद्याच्या उत्तम कामागिरीचें बक्षीस असावें.

मुंबईचे हायकोर्टांतील मुसलमान वकील मि० शेख आमिरोदीन हे विलायतेस बारिस्टर होण्याकारितां जात आहेत असें समजतें.

रावबहादुर महादेव गोविंद रानडे यांस बडोदा सरकारानें मुंबई सरकारचे मार्फत विचारिलें आहे कीं बडोदा येथील चीफ जस्टिसची जागा पतकरण्यास तुह्मी कबूल आहां किंवा नाहीं, यावर रावबहादुरानीं, पेनशनास माझा हक्क लागू राहिल्यास मी ती जागा पतकरण्यास कबूल आहे असें उत्तर दिल्याचें समजतें.

ज्ञा. च.

---

## अयोध्या व लखनौ.

अयोध्या प्रांत हा पुष्कळ दिवस मुसलमानांच्या ताब्यांत असल्यामुळें व धर्माच्या बाबतींत मुसलमान लोकांचा हिंदूंवर जुलूम यामुळें अयोध्या शहर ह्मणजे दशरथाची राजधानी व रामाचें जन्मस्थान असूनही वर सांगितलेल्या कारणावरून असावें तेवढें प्रसिद्ध नाहीं आणि त्याचे जागीं किंवा जवळच मुसलमानी फैजाबाद हें शहर प्रसिद्ध आहे. ह्मटलें ह्मणजे इतर क्षेत्रांसारिख्याच मथुरा वृंदावन एथेंही मुसलमान बादशाहांनीं हिंदूंचीं देवळें मोडून त्या ठिकाणीं मशिदी बांधिल्या व शहरांचीं हिंदूनावें बदलून मुसलमानी नावें ठेवण्याचा प्रयत्न केला; परंतु त्या ठिकाणीं यात्रेचा झपाटा असल्यामुळें तो प्रयत्न सिद्धीस न जातां मुसलमानी सत्ता नाहींशी होतांच जुन्या देवालयाचे जागीं नवीं होऊन तीं क्षेत्रें पूर्वींसारखींच पुनः बनून राहिलीं. अयोध्या शहरांतही नवीन देवळें बांधिलीं गेलीं ह्मणून समजतें; परंतु तें शहर इतरांसारखें आतां प्रसिद्धींत नाहीं.

अयोध्या प्रांताची अर्वाचीन राजधानी लखनौ. हें नांव रामाचा बंधु लक्ष्मण यावरून दिलें होतें असें ह्मणतात. परंतु लखनौ शहर ह्मणजे अयोध्येचे नबाब जे कांहीं वेळपर्यंत दिल्लीच्या बादशाहाचे वजीराचे कामावर होते त्यांणीं मोठेपणास आणिलें. सुंदर रचना, बागबगीचे, इमारती, ऐषआरामाचे पदार्थ करण्याचीं कसबें इत्यादि गोष्टींत युरोपखंडांत जशी पारीस शहराची ख्याति आहे तशी याची हिंदुस्थानांत आहे ह्मणून यास हिंदुस्थानाचें पारीस व गुलाबाचे फुलझाडाचा बाग अशीं नांवें दिलीं आहेत.

लखनौ शहर गोमती नदीच्या काठीं आहे. नदी आणि शहर यांच्यामध्यें मोठमोठे राजवाडे व बगीचे आहेत. सन १८५७ चें बंड होण्यापूर्वीं दिल्लीं व लखनौ या शहरांत सुंदर व भव्य अशा फार इमारती होत्या त्या बहुतेकांचा या काळांत विध्वंस झाला. आतां लखनौमध्यें कायम आहेत अशा मुख्य इमारती त्या ह्याः—

१. छतरमंझील ही केवळ नदीच्या कांठावर आहे. ही शेवटच्या नबाबानें ऐषआरामासाठीं बांधली होती. ही सध्या युरोपियन कामगारांचे खासगी स्वाधीन आहे. तिच्या एकभागांत लायब्ररी ठेविली आहे. दुसऱ्या भागीं मेजवान्या होत असतात व तिसरा भाग नाटकें वगैरे खेळ करण्यासाठीं ठेविला आहे.

२. केशरबाग. ही इमारत देखील शेवटच्या नबाबानीं बांधलेली. ही पुरी होण्याच्या अगोदरच ते पदच्युत होऊन राज्य खालसा झालें. ही इमारत मोठ्या विस्तीर्ण बगीच्यांत बांधली आहे. इची रचना अशी आहे कीं, मध्यभागीं एक मोठा वाडा नबाबास स्वतः रहाण्यासाठीं व त्यासभोंवते लहान लहान व चाळीसारिखे एकमेकांस लागून असे १०८ वाडे नबाबांच्या बेगमा व स्त्रिया यांस रहाण्यासाठीं केले होते. आतां हे वाडे तालुकदार लोक लखनौस येतात तेव्हां त्यांस उतरण्यासाठीं वगैरे वांटून दिले आहेत. मध्यभागाचा वाडा सर्व तालुकदारांत मोठे जे बळरामपुरचे महाराज त्यांच्या स्वाधीन आहे. नेटिवाच्या जाहीर सभा या वाड्यांत भरतात.

३. मच्छीभवन. ही जुनी नबाबांच्या कबरस्थानाची इमारत. हिची बांधणी मोठी सुंदर आहे. हिचा विस्तार इतका मोठा आहे कीं तिच्या तटबंदींत थोडासा फेरफार करून सरकारानें तिचा किल्ला बनवून तेथें तोफखाना व दारूगोळा ठेविला आहे.

४. दिलखुश. ही सुंदर इमारत शहरापासून सुमार कोसावर होती ती बंडाचे वेळीं नाश पावली. इचा कांहीं भाग उभा आहे.

५. शहराजवळ सरकारचे रेसिडेंट यांस रहाण्यासाठीं एक चांगला वाडा नबाबांनीं दिला होता तोही बंडाच्या लढाईंत मोडला. शेवटचे रेसिडेंट सर हेनरी लारेन्स हे या वाड्यांत लढत असतां गोळी लागून पडले. ती जागा राखून ठेविली आहे.

६. मार्टिनियर. ही इमारत मोठ्या करामतीनें बांधली आहे. ही तीन मजल्यांची आहे, परंतु खिडक्याखेरीज करून तींत एक देखील लाकडाचा तुकडा घातलेला नाहीं. मार्टिनियर नावाचा एक फ्रेंच सरदार नबाबाच्या चाकरीस होता. तो योग्यतेस चढून द्रव्यवान झाला. त्याणें ही इमारत नबाबास नजर करण्यासाठीं मुद्दाम स्वतःच्या अकलेनें बांधविली होती. परंतु ती पुरी होण्याच्या अगोदरच राज्य खालसा झालें. मग मार्टिनियर याणें हि इमारत व आपलें द्रव्य हीं नेटिव व युरोपियन याच्या विद्येच्या कामीं लागावीं. अशी व्यवस्था आपल्या मृत्युपत्रांत केली त्याबरहुकूम चालली आहे. इमारतींत सध्यां युरोपियनांची शाळा आहे. नेटिवांच्या वाटचा पैसा लखनौस कालेज बांधित आहेत त्याच्या फंडास मिळविला गेला.

७. याशिवाय लहान मोठ्या अशा पुष्कळ नबाबाच्या इमारती उभ्या आहेत. त्यांत सरकारी हपिसें ठेविलीं आहेत. व कित्येक भाड्यानेंही दिल्या आहेत.

सु. प.

---

## पंढरपूर प्रदर्शन.

पंढरपूर येथें आषाढ व कार्तिक या महिन्यांत प्रतिवर्षीं सुमारें एक लक्षावर यात्रा भरून दूरदूरचे लोक जमतात अशा जमावाचा लाभ घेऊन प्रदर्शन केलें असतां पुष्कळ लोकांस फायदा होईल असें येथील गृहस्थांनीं मनांत आणिलें. त्याप्रमाणें येत्या कार्तिक महिन्यांत सर्वत्र लोकांस व विशेषेकरून कारागीर व व्यापारी यांस उत्तेजन यावें अशा हेतूनें स्वभावसिद्ध व कारागिरांनीं केलेल्या पदार्थांचे प्रदर्शन करावे असें ठरविलें आहे. यास्तव सर्व कारागिर व व्यापारी लोकांस विनंती करण्यांत येतें कीं, त्यांनीं आपल्या कारागिरीचे व हिंदुस्थानांत झालेल्या पदार्थांचे नमुने खालीं सही करणाराकडे कार्तिक शुध्द ११ तारीख ९ माहे नोवेंबर सन १८७५ इसवीचे आंत पाठवून द्यावेत. पदार्थांच्या गुणाप्रमाणें त्याच्या करणारास अथवा मालकास प्रदर्शन कमेटीकडून बक्षिसें दिली जातील. जे पदार्थ विकण्यासारखे असतील ते लोकांनीं पसंत केल्यास व मालकाची मर्जी असल्यास विकले जातील. असें केल्यानें उत्तम कारागीर लोकांचे गुण जगप्रसिध्द होऊन धंदा व्यापार यास फार उत्तेजन येणार आहे ह्मणून सर्व मेहेनत घेऊन उत्तम नमुने पाठवितील अशी आशा आहे.

कित्येक कुशळ कारागिरास लिहितां वाचतां न आल्यामुळें वर्तमान पत्रांतील विशेष त्यास माहित होत नाहीं व प्रदर्शनाचा विचार या देशांत नवीन असल्यामुळें यापासून होणारे फायदे त्यांच्या लक्षांतही येत नाहींत. याकरितां विद्वान व लोककल्याणेच्छु गृहस्थ हे प्रयत्न करून अशा लोकांकडून पदार्थ घेऊन पाठवितील अशी उमेद आहे.

पंढरपुर, तारीख ४ सप्तंबर १८७५.

लालशंकर उमयाशंकर त्रवाडी
नारायण अनंत दांडेकर
जी. जी एम. सी.
पंढरपुर प्रदर्शन कमेटीचे
सेक्रेटरी

---


GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

### ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE

### नोटिस.

### मुंबईस धान्य आणण्याचे भाड्याचे दर कमी करण्याविषयीं

जाहिरखबर देण्यांत येतें कीं येते सप्तंबर महिन्याची तारिख १ रोजीं व त्यानंतर जबलपुरा पलीकडील रेलवेच्या स्टेशनावरील व होळकर स्टेट रेलवेच्या स्टेशनावरून व जबलपूर आणि खंडवा व नागपूर आणि बदनेरा यां मधील सर्व स्टेशनांवरून या रेलवेंतून फक्त मुंबईस पाठविलेल्या धान्याचे भाड्याचे दर कमी करण्यांत येतील.

सदरहू स्टेशनांपैकीं कोणतेही स्टेशनावर अथवा खालीं सही करणारास अर्ज केल्यास या विषयींची सर्व माहिती मिळेल.

हेनरी कांडर
जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई तारीख २७
आगस्ट १८७५ इ.


---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

REGISTERED NO. 5 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० २६ माहे सप्तंबर सन १८७५ इ० अंक ३९

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | ६।० |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

---

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०।०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

---

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE.

## नोटिस.

OPENING OF THE MUSJID STATION BETWEEN BOREE BUNDER, AND BYCULLA.

**बोरीबंदर व भायखळा या दोन स्टेशनचे दरम्यान मसीद नावाचें नवीन स्टेशन बांधलें ओहे त्याची सुरुवात.**

तारीख २० सप्तंबर रोज सोमवारीं वह्यानंतर पुढें फक्त उतारू नेण्या आणण्याकरितां बोरीबंदर व भायखळा या दोन स्टेशनांचे दरम्यान मसीद नावाचें नवीन स्टेशन सुरू करण्यांत येईल.

उतारू, लगेज, पार्सल्स व कुत्रे सदरील तारखेपासून या रेलवेवरील मसीद व दुसरे स्टेशनांचे दरम्यान पाठविण्यांत येतील.

मद्रास व कलकत्याकडून येणाऱ्या व त्या दिशेस जाणाऱ्या मालट्रेनी मसीद बंदरावर थांबणार नाहींत परंतु त्याखेरीज या कंपनीचे तारीख १ मार्च रोजीं प्रसिद्ध झालेल्या टाईम बिलांत जाणाऱ्या येणाऱ्या ट्रेनी लिहिल्या आहेत त्या सर्व मसीद स्टेशनावर निरनिराळ्या क्लासाचीं टिकिटें घेतलेल्या उतारूंस उतरण्याकरितां उभ्या रहातील.

शनवारीं तिसऱ्या प्रहरीं निघणारी गाडी मुंबईहून ( बोरीबंदरावरून )बराबर तीन वाजतां कल्याणास जाण्याकरितां निघते तीही मसीद स्टेशनावर उभी राहील.

मुंबईहून ( बोरीबंदरावरून )जाणाऱ्या गाड्या ज्या वेळेस निघतील असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे त्यापेक्षा तीन मिनिटें उशिरानें त्या मसीद स्टेशनावरून निघतील व मुंबईस येणाऱ्या गाड्या ज्यावेळीं भायखळ्यावरून निघतील असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे त्यापेक्षां सात मिनिटें उशिरानें त्या मसीद स्टेशनावरून निघतील.

मसीद स्टेशनावरून बोरीबंदर व कल्याण या स्टेशनास वे त्याच्या दरम्यानचे स्टेशनास जाण्याकरितां ज्यांस एक महिन्याचे किंवा तीन महिन्यांचे मुदतीचीं टिकिटें पाहिजे असतील त्यांस तीं खालीं सही करणाराकडे अर्ज केला असतां मिळतील.

जबलपूर, रायचोर व खंडवा यांच्या पलीकडील दुसऱ्या रेलवेच्या स्टेशनावर या रेलवेवरून उतारू नेण्यांत येतात त्या सर्व स्टेशनास मसीद स्टेशनावरून तारीख १ अक्टोबर रोजीं व त्यानंतर पुढें उतारू लगेज, पार्सल्स व कुत्रे पाठविण्यांत येतील,

घोडे व गाड्या मसीद स्टेशनावरून दुसऱ्या स्टेशनास पाठविल्या जाणार नाहींत व दुसऱ्या स्टेशनावरून त्या स्टेशनास येणार नाहींत.

तारीख २० सप्तंबर रोजीं मसीद स्टेशनावर टेलिग्राफ हपीसही सुरू होईल व तेथून दुसऱ्या स्टेशनास पैसा घेऊन बातम्या पाठविल्या जातील व या स्टेशनास पाठविण्याकरितां दुसरे स्टेशनावर बातम्या घेण्यांत येतील.

**हेनरी कांडर,**

जनरल ट्राफिक म्यानेजर.

मुंबई ता १७ माहे सप्तंबर सन. १८७५ इसवी.

---

## नोटिसा.

---

नोटिस.

बेशमी जयराम वल्लद, रामाजी पोटे व बिठोबा वल्लद मानसिंग बढे उभयता रहाणार मौजे पळसो बुजरुख प्रगणे मूर्तिजापुर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, मौजे पळसो बुजरुख येथील नंबर निशाणी गोधनचें हें आम्ही अरदबटाईनें वामनराव व लक्ष्मणजी बढे यांजपासून वाहिलें व तुमची त्याहाची रुपये २४ ची तक्रार असल्यावरून अमानत ठेवण्याचे बोलीनें तुह्मी उभयतांनीं जबरदस्तीनें माल नेला तो असा:— जवारी ४॥ साडेचार खंडी, करडी २ दोन खंडी, जवस ७ सात खंडी, तीळ २॥ अडीच खंडी व कापूस २ दोन खंडी. येकूण १८ खंडी माल नेला. नंतर कांहीं दिवसांनीं तुह्मी असें सांगितलें कीं, तूं पावती दे नंतर मी माल देतों अशी थाप देऊन मजपासून पावती घेतली व मला माल दिला नाहीं व मजला विनाकारण चाळविलें सबब तुह्मास नोटिस देण्यांत येते कीं नोटिशीचे तारखे पासून आठ दिवसाचे आंत सदरहू वर लिहिलेला माल उभयतांनीं माझा मला देऊन निकाल करावा. न केल्यास नोटिशीचे खर्चासुद्धां दिवाणी कोर्टांत फिर्याद करून एकंदर माल भरून घेतला जाईल. तारीख २० माहे सप्तंबर सन १८७५ इसवी.

सहीची निशाणी निळू<br>
वल्लद सरावनजी बिसे<br>
याचे हातची असे.

---

नोटिस.

विष्णा वल्लद भगवान भगत रहाणार दापुरें प्रगणें महान तालुके अकोलें यांस सखाराम व बुटाजी वल्लद होनाजी देशमुख क्षैसांगकर याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्माकडे खातेबाकीवरून येणें होतें त्याचा हिशेब करून तुह्मी मार्गशीर्ष वद्य ५ सन १२८२ फसली रोजीं बाकी ६२५ नक्की काढून टिकीट लावून सही करून दिली व दर साल १२५ रुपये प्रमाणें पांच सालांत सर्व फडशा करण्याचा करार केला. त्याजवर दोन सालें गुजरून गेलीं. सन १२८३ फसलींत मात्र सुमार ४४ रुपयांचें जवस दिले ते रुपये तुमचे जमा केले आहेत त्यापुढें कांहीं वसूल दिला नाहीं. दोन हप्तेबद्या चुकल्या यास्तव आतां या नोटिशीनें तुह्मांस कळविण्यांत येतें कीं नोटिस पोचल्यापासून एक महिन्याचे आंत तुह्मी येऊन सर्व बाकीचा निकाल करावा. न केल्यास कायद्याप्रमाणें तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां भरून घेण्यांत येईल. व या नोटिशीचा खर्च तुह्माला देणें लागेल कळावे तारीख २२ माहे सप्तंबर सन १८७५ इसवी.

( सही ) सखारामजी व बुटाजी<br>
वल्लद होनाजी व० बाबू-<br>
सखारामजी देशमुख<br>
दस्तुर खुद्द.

---

नोटिस.

बेशमी छेनूलाल व मणूलाल वल्लद विठोबालाला जात मल्ई रहाणार पेठ मूर्तिजापूर यांस खालीं सही करणार याज कडून नोटिस देण्यांत येतें कीं, कसबे हादगाव येथील खुद्द माझा शेतीचा नंबर १८० मी तुह्मास तयार करण्याकरितां लाविला होता तो नंबर मला जरूरीचें काम पडल्यामुळें मी वामनराव जमादार यांस फरोक्त केला. व तुह्मास सांगितलें कीं, आपण माझ्याप्रमाणें त्याहास या सेताची वहिती दरखास्त करून देण्याविषयीं आपणास मी सांगितलें परंतु आपण आज करून देतों उद्या करून देईन असें चाळवित चालले व जमादार कबजा घेण्याकरितां दिवाणींत दावा करितात ह्मणून आपण आठ दिवसांच्या आंत त्याहाचे येथें जाऊन वहितीची दरखास्त द्यावी. याप्रमाणें न केल्यास दिवाणी कोर्टाचा खर्च व नुकसान तुह्मास भरून द्यावें लागेल. मी कोणतेही गोष्टीचा जवाबदार नाहीं करितां आपणास या नोटिशीनें कळविलें आहे. तारीख २० माहे सेप्तेंबर सन १८७५ इसवी.

(सही) सदू वल्लद श्रावण साळी<br>
निशाणी खुद्द.

---

नोटिस.

माधो बापूजी ठाकरे वस्ती वाडेगाव यांस झांगो वल्लद सखाराम नाथ वस्ती कसबे मजकूर याजकडून नोटिशीचें उत्तर देण्यांत येतें तें बि तपशील-

तुह्मी आह्मावर ३९।=॥ बाकी काढली आहेती अगदी खोटी आहे. बांडीच्या सालीं फार महागायी झाली होती तेव्हां आह्मी तुह्माला ३०० पेंड्या कडबा, १० मण कापूस, व दररोज वाटकाचा एक भारा याप्रमाणें आह्मापासून घेतला व आमच्या ३९ जोड्या वाहिल्या त्याचा हिशेब करतांना आमची बाकी तुह्माकडे सुमार ५० रुपये फाजील निघाली ती तुह्मास मागूं लागलों तेव्हां तुह्मी हिशेबाची फर्द फाडून टाकिली. तिजबद्दल आमचेच तुह्माकडे घेणें असतां तुह्मी बेमानपणानें आतां आह्मांस नोटिस देता ही गैरशिस्त आहे. सबब आमचे रुपये ५० व या नोटिशीचा खर्च पाठवून द्यावा. नाहीं. पेक्षां तुह्मावर दिवाणींत दावा करून रकम घेण्याची तजवीज केली जाईल. कळावे तारीख २२ माहे सप्तंबर सन १८७५ इसवी.

( सही ) झांगो नाथ वल्लद<br>
सखाराम नाथ<br>
दस्तुर खुद्द.

---

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं न ये

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. महाराज, मी ज्या ह्या अल्प गारगोट्या आपल्या सेवेस सादर केल्या आहेत, त्यांचा रांधा करून आरसा करून प्रसिद्ध करणें आपणावर सोंपतों.

वऱ्हाडास उपयुक्त असा उद्गार.

मागें मेहेरबान अलेक्झांडर ग्रांट साहेब एल. एल. डी. यांणीं कलकत्ता, मद्रास, आणि मुंबई या तिन्ही इलाख्यांच्या विद्वत्तेची तुलना करून आधारपूर्वक प्रमाणें दाखवून ठरविलें कीं, "कलकत्ता व मद्रास युनिव्हर्सिटीच्या परीक्षेपेक्षा मुंबई युनिव्हर्सिटीची परीक्षा फार कठीण व अधिक कसोटीची असते, ह्मणून इतर इलाख्यांपेक्षां मुंबई इलाख्याचे पदवीवाले अधिक परिपक्क आहेत." ही गोष्ट त्या काळीं प्रख्यात वर्तमानपत्रांतून छापून प्रसिध्द झालीच आहे.

तशा या आपल्या शेजारच्या मुंबई इलाख्यापेक्षांही या वऱ्हाड प्रांतांत विद्यावृद्धीचा प्रसार अधिक त्वरित गतीनें ह्मणजे तिकडील २९ वर्षांत व्हावयाचा तो एथें आठ वर्षांत झाल्याचें दळदळीत उदाहरण दाखवून रा. रा. विष्णुपंत अण्णासाहेब महाजनी एम. ए. गेल्या २२ वे ता०स अकोल्यास सभेंत बोलल्याचें वऱ्हाडसमाचारांत छापून प्रसिद्ध झालें आहे. तेव्हां वऱ्हाडवासी जनांस ही मोठ्या उत्तेजनाची व पुढील उमेदीची गोष्ट आहे.

या देशाच्या विद्यावृद्धीच्या पायाचीं जीं तीन मोडी पुस्तकें आहेत तीं जरी मराठी पुस्तकेंच आहेत तरी त्यांत अन्य भाषांतील बरेच शब्द आले आहेत. त्यांचा अर्थ समजणें व अर्थाकरितां कितीएकांची व्युत्पत्तीही समजणें अवश्य आहे. कितीएक शब्दांस मार्मिक व लागू अशा अर्थाचा पर्याय शब्द देणें अमळ विचाराचें आहे. ह्मणून तीं पूर्वोक्त पुस्तकें शिकलेल्या बहुतेक मुलांस त्यांतीलच शब्दास पर्याय शब्द सांगण्यास ज्या नडी येतात त्या दूर व्हाव्यात या हेतूनें 'पर्यायशब्दसंग्रह' असावा असा मला उद्गार झाला आहे.

या उद्गाराच्या पुष्टीकरणास कोणी सज्जन पुढार घेतील तर मी यथाशक्ती सेवेस तत्पर आहे. लोभ करावा ही विनंती ता. २० सप्तंबर सन १८७५ इसवी.

एक
पत्र वाचणारा.

# वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य १२ शके १७९७

## वऱ्हाडांत आठवडाभर सुटीची अवश्यकता.

नोवेंबर महिन्यांत प्रिन्स आफ वेल्स मुंबईस येणार व त्यांचे भेटीस आमचे प्रांताचे धनी निजाम सरकारही जाणार असें ठरलें व त्यांच्या उतरण्याच्या जागेविषयीं वगैरे तजवीज लावण्यास हैदराबादेहून मुंबईस मंडळीही रवाना झाली तो मजकूर वऱ्हाड सदराखालीं आमचे वाचणारे पहातीलच. आतां त्यासंबंधानें रेसिडेंट साहेबांस एक विनंती करणें आह्मांस अवश्य वाटतें कीं, त्यांनीं नोवेंबर महिन्यांत मुंबईस राजपुत्राकरितां जो हा मोठा समारंभ होणार आहे तो पहाण्यास जाण्याकरितां इकडील सरकारी नोकरास, सुमार एक आठवड्याची रजा द्यावी. आमच्या वऱ्हाड प्रांताचे खुद्द मालक निजाम साहेब व आमच्या हिंदुस्थानच्या स्वामिणीचे चिरंजीव प्रिन्स आफ वेल्स हे मुंबईस येणार आणि या उभयताही भाग्यशाली व अत्यंत थोर पुरुषांचें एक समयावच्छेदें दर्शन होणें ह्मणजे कपिलाषष्ठीहूनही एक मोठा पर्वकाळ समजला पाहिजे आणि तो अनायासें साधतो आहे तर रेसिडेंट साहेबांनीं कृपा करून वऱ्हाडांतील सरकारी आफिसें एक आठवडाभर बंद ठेवावीं ह्मणजे सर्व लोकांस फार संतोष होईल. दोघाही राजबिंड्यांचें दर्शन वऱ्हाडांतील आबालवृद्ध इच्छितात आणि तें त्यांस होऊं दिलें तर लोकांची मोठी सोय केली असें होईल. निजाम सरकारानें हैदराबादरेल्वे सुरू केली तेव्हां वऱ्हाडांतले युरोपियन अधिकारी बहुतेक हैदराबादेस गेले होते व त्यांनीं निजाम साहेबांस पाहिलें आहे. त्याचप्रमाणें आतांही निजाम सरकार मुंबईस येताहेत तर रेसिडेंट साहेब त्यांबरोबर येणारच व इतकें झालें ह्मणजे इकडील कमिशनर, डिपुटी कमिशनर, व दुसरे खात्याचे मुख्याधिकारी यांचें जाणें होईलच व त्यांस नेण्याची सवड रेसिडेंट साहेब करतीलच; व त्यांच्या आणि निजाम सरकारच्या भेटी होतीलच परंतु इकडील कचेऱ्या सुरू राहिल्या तर क्लार्क, राइटरर्स. शिरस्तेदार, कारकून व कोर्टांतून येणारे पक्षकार, साक्षीदार वगैरे शेकडो लोकांस इकडेच कुचंबत रहावें लागेल. व त्यांचें चित्त सारें मुंबईकडे व तेथें घडणाऱ्या गोष्टींकडे लागून राहील. सबब त्या सुमार ८ दिवसांत जितक्या आफिसांस सुटी देववेल तितकी देवविण्याची रेसिडेंट साहेबांनीं कृपापूर्वक तजवीज करावी. हिंदुस्थानांतील इतर भागांतले लोक आपल्या एक मालकास भेटणार व आमचे वऱ्हाड प्रांतांतील लोक आपले दोघांही मालकांस भेटणार ह्मणून वऱ्हाडवासी जनांस या कामीं रजा मागण्याचा इतरांपेक्षां दुप्पट हक्क आहे व तो त्यांस देणें वाजवी आहे असें आह्मांस वाटतें.

रेलवे कंपनीसही आमची या वेळीं शिफारस आहे कीं या समारंभाची मौज पहाण्याकरितां मोठ्या उत्कंठेनें गरीब गुरीबही बहुत लोक मुंबईस जाऊं इच्छित आहेत. तर नोवेंबर महिन्यांत त्या समारंभाच्या दिवसां पुरता रेलवे कंपनीनें टिकिटांचा दर थोडा कमी केला किंवा थर्ड क्लास रिटर्न टिकिटें केलीं तर सामान्य प्रतीच्या लोकांची ईच्छा तृप्त होईल व खरोखर बहुत लोक मुंबईस जातील व तेणें करून रेलवे कंपनीचेंही नुकसान होणार नाहीं. यात्रा वगैरे बहुत प्रसंगीं असें करण्याची रेलवे कंपन्यांची वहिवाट आहे सबब याही महत्कार्याकरितां आह्मी त्यांना तसें करण्याची शिफारस करितों.

## मारवाडी लोकांची गर्दी व त्यांस शिक्षा.

आमचे महाराष्ट्र देशांत गावोगाव दुकानदार मारवाडी आहेत. प्रथमारंभीं हे स्वदेशाहून येतात तेव्हां यांची संपत्ती फुटकी लोटी, फाटकें धोतर, तुटकें पागोटें इतकी असती आणि ५।१० रुपये भांडवलांत ते मिठा पिठाचें दुकान मांडतात व लवकरच अडाणी कुणबी लोकांच्या माना मुरगाळून शेट बनतात. आणि १०।१५ वर्षें असा व्यापार चालला ह्मणजे तर ते मोठे साहू बनून मिठा पिठाची दुकानदारी सोडून देऊन हुंडीवाले बनतात. असे लोक आमच्या वाचकांच्या पहाण्यांत बहुत असतील. त्यांनीं आमच्या देशाची लक्षावधि रुपयांची नासाडी केलेली आहे. कुणबी लोकांपासून एकेक रुपयाकरितां पन्नास पन्नास रुपये घेऊन शेवटीं त्यांचा सर्वस्वी नाश करून त्यांस देशोधडीस लाविलें अशा कामीं पुष्कळ मारवाडी लोकांच्या आख्या सापडतील. पुणें नगर वगैरे प्रांतीं शेतकरी लोकांनीं जो नुकताच दंगा केला तो यांच्याच जुलमामुळें केला. अशीही जाति आमचे देशास प्रस्तुत मोठी पीडाकारक झाली आहे.

तरी आमची आजवर अशी समजूत होती कीं मारवाडी ही जात दांडगी नव्हेती अडाणी लोकांच्या अविद्येचा आपल्यास फायदा करून घेऊन सरळव्याजांत, चक्रवाढ व्याजांत, वसूल जमा न करण्यांत, खोटे हिशेब करण्यांत वगैरे चलाखी करून एक रुपयाचे दहा रुपये करिते नंतर सरकार दरबारच्या कायदेशीर रीतीनें हुकूमनामे मिळवून त्या लोकांचीं घरें दारें लुटते. पण हल्लीं त्या जातींत दांडगायीचा कांहीं नवा क्रम सुरू झालेला आहे असें दिसतें.

खोटे हिशेब, खोटे जमाखर्च व इतर खोटीं कामें केल्याबद्दल कित्येक मारवाड्यांस शिक्षा झाल्याचीं उदाहरणें आह्मांस ठाऊक आहेत. परंतु ५।७ मारवाडी भर दिवसा कुळाचे घरांत शिरून जबरदस्तीनें त्याशी दांडगाई करून व त्याचे मालाची लूट करून केवळ मांग रामोशीपणा करितात असा प्रकार आजवर ऐकण्यांत आला नव्हता तो आतां ऐकिला व त्याची हकीकत वाचकांस कळविण्याकरितां मलकापुरचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर रा. रा. बापूजी रंगनाथ यानीं त्या मुकद्दम्याचा फैसल केलेला चौथे पृष्ठावर छापिला आहे तो समग्र वाचण्यास आह्मी आपले वाचकांस शिफारस करितों.

जून महिन्यांतील २७ वे तारखेच्या आमच्या वर्तमानपत्रात "खरी असल्यास अतिशय जुलमाची गोष्ट" या सदराखालीं नांदुऱ्याच्या ९।१ मारवाडी लोकांनीं सखाराम नावाच्या एका गरीब रंगाऱ्याचे घरावर चालून जाऊन अतिशय गर्दी केली या बाबद मजकूर लिहिला होता तीच ही गोष्ट आहे. व तिची चौकशी होऊन बापूजी रंगनाथ यांनीं सात मारवाड्यां पैकीं एकास निरपराधी ठरवून सहा जणास शिक्षा दिल्या हें कांहींअशीं बरें झालें. परंतु बंदोबस्तास, अन्यायाकरितां दहशत बसण्यास व न्यायाचें समाधान होण्यास या मुकद्दम्यांतील या दंडाच्या शिक्षा केवळ अल्प आहेत असें आह्मांस वाटतें. हे मारवाडी लोक लक्षावधि रुपयाचे धंदे करताहेत, त्या गावांत पहिल्या नंबरचे प्रतिष्ठित आहेत, कोणी म्युनिसिप्यालिटीचे मेंबरही आहेत आणि अशांनीं भर दिवसां एका गरीब मनुष्याचे घरीं चालून जावें, त्याला व त्याच्या बायको आईला मारावें, स्त्रियांच्या अंगाला स्पर्श करून जबरदस्तीनें त्यांचे दागिने काढून घ्यावे, व मन:पूत खोटे रोखे लिहून तयार करावे वगैरे केवळ बंडवाल्याप्रमाणें धुमाळीचीं कृत्यें करावीं आणि दीडशें दोनशें रुपये दंड देऊन सुटून जावें हें फारचफार भयंकर आहे. व तशा श्रीमान लोकांना अशी दंडावारी सुटण्याची सवड मिळाल्यानें ते अनावर होऊन पाहिजे त्याच्या घरांत शिरून पाहिजे तशी अनीतीचीं, चोरीचीं, व जुलमाचीं कृत्यें करून दंड देऊ देऊ मोकळे होतील असें मानण्यास कारण आहे. पि० को० क० १४७ व क० १४८ या बरहुकूम अपराध केल्याचें माजिस्त्रेटानीं त्यांवर शाबीद ठरविलें पण त्या अपराधास कैदेची शिक्षा कायद्यांत सांगितलेली असतां ती न देण्याची मेहेर नजर केली. व पोलिसानें क० ४५१ प्रमाणें हा गुन्हा घडला असल्याचें चलाण केलें असतां माजिस्त्रेटानीं "तसें घडलें नसावें वाटतें" अशी कल्पना करून तें कलम बदललें. त्यावरून आह्मी क० ४५१ काढून पहातां त्यांत कैदेशिवाय नुसत्या दंडावर कैदीला सोडतांच येत नव्हतें असें आढळून आलें व त्यावरून तें कलम बदलल्याबद्दल आह्मांस फार वाईट वाटलें.

न्यायाधिशाची नजर पोंचेल तोंच न्याय ही गोष्ट खरी पण अपराधाचें स्वरूप, अपराध करणाऱ्यांची स्थिति, आणि त्या अपराध्यापासून व शिक्षेपासून पुढें लोकांच्या सर्वस्वावर होणारा परिणाम यावर न्यायाधिशानें फार बारिक लक्ष्य पोंचविलें पाहिजे असें आह्मांस वाटतें. जो या सहा मारवाड्याना मिळून ६०० रुपये दंड झाला हाच सहा हजार जरी झाला असता तरी त्याची क्षित त्यांनीं बिलकूल बाळगली नसती सबब अशा क्षुल्लक शिक्षेपासून त्यांस तसा अपराध न करण्याविषयीं किती दहशत उत्पन्न झाली असावी? याचें अनुमान सहज होतें. त्यांनीं बारिस्टर बोलाविला होता त्याचें काम पडलें नाहीं तरी त्याला ६०० रुपये दिले व घरीं येण्याबरोबर शेकडो रुपयांचे नवस फेडले असें ऐकतो. आणखीही एक चमत्कारिक गोष्ट आह्मांस समजली आहे कीं या मुकद्दम्याच्या चौकशीचे दिवशीं कैदी तर्फे बारिस्टर मुंबईहून येणार होता तो आला नाहीं व माजिस्त्रेटानीं सर्व चौकशी करून शिक्षेचा ठराव लिहिला व तो कैदीस वाचून दाखवावयाचा इतक्यांत बारिस्टराकडून टेलिग्राम ( तारेंतून निरोप ) आला कीं मी येईपर्यंत मुकदमा तकूब ठेवावा व त्याप्रमाणें माजिस्त्रेट ठेवणार होते पण कैदींनीं घाई करून त्या टेलिग्रामाखालीं लिहून दिलें कीं आमचा मुकद्दमा तकूब न ठेवितां आतांच ठराव सांगावा. मग माजिस्त्रेटानीं फैसल्यांत लिहिलेला क्षुल्लक दंडाचा ठराव सांगितला. काय चमत्कार हा! एकादे कर्णपिशाच्चानें तर येऊन कैदी लोकांच्या कानांत सांगितलें नसेलना! कीं तुमचें मनेप्सित कार्य बारिस्टर आणून जें व्हावयाचें तें आतांच होत आहे, मग उगीच लांबणीवर कां टाकता! अस्तु. जें झालें तें त्यांच्या सुदैवानें झालें. व ते प्रथम कैदी झाले तेव्हां नाग

नें कोण्हे त्यांस भेटलें असावें असें वाटतें. आतां असे नरी आहे व कैदेची दुःखदायक शिक्षा त्यांस जरी झाली नाहीं तरी त्यांना कैदी ह्मणून ध्यावें लागलें, अल्प स्वल्प प्रतिबंध सोसावा लागला, अपमान झाला, अपकीर्ति झाली, व तोंडाला कलंक लागून तें चौघांत खालीं करावें लागलें व अपराध शाबीद होऊन, ते गुन्हेगार ठरले, हें दुःख त्यांनीं मानलें असतां थोडें आहे असें नाहीं व याची दहशत त्यांस व इतरांस कमी बसावी असें नाहीं. कोणी अब्रूदार भला मनुष्य आपणावर मुकदमा होणार इतकें ऐकून देखील हिरकणी खाऊन प्राण देण्यास सिध्ध होतात सबब तशाला कैदेची शिक्षा योजाबयास नको पण या मुकदम्यांतील जे सदासूक, नथमल वडे चोर, अतिसाहसी, स्त्रियांवर हात घालणारे, व दिवसा दरोडे पचविणारे यांस कैदेची शिक्षा न योजणें यासारखें दुसरें वाईट कांहीं नाहीं.

## वऱ्हाड.

आमचे निजाम सरकार प्रिन्स आफ वेल्स यांचे भेटीस जाणार असा पूर्ण निश्चय झाला एवढेंच नव्हे तर त्यांची अघाडीही पुढें रवाना झाली. निजाम सरकार मुंबई मुक्कामीं राजपुत्राची भेट घेणार. व त्यांच्या जागेच्या वगैरे तयारीकरितां गेल्या बुधवारीं खालीं लिहिलेली मंडळी हैदराबादेहून मुंबईस गेली.

१ क्या. ट्रेव्हर साहेब असिस्टंट रेसिडेंट

१ मि. विलकिन्सन साहेब इंजिनियर खात्याचे सेक्रेटरी

१ मि. शापुरजी एदलजी चिनाई नवाब विकर उल उमरावचे कारभारी

१ नवाब इक्रमजंग मुख्य खजीनदार

निजाम सरकाराबरोबर एकंदर मंडळी तीन हजारांहून अधिक जाईल असा सुमार आहे.

हिंदुस्थान सरकारचे या आठवड्याचे ग्याझेटांत पुढें लिहिलेल्या बदल्या आहेत.

मि. सी. हार्डिन साहेब उमरावतीचे थर्ड क्लास डिपुटी कमिशनर रजेवरून परत आल्यानें मेजर डी डब्ल्यु लाटण आफिशियेटिंग थर्ड क्लास डिपुटी कमिशनर हे आफिशियेटिंग फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर झाले व क्या. एफ डब्ल्यु ग्रांट आफिशियेटिंग फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर हे आफि० सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर झाले.

मि. एन बी कंबरलीग पोलिस सुपरइंटेंडेंट रजेवरून परत आले त्यामुळें मि. एच काटग्रेव्ह आफि० सेकंड ग्रेड सुपरइंटेंडेंट झाले होते ते पुन्हा थर्ड ग्रेड सुपर. झाले. व मि. एच ए हिथ आफि० थर्ड ग्रेड सुपरइंटेंडेंट झाले होते ते असिस्टंट सु. च्या जागेवर मागें आले.

खालीं लिहिलेल्या सात दिवसांपुरत्या दोन नेमणुका सन १८७४ सालच्या मार्च महिन्यांत झालेल्या या आठवड्याचे हिंदुस्थान सरकारचे ग्याझेटांत प्रसिद्ध झाल्या आहेत.

मेजर जे जी वेल आफिशियेटिंग जुडिशियल कमिशनर ता. २९ तागा. ता. ३१ मार्च सन १८७४ इसवी पावेतों पश्चिम वऱ्हाडचे आफिशियेटिंग कमिशनर होते व मेजर जे टी बुशबी थर्ड क्लास डिपुटी कमिशनर सदर मुदतींत सेकंड क्लास डिपुटी कमिशनर होते.

अडगावचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण यांनीं आपलें सर्व आफीस बदलावें व दुसरे लोक आपणास द्यावे असा रिपोर्ट केला होता तो मान्य होऊन त्यांचे शिरस्तेदार, नाजर इतर कारकून, जप्ती कारकून इत्यादि सर्व लोकांच्या जुडिशियल कमिशनर साहेबांनीं वेग वेगळ्या ठिकाणीं बदल्या केल्या. व नवें कोरें इस्टाब्लिशमेंट पुरुषोत्तमराबास आणून देण्याची तजवीज केली. यांत दोन तीन महिन्यापूर्वी नवे नेमिले गेलेले कारकून देखील बदलले. याच प्रमाणें सर्व शिपाई लोकांच्या देखील बदल्या व्हाव्या असा त्यांचा रिपोर्ट आहे असें ऐकतों परंतु त्याचा अजून अमल झाला नाहीं. आह्मास वाटतें कीं त्यांच्या न्यायाच्या कामापुढें नित्य नजरेस येणारे वकील लोक यांच्याही बदल्या त्यांनीं कदाचित मागितल्या असत्या परंतु त्या होणार नाहींत असें त्यांस वाटलें असावें ह्मणून त्यांनीं खटपट केली नाहीं. थोड्या दिवसांमागें त्यांनीं एका वकीलास कांहीं रुपये दंड केला होता व तो वसूलही केला होता पण हुजूरांतून टपका मिळाला कीं वकील लोकांस दंड करण्याचा तुह्मास अधिकार नाहीं; ह्मणून त्यांनीं तो परत दिला. ह्मणतात अस्तु. हें इंग्लिश सरकारचें राज्य आहे ह्मणून एवढ्यावरच गेलें. नाही पेक्षां मोगलाई किंवा बडोदेशाई असती तर गावांतली रयत देखील बदलून नवी भरावी अशी इच्छा झाली असती कीं काय कोण जाणे!

अडगावचे शिरस्तेदार रा. रामराव व्यंकटेश यांस मलकापुरास नेमिलें व मलकापुरचे रा. रंगो जनार्दन यांस अडगावास नेमिलें. बाकी हलके पगाराचे बहुतेक कारकून बहुतेक जिल्ह्यांतून बदलले आहेत. पावसा पाण्याचे दिवसांत गरीब लोकांच्या अशा एकदम बदल्या झाल्यानें त्यांस बरेंच नुकसान व त्रास होईल याबद्दल आह्मांस वाईट वाटतें.

उमरावतीची कार्टिंग एजन्सी रेलवे कंपनीनें या महिन्या अखेर बंद करण्याचा ठराव केला आहे.

पर्जन्य दोन तीन आठवडे अतिशय झाला होता पण या आठवड्यांत पुन्हा चांगली उघाडी झाली आहे.

हैदराबादेस महामारीचा उपद्रव पुष्कळ सुरू झाला आहे. चदरघाटावर २०वे तारखेस १२ मनुष्यें मेलीं. रेसिडेन्सीकडील लोक बोलारमकडे गेले.

**कारंजें**— तारिख २३ माहे सप्तंबर सन १८७५ इसवी— दोन तीन दिवसांपासून पावसानें उघाडी दिली आहे. एथें मुसलमान लोकांत जाती संबंधी फार दिवसांपासून तंटा चालू होता. तो मि० अबदुल हक्क साहेब यांणीं मिटवून सर्व मुसलमान लोकांचा एकोपा करून दिला. व तत्संबंधी लोकांस आपले येथें मेजवानी दिली. आणि ज्युमा मशिदीस एक २० रु० चे किमतीचें झाक बक्षीस दिलें. फार दिवसांपासून चालत आलेला तंटा हक्क साहेबांनीं तोडल्याबद्दल सर्व मुसलमान लोक त्यांचें आभार मानीत आहेत. साहेब मवसूफ यांणीं कायद्याचा अभ्यास मोठी मेहेनत घेऊन चालविला आहे. व अभ्यासाकरितां वाशिमाहून रा. विठ्ठल पंत नावाचे गृहस्थ आणिले आहेत. ईश्वर करो आणि त्यांचे मेहेनतीचें फल होवो. येथील कचेरींतील रा. गोविंद जिवनराव जप्ती कारकून मूर्तिजापूर येथील नायब तहशिलदार यांचे चिरंजीव याणीं जप्तीचे कामीं प्रतिवादीकडून रु० ४० लांच घेऊन माल सोडून दिला अशाबद्दल त्यावर फिर्याद झाली आहे. तिची तारीख २७ रोजीं चवकशी होणार आहे. पुढें काय होतें तें पहावें-

### मागाहून आलेल्या नोटिसा.

नोटिस.

गणेशदास बुलाखीदास दुकान मुंबई यांस खालीं सही करणार नोटिस देतो कीं आमचे रुपये तुह्मांकडे घेणें आहेत त्याबद्दल आपण हिशेब पाठविला त्यांत व्याजाबद्दल बरोबर पूर्वीपासून तुमचे खातें चालत आल्याप्रमाणें करून पाठवीत नाहीं याकरितां नोटिस देतो कीं ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत आमचे खात्याचा हिशेब उतरून पूर्वीं तुह्मी व्याज देत आल्याप्रमाणें आकार करून नक्की हिशेब पाठवावा न पाठविल्यास रीतीप्रमाणें फिर्याद केली जाईल. मग फिर्यादीचे खर्चासुद्धां रुपये द्यावे लागतील कळावे तारीख २९ माहे सप्तंबर सन १८७५ इसवी.

( सही ) चुणीलाल शिवचंद
दुकान अकोट
दस्तुर खुद.

नोटिस.

बुलाखीदास गोविंददास चेतनदास हल्ली वस्ती बिकानेर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचे रुपये तुमचे मुंबई दुकानाकडे घेणें आहेत त्याबद्दल मुंबई दुकानाहून हिशेब पाठविला त्यांत व्याजाबद्दल बरोबर पूर्वीपासून तुमचें खातें चालत आल्याप्रमाणें करून पाठविला नाहीं याजकरितां ही नोटिस देतो कीं नोटिस पावल्यापासून पंधरा दिवसांत आमचे खात्याचा हिशेब उतरून पूर्वीं तुह्मी व्याज देत आल्याप्रमाणें आकार करून नक्की हिशेब पाठवावा न पाठविल्यास रीतीप्रमाणें फिर्याद केली जाईल. मग फिर्यादीचे खर्चासुध्धां रुपये द्यावे लागतील कळावे तारीख २९ माहे सप्तंबर सन १८७५ इसवी-

( सही ) चुणीलाल शिवचंद दुकान अकोट दस्तुर खुद.

नोटिस

मलीका बापाचें नाव सिलेमान सुभेदार शहर अकोलें इजला अब्राहिम शाम्युयल नंबरटेकर सेगाव स्टेशन याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तूं जी ता. ३ सप्तंबरची नोटिस पाठविलीस ती ता. १४ रोजीं मिळाली त्यांतील मजकूर खरा अथवा खोटा तें ईश्वरासच माहित असेल. तशांत तू स्वतंत्र राहूं इच्छितेस तर आज माझे लग्नाची रकम रुपये ५०० मजला तुजकडोन मिळाल्याशिवाय तुझा माझा संबंध तुटत नाहीं तशांत भरणा होई तों पर्यंत तुझी वाईट वर्तणूक वारकंम पाहण्यांत व ऐकण्यांत जर आलें तर तुजवर व जो तुला साह्य देईल त्याजवर फिर्याद करीन. रकम फिटे तोंपर्यंत माझा हक्क आहे असें मी समजतों व तुजलाही कळवितों. ता. २२ सप्तंबर सन १८७५ इ.

( सही ) अब्राहिम शाम्युएल
नंबर टेकर

## वर्तमानसार

मुंबईस म्याट्रिक्युलेशनच्या वगैरे परीक्षा नोवेंबरच्या १५ वे तारखेस नेमिल्या होत्या त्या २२ वे तारखेवर घातल्या. व बी. ए. वगैरेच्या परीक्षा २२ वे तारखेस नेमल्या होत्या त्या १९ वे तारखेवर घातल्या.

प्रिन्स आफ वेल्स यांचे समारंभाकरितां दारूकाम मुंबईस २००० रुपयांचें, मद्रासेस १०००० रुपयांचें व कलकत्त्यास २०००० रुपयांचें होणार असें कळतें.

जुनार एथील लष्करी पेनशनर लोक पुराचे योगानें नागवले त्यांस सरकारानें ५००० रुपये मदत दिली.

पुण्यास वेद शास्त्रोत्तेजक ह्मणून एक मंडळी स्थापन झाली आहे. व तिनें डिसेंबर महिन्यांत प्रसिध्ध सभा भरवून जे उमेदवार वेद पाठ ह्मणण्याची, वेदाचा अर्थ सांगण्याची, शास्त्रांचा अर्थ सांगण्याची वगैरे परीक्षा देतील त्यांस बक्षिसें द्यावीं. असा ठराव केला आहे. हीं बक्षिसें सुमार ४१ आहेत व सर्व खर्च सुमार १२०० रुपये लागेल असा सुमार आहे.

रा. सा. गजानन विठ्ठल अमदाबादचे पोलिस इन्स्पेक्टर यांस बडोद्याकडील विषप्रयोगाच्या मुकदम्याच्या उत्तम कामगिरीबद्दल बडोदे दरबाराकडून दरसाल ७५० रुपये उत्पन्नाचा एक गाव जाहागीर द्यावा अशी रेसिडेंट मे० मिड साहेब यांनीं शिफारस केलेली दरबाराकडे आली तेव्हां सरटी माधवराव दिवाण यांनीं आपला अभिप्राय दिला कीं गजानन यांनीं बडोदा दरबारची मुळींच, कांहीं कामगिरी केली नाहीं जी कांहीं केली ती इंग्लिश सरकारची आहे. यासाठीं इं० स०नीं पाहिजे तर त्यांस जहागीर द्यावी. इकडून देण्यास कांहीं कारण दिसत नाहीं. आतां आणखी कांहीं खटपट करण्याकरितां गजाननराव मुंबईकडे गेले आहेत.

डा० उइलसन यांची पुण्यास अस्वास्थ्य प्रकृति बिघडली आहे.

मि० गोपिनाथ सदाशिव मुंबई हाय कोर्टांतील वकील यांस बडोद्यास जडज नेमिलें असें कळतें.

रा. रा. विठ्ठल हरि लिमये पुण्याच्या असिस्टंट जडजाचे शिरस्तेदार यांस मिरजेस मुनसफ नेमिल्याचें पुन्हा वर्तमान टाइम्समध्ये लिहिलें आहे.

काठेवाडांतील वकील मि० नागिनदास यांजवर बडोद्याच्या चौकशीच्या संबंधानें सार्जंट बालंटैनें बारिस्टर यांस मानपत्र देतांना इंग्लिश सरकारची निंदा केली असा आरोप ठेऊन पोलिटिकल एजंट यांणीं त्यांची सनद रद्द केली होती. हल्लीं नगिनदास यांणीं ती चूक कबूल केली. व सदर्हू गोष्ट इंग्लिश भाषेविषयींच्या आपल्या कमसमजुतीमुळें घडून आली असें सांगून क्षमा मागितली. त्यावर पोलिटिकल एजंट यांणीं मेहेरबान होऊन त्यांस तारीख ३१ आगस्ट रोजीं, पुन्हा सनद दिली.

जयपुरच्या महाराजांचे दिवाण फत्तेसिंगजी यांस १३ वे तारखेस दिवाणगिरीचीं वस्त्रें झालीं.

अर्काटच्या नवाबाचे तृतीय चिरंजीव उमदत उदवला बहादूर यांनीं नादारी घेतली असें समजतें.

प्रिन्स आफ वेल्स यांचे आदर आतिथ्याकरितां कलकत्त्यास वर्गणीची खटपट महिनाभर चालली आहे ती रकम ६८००० रुपये जमली. काशीस एका तासांतच इतके रुपये जमले असें समजतें.

अमेरिकेंत न्यूयार्क शहर आहे त्याची खानेसुमारी झाली त्यावरून कळतें कीं तेथें १०१८६२२ मनुष्य संख्या आहे.

रक्तपितीच्या महारोगावर कैलासवासी डा० भाऊ दाजी जें औषध योजित असत त्याचें मद्रासचे सर्जन जनरल यांनीं फार वर्णन केलें आहे. व त्या उत्तम शोधाकरितां भाऊ दाजी यांची फार तारिफ केली आहे. भाऊ जें औषध देत त्याचें नाव चालमोगऱ्याचें तेल. चालमोगरा ही वनस्पती हिमालयाच्या पूर्वभागांत सापडते. तिचें तेल पोटांत देतात व आंगाला चोळतात.

सिमल्यास घोड्यांचें व कुत्र्यांचें प्रदर्शन झालें. कुत्रे २१ जातीचे व घोडे १२ जातीचे आले होते. मि० लिच साहेब यांस घोड्याकरितां पहिलें बक्षिस व व्हाइसराय यांस दुसरें बक्षिस मिळालें.

बडोद्यास गणपतीची मिरवणूक होती त्यावेळीं महाराजांचे स्वारी बरोबर रेसिडेंट साहेब असतात त्या संबंधात कांहीं पत्रव्यवहार चालून असा ठराव झाला कीं गणपती देव समजून त्याला मान देण्याकरितां रेसिडेंट बरोबर जातात असें बिलकूल समजूं नये. महाराजांकरितां ते स्वारी बरोबर जातात.

रा. विनायकराव गोविंद इंदुरचे सिटीमाजिस्त्रेट यांस बडोद्यास जुडिशियल खात्यांत जागा मिळाली असें समजतें.

कच्छ प्रांतांत अजून पाऊस नाहीं ह्मणून फार बोभाट आहे.

सुरतेस रात्रीची शाळा सुरू करण्यास डायरेक्टर साहेबांनीं सांगशन केलें आहे.

पुण्याचे पेनशनर मुनसफ मि० आर्देसर करशेटजी यांस त्यांचे इमानी नोकरीवरून सरकारानें खान बहादुर असा किताब दिला.

रजपुत संस्थानांतील रेलवेचें अलीकडील पावसानें फारच नुकसान झालें. कित्येक ठिकाणें मिळून २३ मैल सडक वाहून गेली.

दिल्लीस एक आठवड्यापूर्वीं एक दिवस २० इंच पाऊस पडला तेणेंकरून १०००० घरें पडलीं आणि कित्येक मनुष्यें मेलीं असें कळतें.

बडोद्याचे रेसिडेंटचे जागेवर मि. मेलविल साहेब जे श्रीमंत मल्हाररावाच्या चौकशीच्या वेळीं कमिशनांत होते त्यांस नेमिलें.

आगष्ट महिन्यांतील अमेरिका देशचा कापसाचा हंगाम चांगला आहे अशी खबर आली आहे.

## फौजदारी मुकद्दमा

**नंबर ७२ सन १८७५ पैकीं.**

विद्यमान फर्स्ट क्लास माजिस्त्रेट व एकस्ट्रा असि. कमिशनर कोर्ट मलकापुर.

**फिर्यादी**

सखाराम वल्लद डुमणसा रंगारी वस्ती नांदुरें

**आरोपी**

१ सदासुक २ नथमल ३ रामू ४ आंबू ५ चादमल ६ प्रेमजी ७ मोतीराम वस्ती नांदुरें

गुन्हा इंडि. पिनलकोड कलम ४५१ प्रमाणें

फैल ता. २६ आगष्ट सन १८७५

**तजवीज**

सदरहू गुन्ह्याचे तमाम आरोपी गुन्ह्यास इनकार करून बच्यावाबद्दल ने १८ साक्षीदार देतात त्यांचे जाबावरून हकीकत पाहिली असतां जे जे साक्षीदार ज्या ज्या मुद्याबद्दल आहेत त्या त्या साक्षीदारांचे सांगण्यांत एकमेकांत कित्येक फरकानें साक्ष देतात आणि मुख्यत्वेंकरून या फिर्यादीकडे आरोपी लोकांचे येणें असून त्यानें गुन्हा झाल्या रोजीं देण्यास इनकार केल्यामुळें प्रथमतः कैदी नंबर १ चा सदासुक व नंबर ४ चा अंबू उभयतां फिर्यादीचे घरीं जाऊन त्यांतून नंबर १ चा यानें फिर्यादीचे घरांतील कपड्याचा माल आपले हातानें जबरीनें बाहेर आणोन त्याचेच घरांत मैदानांत टाकून नंबर ४चा हा फिर्यादीचा माल, आणखी नंबर २चा रंगारी व नंबर ३ चा धोबी याचे घरीं जाऊन त्यांजपाशीं असलेला माल जबरीनें फिर्यादीचे घराबाहेर आणून टाकून दिला. ते लोक न टाकीत तेव्हां त्यांचे आंगावर नंबर ४ चा कैदीही गेला. नंतर नंबर २।५।६।७ चे आरोपी घरांत जाऊन फिर्यादी लोकांवर सक्ती करून औरतांचे अंगावरील चिजा काढून घेतल्या. व त्या फिर्यादीचे उपजीविकेची रंगाची कढयी देखील काढून घेतली. त्या वेळेस शें दीडशें लोक त्याचे घरापुढें तमासबीन जमून पाहून गेले आणि फिर्यादीवर जुलूम झाल्याचा पुकारा जेव्हां झाला तेव्हां आपल्या कर्तव्यांत जबरी वाटूं नये अशा उद्देशानें स्टांपवेंडरास त्या ठिकाणीं कागदां सहित आरोपीनीं बोलाऊन आणून त्याजकडून फिर्यादीचे व त्याचे भावाचे नांवें ३ दस्तैवज निशाणी १।२।३ चे तयार केले. फिर्यादी त्यावेळेस तेथें हजर असोन त्यास निशाणी करण्यास सांगतां त्यानें करीत नाहीं अशी तक्रार केली तेव्हां फिर्यादी लिहिणार नसल्यामुळें मग त्याच्या निशाण्या कागदावर कशा झाल्या असतील त्या असोत. लिहिणारा व साक्षीदार दस्तैवजवरील निशाणी १।२।३।४।५ कैदी तर्फे साक्षीदार यांच्या साक्षी झाल्यांत ते पुष्कळच फरकानें मजकूर सांगतात. आरोपि या गावांत मोठे साहू लोक असून कैदी नंबर २ चा म्युनिसिप्यालिटीचा मेंबरही आहे. आणि कैदी नंबर १।३।४ एकच घरांतील भाऊ असून मात्र व्यापार अलग अलग असल्यानें लिहिणारानीं व साक्षीदारांनीं त्या आरोपी लोकांचे मुलाहिजानें लिहिलें व साक्षी टाकिल्या असतील ह्मणण्यास हरकत नसोन हल्लीं ते तसें कसें सांगतील? तत्रापि थोडे दिवसांचें काम असोन साक्षीचे व लिहिण्याचे सांगण्यांत इतका फेरफार जेव्हां दिसत आहे तेव्हां झालेले दस्तैवज योग्य रीतीनें झाले असावे असें कोर्ट समजत नाहीं. मात्र केलेला अपराध छपविण्याकरितां दस्तैवज झाले असतील. जर फिर्यादी आपले खुशीनें माल देऊन दस्तैवज करून घेता तर लागलीच अशी एकदम फिर्याद न करता व आपले उपजीविकेची कढयी कधीं काढून न देता. कैदी नंबर १ चें ह्मणणें आपण फिर्यादीचे घरीं गेल्यावर फिर्यादीनें घरांतून आपले हातून कापड काढून दिलें व चिजा बायकांनीं व फिर्यादीनें आपले हातून काढून दिल्या ह्मणतो पण तसें आरोपीकडील साक्षीदार कोणीच सांगत नसून माल आपले खुशीनें काढून दिल्याबद्दल आरोपीनें जे नंबर ६।७।८।९ चे साक्षीदार देऊन शिवाय दस्तैवजावरील साक्षीदार दिले ते सर्व आपण त्या ठिकाणीं जाण्यापूर्वीं माल तमाम मैदानांत पडला होता ह्मणतात. व कैदी नंबर १ यानें आपले हातून फिर्यादीचे घरांतून कपडा सक्तीनें काढला असें फिर्यादी व साक्षीदार नि० १, ४, ९, १० यांचे जाबावरून सिद्ध होत आहे व याच कैदीनें फिर्यादीचे बायकोचे अंगावरील चिजा काढल्याचें नि. १।४।१० व फडताळें उघडल्याचें नि. ४।१० चे जबान्यांवरून कळतें.

कैदी नंबर २ चा यानें हुकूम देऊन कैदी नंबर ७ चा याजकडून फि. ची आई नि. १० ची साक्षीदार इचे अंगावरील चीजा उतरावल्या व नंबर २ चे कैदीनें फिर्यादीचे हातांतील कडीं वगैरे काढल्याचें नी. १।९।१० चे साक्षीवरून समजत आहे. फि. चे बोलावण्यावरून त्याचे घरीं गेलो ह्मणतो, तसा पुरावा झाला नाहीं.

कैदी नं. ४ चा अंबू यानें फिर्यादीचा धोब्याजवळ व रंगाऱ्याजवळ मजुरीनें धुण्यास दिलेला कांहीं कपडा त्यांचे घरीं जाऊन व नोकरापासून त्यांजवर सक्तीकरून ते न देईत तेव्हां त्यांजकडून आणून फिर्यादीचे घराबाहेर टाकबून तो मालही नं. १चा कैदी घेऊन गेला. सदरहू धोबी व रंगारी यांचे एथून फिर्यादीचा माल सक्तीनें कैदी नं. ४ चा अंबू यानें आणल्याबद्दल नि. १।२।३।४।६।८।९।१० चे फि० कडील साक्षीदार यांचे जबान्यांवरून शाबीद होत आहे. आरोपी इनकार करतो पण बच्याव कांहींच त्याकडून झालेला नाहीं.

कैदी न. ५।६ यांचें येणें फिर्यादीकडे असोन सदर नंबर १।२।४ चे कैदींनीं फिर्यादीचे घरांत जाऊन आपले घेण्याकरितां गर्दी केली त्या संधींत आपलेही येणें उगविण्याकरितां जाऊन त्या आरोपीस सामील होऊन आपले येण्याचा हवाला नं. १।२ चे कैदींनीं घेतल्यामुळें त्या गर्दींत आपणही मिसळून राहून कढई काढण्याची वगैरे तजवीज केली असें फिर्यादी व त्याची आई ह्मणते. तसा पुरावा झाला नाहीं मात्र गर्दी फारच झाल्यामुळें.

कैदी नंबर ७चा यानें नथमल कैदी नंबर २ याचे हुकुमानें फिर्यादीचे आईचे अंगावरील डागिने काढिले असें फिर्यादी कडील नंबर १, ४, ९, १० चे साक्षीवरून सिद्ध होत आहे.

येणेंप्रमाणें झालेले चौकशीवरून पहातां आरोपी नंबर १, २, ४, ५, ६, ७ यांणीं फिर्यादीवर गर्दी करून कायद्यांतील कलम ४४८ प्रमाणें घराविषयीं आगळीक करून कलम १४१ चें चौथे उदाहरणाअन्वयें फिर्यादीचे घरांतील व बायका पुरुषांचे अंगावरील चिजा जबरीनें काढून घेऊन तो माल आपले कबजांत घेऊन नंबर १, २ चे कैदीनीं तो माल नेला आणि कलम ४४८ । १४७ प्रमाणें गुन्हा सर्व आरोपींनीं केला असा कोडतानें ठराव केला आहे. कैदी नंबर ३ चा रामू याजवर कांहींच शाबिदी नसल्यामुळें त्याजवर चार्ज न ठेवितां सोडला

या खटल्यांत पोलिसानीं क० ४५१ प्रमाणें चलावणं केला पण तशी चोरी करण्याचे इराद्यानें प्रथम गेले असें नसावें असें वाटल्यावरून च्यार्ज्य बदलून कलम १४७-४४८ लाविलें आहे.

कोडताचा हुकूम आहे कीं आरोपी नंबर १ चा सदासुक यानें २०० रुपये दंड द्यावा. न दिल्यास ३ महिने सक्त कैदेंत रहावें. कैदी नंबर २चा नथमल यानें १५० रुपये दंड द्यावा. न दिल्यास १ महिना सक्त कैदेंत रहावें. कैदी नंबर ४ चा अंबू यानें १५० रुपये दंड द्यावा न दिल्यास ३ म० सक्त कैदेंत रहावें. कै० नंबर ५ चा चादमल व कै० नंबर ६ चा पेमजी या प्रत्येकांनीं २५। २५ रुपये दंड द्यावा. न दिल्यास एकेक महिना नुसते कैदेंत रहावें. कै० नंबर ७ चा मोती यानें ५० रुपये दंड द्यावा. न दिल्यास २ महिने सक्त कैदेंत रहावें.

मुद्याचा माल सांपडलेला तमाम फिर्यादीस द्यावा. तारीख १ सप्तंबर सन १८७५ इसवी.

**बापूजी रंगनाथ**
फर्स्टक्लास माजिस्त्रेट

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.